स्वाक्षरांकित

विजय देशपांडे यांच्या
स्वाक्षरीसंग्रहाचे
एक ‘तारां’कित
संकलन

साठ वर्षे स्वाक्षऱ्या जमविणाऱ्या एका छांदिष्टाचेअनुभव...

स्वाक्षऱ्यांचा अनोखा छंद

स्वाक्षरांकित

विजय देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

स्वाक्षरांकित
लेखक : विजय देशपांडे, मुंबई
संपर्क : ९८७०३५३२४४
vijay2603@gmail.com

मुखपृष्ठ व अंतर्गत मांडणी:
कनक वाईकर
८८८८९९१२६
kanak.waikar@gmail.com

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान
वेब: www.esahity.com
ईमेल esahity@gmail.com
प्रकाशन : १७ फेब्रुवारी२०१५
© esahity Pratishthan २०१५

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ऋणनिर्देश

ऋणनिर्देश
ईसहित्य प्रतिष्ठान ने माझ्या ५९ वर्षांच्या या स्वाक्षरी संग्रहाचे ई प्रकाशन करण्याचे ठरवले , या प्रस्तावाबद्दल प्रथमतः मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. या प्रस्तावानंतर मला माझा स्वाक्षरी संग्रहाचा सगळा प्रवास आठवला नि ज्या अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे मला सहकार्य,मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले त्यासर्वांचा मी ऋणी आहे. तरीही काही नामोल्लेख अपरिहार्य असल्याने अशा खालील व्यक्ती व संस्था, यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख होणे आवश्यक समजतो

* आई, वडील, पत्नी सौ. सुजाता , मुलगी सौ सोनाली आणि गुजर, सराफ, थिटे, प्रधान, जठार, पत्की आदी सर्व कुटुंबीय व मित्र परिवार.

* गुरु कै. श्री शिधये व त्यांचे कुटुंबीय,

* ३० वर्षे नौकरी केलेल्या मुंबईतील एअर इंडियाचे अनेक पदाधिकारी,

* संग्रहाची दखल घेऊन पहिल्या वहिल्या लिम्का बुक मध्ये नोंद करणारे त्यांचे संपादक/संकलक

* स्वाक्षरी संग्रहाची भारतात प्रथमच ८ एकल प्रदर्शने (One Man Shows) करण्यास विनाशुल्क जागा देणाऱ्या बालमोहन विद्यामंदीर, दादर, लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे आदी संस्थांचे अधिकारी व त्या त्या प्रदर्शनाच्या उदघाटनाला आवर्जून आलेले कै. श्री. बापूसाहेब रेगे, विक्रम गोखले, कै. विद्याधर गोखले व श्रीकांत मोघे व इतर मान्यवर.

* ज्यांनी स्वाक्षरीसंग्रहात मोलाची भर पाडण्यास मदत केली असे राजसिंग, रमाकांत देसाई, एस. पी. गोदरेज , संदीप पाटील, आदी मान्यवर

* भारतात प्रथमच स्वाक्षरी संग्रहावर आधारित दृक श्राव्य प्रयोग करण्यासाठी मदत करणा-या मित्राचे व पुढे त्याचे दुबई, शारजा, अबुधाबी येथे महाराष्ट्र मंडळातून व मुंबईमध्ये प्रयोग करवणा-या संस्थाचे अधिकारी,

* या कार्यात असंख्यांचा सहभाग होता. जागेच्या अभावी ज्यांचा प्रत्यक्ष नामोल्लेख राहिला असेल त्या सर्व नातेवाईक, मित्र आणि हितचिंतकांचे आणि ई प्रतिष्ठान ची संपूर्ण टीम व विशेष करून तनुजा इनामदार व चित्रकार कनक वाईकर या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.
धन्यवाद !!

*



मारियो मिरांडा यांची स्वाक्षरी

मारियो मिरांडा यांच्यासह लेखक



लिम्का वर्ड रेकॉर्डच्या कार्यक्रमात लता मंगेशकर यांच्याकडून सन्मान घेताना लेखक

पद्मनाथ आचार्य यांच्यासमेवत लेखक

निमित्त मात्र संग्रहित स्वाक्षऱ्यांचे...

विजय देशपांडे यांचा अनोखा स्वाक्षरी छंद

संकल्पना

कोणत्याही मान्यवरांबद्दल वर्तमानपत्र वा पुस्तकातून वाचल्यानंतर, विशेषतः त्यांना मिळणाऱ्या प्रसिद्धी नि पैशाबद्दल वाचल्यानंतर त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्याची, त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा निर्माण होणे स्वाभाविक असते. हे असे मान्यवर निरनिराळ्या क्षेत्रातले असू शकतात. माझ्या लहानपणी संगीतप्रेमींना पं. रविशंकर, पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व. उस्ताद बिस्मिल्ला खान अशा मातब्बर संगीत कलाकारांचे आकर्षण वाटे, तर क्रिकेट प्रेमींना सर डॉन ब्रॅडमन, विजय हजारे, विजय मर्चंट, विनू मंकड अशा प्रसिद्ध खेळाडूंचे नि सिनेरसिकांना राजकपूर, नर्गिस, दिलीप कुमार, देव आनंद वा मधुबाला अशा दैवतावत वाटणाऱ्या सिने कलाकारांचे आकर्षण वाटे. मग जसे शक्य होईल तसे व शक्य होईल तेव्हा त्यांना भेटण्याची इच्छा होत असे व तसे प्रयत्नही होत असत.

याच काळात माझ्या बालपणी शिवाजीपार्क परिसरातील वास्तव्यामुळे क्रिकेटचा पगडा मनावर बसला नसेल असा मुलगा मिळणे विरळाच असे ! मग मीच त्याला अपवाद कसा असू शकेन? त्यामुळे मलासुद्धा क्रिकेट व क्रिकेट खेळाडू यांचे प्रचंड आकर्षण वाटू लागले. त्या काळात वर्षातून केवळ एक किंवा दोन आंतरराष्ट्रीय कसोटी सामने मुंबईच्या एकमेव

आपल्या संग्रहासह लेखक

ब्रेबॉर्न स्टेडीयमवर होत असत. त्यामुळे अशा संधीची आम्ही क्रिकेट प्रेमी चातकासारखी खूप आतुरतेने वाट पाहत असू तर इतर वेळी मात्र रणजी वा इराणी कप स्पर्धांवरच तहान भागवत असू. मग फावल्या वेळात या चमकणाऱ्या खेळाडूंची पुस्तके वाचणे, त्यातील त्यांच्या फोटोंवरून त्यांच्या खेळण्याच्या शैलीचा अभ्यास करून त्याचे अनुकरण करणे, शक्य झाल्यास त्यांना भेटण्याचा प्रयत्न करणे, भेटी मिळवणे, असे उद्योग चालू असत.

ह्या संग्रहाच्या प्रक्रियेत सामान्यज्ञान, पत्रलेखन,मान्यवरांना भेटण्याची शिस्त, त्यासाठीचे निमित्त नि धाडस. चिकाटी, संयम अशा अनेक गोष्टीना खतपाणी मिळू लागले व हळू हळू या स्वाक्षरी संग्रहाच्या निमित्ताने मलाही माझे व्यक्तिमत्व घडवायला मदत होऊ लागली. यात अनेक कडू गोड अनुभव आले.

काही वर्षांनी या स्वाक्षरी संग्रहाची प्रदर्शने, नंतर स्लाईडअॅन्ड टॉक शोज,वर्तमानपत्रे, नियतकालिके व दूरदर्शन इत्यादी माध्यमांना मुलाखती देण्याचे व कॅमेऱ्याला सामोरे जाण्याचे धैर्य अंगी आले.

एअर इंडियातील नोकरीसाठी भरतीच्या मुलाखतीच्या वेळी याच माझ्या स्वाक्षरी संग्रहाने मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर छाप पडली व मला तिथे नोकरीही मिळाली. नंतरच्या ३० वर्षात मी या संधीचे माझ्या परीने सोने करून घेतले. देशातील पहिली स्वाक्षरी प्रदर्शन भरवणे, लिम्का बुक ऑफ रेकॉर्डच्या पहिल्या आवृत्तीत संग्रहाची नोंद,स्वाक्षरी संग्रहावरील पहिला स्लाईड अॅन्डटॉक शो दूरदर्शनवरून काही खास मुलाखती असे उपक्रम करत करत निरनिराळ्या क्षेत्रातील देश विदेशच्या २२०० हून अधिक मान्यवरांच्या स्वाक्षऱ्यांचा संग्रह जमा केला.

आज ५९ वर्षांनी मागे वळून पाहताना संग्रहाच्या प्रवासात आलेल्या कडू गोड व स्मरणीय आठवणींचा चित्रपट डोळ्यासमोरून सरकतो तेव्हा हा एवढा उपद्व्याप केव्हा नि कसा केला याचे माझे मलाच आश्चर्य वाटते.

ह्या पुस्तकात स्वाक्षरी म्हणजे काय, ती कोणाची घ्यावी, त्याचे पुढे काय करायचे, त्याचे फायदे तोटे काय, या व अशा विषयांची चर्चा होऊन काही माहिती मिळेल, असे वाचकांना वाटणे साहजिकच आहे. परंतु माझा ह्या संकलनामागील हेतू स्वाक्षरी व स्वाक्षरी संग्रह या वरील पाठ्यपुस्तक तयार करणे वा स्वाक्षरी वरून स्वभाव ओळखणे याबद्दल मार्गदर्शन करणे हाही नाही.

मग या उठाठेवीचा उपयोग काय, हा नेहमी विचारला जाणारा प्रश्न समोर येतो. वैयक्तिक समाधान, फावल्या वेळेचा थोडा सदुपयोग, नाव व प्रसिद्धीचा स्वार्थी फायदा हे सोडलं तर समाजाला याचा उपयोग काय असा विचार डोक्यात येतो व त्यातूनच स्वाक्षरी संग्रहामुळे मी काय शिकलो? काय अनुभवले? याबद्दलच्या अनुभव संग्रहाची कल्पना मनात मूळ धरू लागली. पिंडाने मी खूप अभ्यासू वा लेखक नसल्याने हे हिमालयाएवढे काम कसे करायचे आपल्याला जमेल का, नि करायचे झाल्यास कसे,हे प्रश्न डोक्यात पिंगा घालू लागले.

मग थोडा धीर करून प्रथम संग्रहात स्वाक्षऱ्या असलेल्या मान्यवरांची सूची तयार केली आणि त्या प्रत्येकासोबत घडलेला प्रसंग नि आलेला अनुभव लिहून काढला. माझी स्वाक्षरीसंग्रहावरील पुस्तकाबद्दलची कल्पना ऐकल्यावर एका हितचिंतकाने विचारले, मुंबईत दररोज शेकडो पुस्तके प्रसिद्ध होत असतात. अशा वेळी वाङ्मयीन मुल्ये नसलेल्या अशा पुस्तकाचा प्रपंच कशाला? तेव्हा वाटले जसे मी स्वाक्षऱ्या जमवल्या तसे बहुतेक प्रत्येक जण कुठला न कुठला तरी संग्रह करण्याच छंद सुरु करतो. पण पुढे नोकरी, धंदा, व्यवसाय संसार असे गाडे सुरु झाले कि अश्या संग्रहांकडे छंदांकडे नाईलाजाने का होईना, दुर्लक्ष होते. पण तरीही कळत नकळत अशा छंदातून काही न काही शिकत असतो, काही गुण अंगिकारत असतो, ज्यांचा आपल्याला पुढील आयुष्यात खूप उपयोग होत असतो.

त्यामुळे माझ्या या अनुभव संग्रहातील अनुभवांवरून लहान मुलाला एखाद्या मोठ्या गोष्टीसाठी कदाचित प्रेरणा मिळू शकते, तर हे अनुभव वाचून वयोवृध्दाना आपल्या जुन्या आठवणीना उजाळा मिळण्याचा, ते क्षण पुन्हा जगण्याचा आनंद मिळू शकतो, हे जेव्हा मी प्रदर्शन व स्लाईड शो च्या दरम्यान स्वतः अनुभवले तेव्हाच अशा अनुभव संग्रहाच्या पुस्तक रूपाचे नक्की केले.

या पुस्तकात निरनिराळ्या क्षेत्रातील देशविदेशच्या अनेक मान्यवरांच्या मूळ स्वाक्षऱ्या, त्या घेतानाची त्यांच्या बरोबरची छायाचित्रे, काहींनी सोबत दिलेले संदेश, काहींनी काढलेली चित्रे नि व्यंगचित्रे इ. सोबत संग्रह करताना आलेले अनुभव, त्यांच्या आठवणी, त्याकडे पाहण्याची मान्यवरांची व त्यांच्या चाहत्यांची वृत्ती, त्यांचे दृष्टीकोन यांचे स्वभावावर आधारित संकलन केले आहे. त्या त्या व्यक्तीच्या यशोगाथा, त्यांची प्रगतिपुस्तके, त्यांच्या विक्रमांचे तक्ते आदि गोष्टी इतरत्र सहज उपलब्ध असतात. पण स्वाक्षरी संग्रहाच्या निमित्ताने त्या मान्यवरांना भेटण्याचे जे अनुभव आले, त्यासाठी जे प्रयत्न केले व त्यातून वेळोवेळी जे काही शिकू शकलो, ते सांगण्याचा, अशा एखाद्या छंदामुळे फावल्या वेळचा सदुपयोग करता येतो, त्यातून आपला स्वतःचा

विजय देशपांडे यांचे स्वाक्षरी प्रदर्शन बघताना विक्रम गोखले

व्यक्तिमत्व विकास होऊ शकतो व पर्यायाने आपल्या इतिहासाचे जतन केले जाऊ शकते हे विचार मांडण्याचा हा एक प्रांजळ प्रयत्न आहे.

त्यामुळे या पुस्तकाचा लहानमोठ्या सर्वांनाच आनंद मिळू शकेल याची मला खात्री आहे. शिवाय या संग्रहातील बऱ्याच महान व्यक्ती आज जग सोडून गेल्या असल्याने त्यांच्या मूळ स्वाक्षऱ्यांना एक अनन्यसाधारण ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या संग्रहामुळे मला मान्यवरांना भेटायचा, काहींशी प्रत्यक्षात दोन शब्द बोलण्याचा अनुभव मिळाला, व्यक्तीशः खूप काही शिकायला मिळाले व अंशतः नाव व प्रसिद्धी मिळाल्याने मानसिक समाधानही मिळाले.

असे समाधान या पुस्तकामुळे एका जरी वाचकाला मिळाले तरी मी स्वतःला धन्य समजेन.

एक नम्र स्वाक्षरी संग्राहक
विजय देशपांडे

स्वाक्षरी प्रदर्शन बघताना हृदयनाथ मंगेशकर

१.
स्वाक्षरी संग्रहाचा शुभारंभ

१९५४ मे महिन्यातील एका रविवारी दुपारी शिवाजी पार्क जिमखान्यावर एक क्रिकेट मॅच पाहायला गेलो असताना एका वृद्ध गृहस्थांनी माझ्याकडील वही व पेन्सील घेतली व जिमखान्यात जाऊन काही खेळाडूंकडून काही लिहून आणले. त्यांना ती पाने चाळताना पाहिले म्हणून विचारले ते काय आहे? तर ते म्हणाले ह्या प्रसिद्ध खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या आहेत. मी त्यांना भेटलो, त्यांनी क्रिकेटमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले, त्यांना शाबासकी दिली नि त्यांची आठवण म्हणून त्यांच्या कडून या स्वाक्षऱ्या करून घेतल्या. मी विचारले हे कोण खेळाडू आहेत, तर ते म्हणाले या खेळाडूंनी मुंबईत व देशभरात खूप नाव कमावले आहे

व पुढे ते आणखीन चांगले खेळून खूप नाव कमावतील व मोठे होतील. म्हणून त्यांची आठवण म्हणून मी या सह्या म्हणजे स्वाक्षऱ्या जपून ठेवीन. मला त्यावेळी त्यातले फारसे कळले नाही. पण इतक्या प्रसिद्ध खेळाडूंना भेटल्याचा आनंद मिळेल या एका कल्पनेने मीही जिमखान्याकडे धावलो. व तेथील तिघा प्रसिद्ध खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेतल्या. त्यात भारताचे कसोटी यष्टीरक्षक नरेंद्र नाम्हाणे, एक रणजी खेळाडू व संदीप पाटीलांचे वडील एम. एस. पाटील व एक स्थानिक अपंग खेळाडू वाय. बी. पटवा यांचा समावेश होता. प्रसिद्ध खेळाडूंना भेटण्याचे, त्यांना त्यांच्या यशाबद्दल शाबासकी देत त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याच्या निमित्ताचे नवीन तंत्र कळले आणि त्याचवेळी स्वाक्षरी रूपाने त्याची आठवण आपल्यासाठी जमवणे व नंतर ती पाहून त्यापासून काही करण्याची

प्रेरणा मिळवणे हे हळू हळू कळू लागले. अशा प्रकारे मला या छंदाची गोडी निर्माण झाली. हे पाहून माझे शेजारी श्री शिध्दये यांनी मला क्रिकेट व संगीत याप्रमाणेच वाङ्मय,साहित्य, कला, क्रीडा, राजकारण अशा अनेकविध क्षेत्रांचा परिचय करून देत त्यातील कोणकोणत्या मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या जमवाव्यात याबद्दल मार्गदर्शन करू लागले. आणि अशा प्रकारे त्या गुरूंच्या मार्गदर्शनानुसार थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे माझा स्वाक्षरी संग्रह हळू हळू आकार घेऊ लागला. अश्या तऱ्हेने माझ्या स्वाक्षरी संग्रहाला सुरुवात झाली. आजही तो दिवस,ती तळपती दुपार,नि स्वाक्षऱ्यासाठी जिमखान्याकडे घेतलेली ती धाव माझ्या चांगलीच स्मरणात आहे.

माझे वडील श्री.डी.वाय.देशपांडे संगीत प्रेमी व हर्मोनियमची साथ देणारे एक उत्तम संगीत जाणकार होते. त्यामुळे आमच्या घरी पं. जगन्नाथ बुवा पुरोहित, पं. राम मराठे, सतारवादक पं. शंकर अभ्यंकर, तबला वादक पं. सुरेश तळवलकर अशा अनेक प्रसिद्ध कलाकारांची उठबस असे. शिवाय ते दादर माटुंगा सोशल क्लबचे फाऊंडर मेंबर असल्याने दर रविवारी छबिलदास शाळेतील संगीत मैफिलींना जायला मिळे. त्यामुळे शास्त्रीय संगीत ऐकायला गोडी निर्माण होऊन कान तयार होऊ लागले व त्या क्षेत्रा-तील अनेक महान कलाकारांची महती कळू लागली. त्यामुळे त्यांच्या बरोबर संगीत मैफिलींना जाऊन शात्रीय संगीतातले नामवंत कलाकार, पं. भीमसेन जोशी, उस्ताद बडे गुलाम अली खान, पं. शिवकुमार शर्मा, पं. हरिप्रसाद चौरासिया, हिराबाई बडोदेकर अशा महान कलाकारांच्या स्वाक्षऱ्या मिळाल्या. त्यांचेही वेळो वेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत असे.

नंतर मी त्या स्वाक्षऱ्या वडिलांना व शेजारी श्री.शिद्धये यांना दाखवल्या तर त्यांनी अशाच मोठ्या लोकांच्या स्वाक्षऱ्या जमव असा सल्ला दिला. पुढे त्या सल्ल्याचे पालन करत व श्री शिद्धये यांच्या मार्गदर्शना खाली स्वाक्षऱ्या जमवू लागलो.

त्याच काळात साने गुरुजींचे पट्ट शिष्य श्री. प्रकाशभाई मोहाडीकर व त्यांचे काही मित्र राजा पाटील, राजा खोत, या मंडळीनी आम्हा लहान मुलांसाठी साने गुरुजी कथामाला नावाची एक संस्था सुरु केली होती. त्यांच्या तर्फे दर रविवारी सकाळी निरनिराळ्या प्रसिद्ध व्यक्ती गोष्टी सांगायला व इतर कार्यक्रमासाठी येत. त्यामुळे नकलाकार सदानंद जोशी, स्वतः प्रकाशभाई व काही प्रसिद्ध लेखकांना भेटून त्यांच्या स्वाक्षऱ्या मिळवता आल्या.

श्री. शिद्धये गुरुंबद्दल थोडेसे

शिवाय मी राहात असलेला शिवाजी पार्क परिसर निरनिराळ्या कार्यक्रमांसाठी प्रसिद्ध होता. १९५६मध्ये याच शिवाजी पार्कवर १२५ तास सतत सायकल चालवण्याचा जागतिक विक्रम प्रसिद्ध सायकल पटू आनंदराव हल्ल्याळकर यांनी केला. त्यांच्या विक्रमी सायकल चालवण्याच्या यशस्वी प्रयोगानंतर त्यांच्या वरळीच्या घरी जाऊन त्यांची स्वाक्षरी मिळविण्याची संधी मला श्री शिद्धये गुरुमुळे मिळाली. या दरम्यान त्यांनी मला मी कोणाची स्वाक्षरी घ्यावी, कशावर घ्यावी, ती कशी जपून ठेवावी याबद्दल वेळो वेळी मार्गदर्शन केले. कोणाकोणाच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात हे सांगताना खूप महत्वाची व आज ६० वर्षा नंतरही खूप महत्वाची व फायद्याची ठरलेली गोष्ट सांगितली. व ती म्हणजे स्वाक्षऱ्या फक्त क्रिकेट पटू वा सिने नटांच्याच न घेता लेखक, कवी, सामाजिक कार्यकर्ते, संगीतकार, चित्रकार, लष्कर अधिकारी, राजकीय पुढारी, कलाकार अशा अनेकविध क्षेत्रा-

तील देशविदेशच्या मान्यवरांच्याही घ्याव्यात. शिवाय स्वाक्षरीसाठी मान्यवर निवडताना अशांची निवड करावी कि त्यांचे नाव सांगितल्यावर हे कोण असा प्रश्न विचारणार नाहीत. एवढ्या सल्ल्यावरच न थांबता ते स्वतः अशा मान्यवरांची माहिती मला सांगत, वर्तमानपत्र नि मासिकातून ही माहिती शोधायला लावत. पुढे त्यांनी मला मुंबईचा भूगोल समजावून निरनिराळ्या ठिकाणाची, तेथे रेल्वे वा बस ने कसे पोहोचायचे याचीही माहिती दिली. स्वाक्षरी घ्यायला जाताना करायची तयारी, पाळायची शिस्त, त्यावेळी करायचे कपडे, याचीही माहिती दिली. तसेच मुंबईत किवा भारतात जर कोणी महान व्यक्ती येणार असेल व त्यांच्यापर्यंत पोहोचणे शक्य नसेल तर त्यांना पत्रे कशी लिहायची, त्याचा मसुदा, ती कोणत्या पत्त्यावर टपालाने कशी पाठवायची, उत्तरासाठी आपल्या नाव पत्त्याचे पाकीट पाठवताना परतीचा टपालखर्च कसा सोबत जोडायचा, विदेशात पत्र लिहिण्यासाठी काय पद्धत असते, आधी सगळ्या गोष्टींचा परिचय करून दिला.

१९५८-५९ साली अलेक्झांडरच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडिजचा क्रिकेट संघ भारताच्या दौऱ्यावर आला असताना त्यांना मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडीयमच्या पत्त्यावर अख्ख्या संघाच्या स्वाक्षऱ्यांसाठी विनंती पत्र पाठवतानाही त्यांनी दिलेली माहिती, पुढे आयुष्यभर आणि आताही उपयोगी पडत आहे. त्या पत्राच्या उत्तरात हंट, विक्स, स्मिथ, गिब्स, सोबर्स, हॉल व रामाधीन अशा मातब्बरांच्या स्वाक्षऱ्या होत्या. त्यामुळे पत्राला उत्तर आल्याचा नि त्यात अश्या मौल्यवान स्वाक्षऱ्या असल्याने मला दुहेरी आनंद झाला व परिणामी स्वाक्षऱ्या जमविण्याचा उत्साह द्विगुणीत झाला. गुरूंचे आभार मानावे तेवढे थोडेच !

बाकी इतिहास

याच सुमारास १९५८-५९मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ जोरात सुरु होती. त्या निमित्ताने शिवाजी पार्कवर एस.एम.जोशी, आचार्य अत्रे, कॉम्रेड डांगे, अरुणा असफअली, अशा नेत्यांच्या सभा होत. त्यावेळी सभेनंतर रंगमंचाच्या मागे जाऊन त्यांच्या स्वाक्षऱ्या घेत गेलो. एकदा याच संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी निधी गोळा करण्यासाठी प्रसिद्ध शाहीर अमरशेख भर पावसात रस्त्याने पोवाडे गात फेऱ्या नेत असत. त्यावेळी पेटीत निधी टाकल्याशिवाय स्वाक्षरी देणार नाही असे त्यांनी सांगितल्यावर घरून दळणासाठी घेऊन निघालेले २५ पैशाचे नाणे पेटीत टाकून त्यांची स्वाक्षरी घेतली.

त्या काळात दरवर्षी उन्हाळ्यात दादरच्या अमर हिंद मंडळात वसंत व्याख्यानमाला होत असे. हे १० दिवस म्हणजे मला स्वाक्षरी संग्रहासाठी पर्वणीच असे. कारण या निमित्ताने मराठीतील उत्तमोत्तम लेखक, कवी, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, काही कलाकार,यांची भाषणे व मुलाखती होत, त्या संपल्यावर रंगमंचाच्या मागे त्यांचे चहापान चालू असताना त्यांच्या स्वाक्षऱ्या घेत असे. त्यात अत्रे, वि.स.खांडेकर, ना.सी. फडके, कवी त्रिकुट,पाडगावकर, करंदीकर, बापट, वि.आ.बुवा अशा मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या मिळाल्या. त्यात काहींनी संदेशही लिहून दिले. पाडगावकरांनी लिहिले,जागा, जगवा, बापटांनी लिहिले- ती जनता अमर आहे. तर करंदीकरांनी लिहिले- एकच आहे मानव्याचा सिंधू, वि.आ बुवांनी लिहिले- तुम्हीही स्वाक्षरी देण्याइतके मोठे व्हा. एकूणच सर्वकाही उत्साहित करणारे व प्रेरणादायी होते. कलेकलेने चंद्र वाढावा तसा एकेका स्वाक्षरीने माझा संग्रह वाढत होता.

याच अमर हिंद मंडळात एकदा भारताचे पहिले अर्थमंत्री डॉ. सी.डी. देशमुख यांचे अर्थसंकल्प या विषयावर भाषण होणार होते. त्यांच्या स्वाक्षरीसाठी तेथे गेलो असताना त्यांनी प्रथम नकार दिला. नंतर दोन अडीच तासांचे ते अगम्य भाषण ऐकले व भाषणानंतर त्यांना भेटून स्वाक्षरीसाठी विनंती केली पण तरीही त्यांनी मला स्वाक्षरी दिलीच नाही. मी खूप नाराज झालो. कारण खूप दिवसांपासून या विद्वान मान्यवरांची स्वाक्षरी घेण्याचे मी मनात घोकत होतो. पण त्यांची प्रत्यक्ष भेट होऊनही स्वाक्षरी मिळाली नाही.
अर्थसंकल्पा वरील अगम्य भाषण ऐकण्याची शिक्षा भोगूनही. तेव्हा स्वाक्षरी संग्रह करणे थांबवावे असेही वाटून गेले. पण.......
एका रविवारी जेवण करून गॅलरीत उभा असताना शिद्धयांनी मला वही नी पेन घेऊन समोरच्या पेट्रोल पंपावर जायला सांगितले व लाल गाडी जवळील पांढऱ्या बुशकोट मधील त्या माणसाची स्वाक्षरी घेण्यास पाठवले. परत आल्यावर स्वाक्षरी वाचली तर ती चक्क चित्रपट अभिनेता गुरुदत्तची होती नी असेच एका दुपारी घराखालील शेटे हॉटेलमध्ये जेवत असणाऱ्या बिमल रॉय यांची स्वाक्षरी घेतली.
एकदा रात्री १२.३० वाजता ब्राह्मण सहाय्यक संघात कुमार गंधर्वांची मैफिल संपवून घरी परत येत असताना समोरच्या गृहस्थांचा लांडा पायजमा व डाव्या खांद्या वरील बटन पट्ट्याचा झब्बा पाहून ते गृहस्थ प्रसिद्ध कादंबरीकार रणजीत देसाई असल्याचे ओळखले. मी रस्त्यातच त्यांना थांबवून नमस्कार केला नी दोन मिनिट थांबाल का, मी वही नी पेन घेऊन येतो आपल्या स्वाक्षरीसाठी? अशी विनंती केली. ते कबूल झाले, मी वरून वही नी पेन आणले नी भर रस्त्यात रात्री पाऊण वाजता त्यांची स्वाक्षरी घेतली.

अशा घटना घडत घडत मी स्वाक्षऱ्या जमा करू लागलो. मात्र एक पक्के ठरवले धीर नी संयम सोडायचा नाही. स्वाक्षरी मिळाली म्हणून हुरळायचं नाही नी मिळाली नाही म्हणून नाराज व्हायचं नाही. प्रयत्न चालूच ठेवायचे !

*

जयप्रकाश नारायण



नरेंद्र मोदी



मारीयो मिरांडा यांची
चित्रांकित स्वाक्षरी



सॅम माणकेशा

सॅम माणकेशा यांची सही घेताना लेखक

व्हि. व्हि . गिरी यांची स्वाक्षरी घेताना लेखक

मंगेशकर कुटूंबीयांच्या स्वाक्षऱ्या

जे.आर.डी.टाटा

नील आर्मस्ट्राँग, मायकेल कॉलिन्स, एडविन अलर्डिन



मदर तेरेसा यांची स्वाक्षरी घेताना लेखक

२.
स्वाक्षरी संग्रहविषयी

१९५४ मध्ये सुरु केलेल्या या स्वाक्षरी संग्रहाला आता सत्तर वर्षं पूर्ण झाली. यात देश विदेशाचे राष्ट्राध्यक्ष व पंतप्रधान, नोबेल पारितोषिक विजेते, भारत रत्न, चंद्रवीर, एवरेस्ट विजेते, स्वातंत्र्यसैनिक, लष्करप्रमुख, उद्योगपती, पक्षीतज्ञ, मानवी संगणक, चित्रकार, लेखक, कवी, संपादक, नाटककार, व्यंगचित्रकार, यापासून क्रिकेटपटू व सिनेकलावंत यापर्यंत २२०० हून अधिक मान्यवरांच्या स्वाक्षऱ्यांचा समावेश आहे.

या संग्रहाची आतापर्यंत ९ प्रदर्शने (३-३ दिवसांचे वन मन शोज) मुंबई,नागपूर, पुणे, येथे भरविली आहेत. तसेच या प्रदर्शनात स्वाक्षऱ्यांबरोबरच काही मान्यवरांच्या सोबतची त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतानाची छायाचित्रेही आहेत जी पाहून प्रेक्षकांना वेगळाच आनंद मिळतो.

अशा स्वाक्षऱ्यांनी छायाचित्रांच्या स्लाईडस करून त्यांचे स्लाईड अंड टॉक शोज असे ४० हून अधिक कार्यक्रम मुंबईत, ठाणे, विलेपार्ले, मुलुंड, येथे केले तर परदेशी दुबई, शारजा, अबुधाबी, बँकॉक,अटलांटा येथे केले आहेत व त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या माझ्या संग्रहाची लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स च्या १९८९ च्या पहिल्या आवृत्तीत नोंद होऊन गौरवले गेले होते.

*

▲ लेखक माधुरीसह

▲ माधुरीची स्वाक्षरी

▲ वैजयंतीमाला

▲ रजनीकांतयांची स्वाक्षरी

▲ रजनीकांत लेखकासह

▲ गुलजार यांची स्वाक्षरी घेताना लेखक



▲ सत्यजित रे



▲ गुलजार

▲ नर्गिस आणि सुनील दत्त यांची स्वाक्षरी घेताना लेखक



लालबहादूर शास्त्री



वि.वा शिरवाडकर

भीमसेन जोशी

भीमसेन जोशी यांची स्वाक्षरी घेताना लेखक



सर एडमंड हिलरी

वि.वा. शिरवाडकर यांची स्वाक्षरी घेताना लेखक

एश्वर्या राय

प्रिती झिंटा

ऐश्वर्या राय



अमिताभ यांची स्वाक्षरी घेताना लेखक

आमिर खानयांच्यासह लेखक

आमिर खान



मन्ना डे



गुरूदत्त

रेने फ्रँक

मोहम्मद रफी

३.
स्वा. सावरकरांच्या स्वाक्षरीची गोष्ट

१९५५ साली १४ जानेवारीला संक्रांतीच्या दिवशी आईने सांगितले, स्वा. सावरकर आपल्या घरा शेजारीच राहतात. त्यांना तिळगुळ दे आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन ये. खाली वाकून नमस्कार करायला विसरू नकोस. त्यांचे घर ५-६ बिल्डींगच पलीकडे होते. मी वाटीत तिळगुळ घेऊन त्यांच्या बिल्डींग पाशी पोहोचलो. आत शिरलो ते बाहेरच्या हॉलमध्ये धोतर झब्बा घातलेले स्वातंत्र्यवीर! त्यांचा फोटो जरी काळा कोट नी उंच काळी टोपी असाच पाहिलेला होता तरीही त्यांच्या चेहऱ्यावरील तेजामुळे त्यांना ओळखायला वेळ लागला नाही. इंग्रजांविरुद्ध एवढ्या कणखरपणे लढा देणारे, अंदमानच्या तुरुंगात कित्येक वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा भोगून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या बहुमोल जीवाचे बहुमोल योगदान देणारे, मार्सेलच्या खाडीत ऐतिहासिक उडी मारून इंग्रजांच्या हातावर तुरी देणारे, हिंदुत्वाचा प्रखर अभिमान बाळगणारे, लेखण्या टाकून बंदुकी हातात घ्या असा मंत्र देणारे इतके धडाडीचे एक ज्वलंत हिंदू स्वातंत्र्य सेनानी असे व्यक्तिमत्व आता समोर शांतपणे पेपर वाचत बसले होते आणि मी त्यांच्यापासून फक्त काही फुट अंतरावर होतो, यावर स्वतःला चिमटा

वि. दा. सावरकर
INDIA
BOMBAY G.P.O.
28-5-70
V.D. SAVARKAR

घेऊनही माझा माझ्यावर विश्वास बसत नव्हता. त्यांच्याशी काय बोलावे हे न सुचल्याने घशाला कोरड पडली होती, तरीही प्रयत्न करत मी परवानगी विचारून आत गेलो व लगेच खाली वाकून नमस्कार केला. मी कोण, कुठून आलो, काय काय काम आहे याची त्यांनी विचारपूस केली.मी जवळच राहतो, आज संक्रांत असल्याने आईने आपल्याला तिळगुळ देऊन आपला आशीर्वाद मिळवायला सांगितले असे सांगून मी त्यांच्या हातावर वाटीतला तिळाचा लाडू ठेवला नी पुन्हा वाकून नमस्कार केला. त्यांच्या हाताचा तो पुसटसा स्पर्श देखील माझ्या अंगात वीज चमकवून गेला. मग मी माझ्या जवळील वही नी पेन्सील पुढे करून त्यांना मला आपल्या स्वाक्षरीचा तिळगुळ मिळेल का? असे नम्रपणे विचारले, त्यांनी वही घेऊन स्वतः स्वाक्षरी केली. मी पुन्हा त्यांना नमस्कार केला नी बाहेर पडलो.

घरी परत येईपर्यंत आपण काय केले कोणाला भेटलो याचा पार अंदाज आला नाही. पण नंतर आई वडिलांनी ज्या प्रकारे मला शाबासकी दिली माझे नी माझ्या धाडसाचे कौतुक केले आणि शेजारच्या गुरुंनी पाठीवर शाबासकी दिली तेव्हा थोडे कळले. नंतर मी घरी येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला ती स्वाक्षरी दाखवून खूप भाव खात होतो.

पुढे १९६७ साली त्यांचे दुःखद निधन झाले अशी बातमी ऐकली तेव्हा डोळ्यात टचकन पाणी आले. त्यांच्यावरील प्रत्येक पेपरमधले अग्रलेख वाचून ते किती महान होते, याची प्रचिती आली. पण १९४७ नंतर इतक्या महान स्वातंत्र्यवीराला किती मानसन्मान मिळाला, किंबहुना काँग्रेसच्या व दिल्लीच्या सरकार दरबारी काय किंमत होती हे पाहून खूप वाईट वाटले. २०१० साली त्यांच्या मार्सेलच्या तिहासिक समुद्र उडीला १०० वर्षं झाली तेव्हा एका समारंभात एका व्यक्तीने आपल्या भाषणात खेद व्यक्त करत म्हटले कि स्वातंत्र्यवीर भारतात जन्मले हे त्यांचे दुर्भाग्य होते. इतर देशात त्यांना राष्ट्रपती बनवले गेले असते. पण त्यांना याची पर्वा नव्हती. त्यांना आयुष्यभर फक्त मातृभूमीचीच काळजी होती, तिच्या स्वातंत्र्याचा ध्यास होता. ते स्वातंत्र्य मिळवले नी मग ते थोडे समाधानी झाले.

त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ भारत सरकारने एक टपाल तिकीट जारी केले. मी स्वाक्षऱ्यांप्रमाणेच टपाल तिकिटांचाही संग्रह करत असल्याने कोणत्याही तिकिटाच्या जारी होण्याच्या प्रथम दिवस आवरणाचे व त्यावर मिळणाऱ्या तिकिट रद्द करण्याच्या खास शिक्क्याचे महत्व गुरु कडून ऐकून होतो. त्यात त्यांनी मान्यवराच्या स्वाक्षरी शेजारी त्याचे तिकीटही लावून रद्द करून घेऊन त्याचे दुहेरी महत्वाबद्दल सांगितले. मी स्वातंत्र्यवीरांच्या तिकीट जारी होण्याच्या पहिल्याच दिवशी पोस्ट ऑफिसात जाऊन त्यांच्या स्वाक्षरी शेजारी त्यांचे तिकीट चिकटवून त्यावर प्रथम दिवसाचा रद्द करण्याचा खास शिक्का मारून घेतला. त्यामुळे त्या कार्डला दुहेरी महत्व प्राप्त झाल्याच्या समाधानाने घरी परतलो.

नंतर १९६९मध्ये एका शनिवारी मी ते कार्ड ऑफिसमध्ये दाखवायला व भाव खायला घेऊन गेलो. सगळ्यांनी कौतुक केल्याने अंगावर मुठभर मांस चढवून ते कार्ड एका पुस्तकात घेऊन दुपारी घरी यायला निघालो. पण



Dear Celebrity, kindly send me your originally autographed photo to adorn my 50 years' collection furthermore! Thank you!

Vijay Deshpande's

AUTOGRAPH COLLECTION

COLLECTOR'S BIODATA

Vijay Deshpande

Email : sovijaydesh@yahoo.com

START & GROWTH

- At the age of 12, started with autographs of Y. B. Patwa, M. S. Patil, N. S. Tamhankar
- Later on continued to pursue in person, by post or by gifts from well wishers.

COLLECTION'S STATISTICS

Approx. Total 1800 and photos with Celebrities - 800

Politics - 175, Literature - 175

Music - 300, Sports - 600,

Misc. - 150, By Post - 300,

As Gifts - 50

PECULIARITIES

Best wishes, Poems, Cartoons, Pictures, Sketches of Musical Instruments, Photos, Press Cuttings, FDC's & First Flight Covers, Mini Bat, Tennis Balls, Show Tickets, being autographed by concerned celebrities.

JUST MISSED

- Failing to get autograph of Sai Gandhi, Yuri Gagarin, Prince Charles, Amartya Sen inspite of meeting them.
- Missing the autographs of Sir Frank Worrell, Homi Bhabha as could not meet them.
- Refusing to sign by Richie Benaud, C. Rajagopalachari, Gulzar
- Losing a book containing 50-60 valuable autographs.

HAPPY MOMENTS

- Easily succeeding in getting autographs of JRD Tata, Mother Teresa, Ms. Pearl Buck, Ustad Bismillah Khan, Yehudi Menuhin.
- Nobody else to be present to welcome Sir Edmund Hillary
- A 20 minutes interview with Pele.

ACHIEVEMENTS

- One man show of collection (3 in Mumbai & 2 in Nagpur)
- Inclusion & recognition to collection in First edition of Limca Book of Records.
- Publishing a collection of copies of autograph of Marathi celebrities "PRATISANGRAH"
- Interviews in "Mukta Vegal Manase" and extensive coverage thru Press & TV

FUTURE PLANS / PROJECTS

- Hold one man show regularly in India & abroad
- Have "Slides & Talk Show" for needy institutions or "National Relief Funds"
- Publish a book on collection and experiences.

चर्चगेट स्टेशनवर माझ्या लक्षात आले कि हातातील पुस्तकात ते कार्ड नव्हते. माझा लगेच आवाज बदलला नी चेहरा पडला. ते पाहून बरोबरच्या मित्राने (किशोर उलकंदे ने) विचारले काय झाले. मी त्याला पुस्तकात ते बहुमुल्य कार्ड नसल्याचे सांगितले. तो म्हणाला, ते ऑफिसमध्ये टेबलाच्या खणात असेल. मी त्याला ते नक्की पुस्तकात ठेवल्याचे सांगितले. त्याने सोमवारी पाहू असे म्हटले. पण मला धीर नव्हता. मी त्याला म्हटले, तू घरी जा पण मला चैन पडणार नाही. मी जाऊन पाहतो. तोही बरोबर आला. आम्ही ऑफिस च्या समोर आलो. तर फुटपाथच्याकडेने पाण्याचा ओघळ चालला होता व त्यावर तरंगत असलेले एक पाकीट पाहिले. ते पाकीट मला परिचित वाटल्याने मी ते उचलले आणि उघडून पहिले तर आत ते बहुमुल्य कार्ड दिसले. ज्यावर स्वा. ची स्वाक्षरी नी ते टपाल तिकीट सुरक्षित होते. ते पाहिले नी मी एक सुटकेचा श्वास सोडला. नी लगेच माझ्या चेहऱ्यावरील भाव बदलले. ते पाहून किशोरही खुश झाला. व म्हणाला, विजय बघ,आज सावरकर पाण्यातून दुसऱ्यांदा वाचले. मला तर आनंदाने रडूच आले. मी त्याला खुशीने मिठीच मारली नी मनात देवाचे नी किशोरचे पुनः पुनः आभार मानले. तो आनंद आज मी शब्दात व्यक्तच करू शकत नाही. आजपर्यंतच्या आयुष्यातला हा सर्वात महत्वाचा नी आनंदाचा क्षण होतं. एक तर स्वातंत्र्यवीरांची स्वतः घेतलेली स्वाक्षरी, त्यावर त्यांचे महत्वाचे टपाल तिकीट व त्यावरील प्रथम दिवसाचा शिक्का. यामुळे ती मला खूप महत्वाची होतीच. पण आता हरवली असताना पाण्यातून वाचली असल्याने ती आता ५७ वर्षांनंतर तर ती मला अधिक महत्वाची व अभिमान वाटावी अशी वाटते.

*


RECORD HOLDER
Limca
BOOK OF RECORDS

Limca
BOOK OF RECORDS
[INDIAN RECORD]

VIJAY DATTATRAYA DESHPANDE
Of BOMBAY (MAHARASHTRA) India
is credited with having the largest collection of over 1400 autographs of eminent persons from all over the world.
Date NOVEMBER 22, 1989

Member Secretary

The Gulf Today

High-flying collector shows signs of the times

गल्फ टुडेमध्ये प्रसिध्द झालेला लेख

लेडी बर्डन पॉवेल

४.
काही महत्वाच्या स्वाक्षरीची भर

स्वाक्षरी संग्रह सही सहीने सही दिशे-ने वाढत होता. निरनिराळ्या क्षेत्रातील दिग्गजांच्या स्वाक्षऱ्या मिळवत गेलो. त्यात उद्योगपती शं.ल.किर्लोस्कर, हृदयशल्य चिकित्सक डॉ.क्रीस्तीय बर्नार्ड,हरित क्रांतीचे जनक जागतिक कीर्तीचे नोबेल पारितोषिक विजेते नॉर्मन बोरलॉग, राज्यपाल अलियावर जंग, अशा एका मागून एक महत्वाच्या स्वाक्षऱ्यांची संग्रहात भर पाडत होतो.

१९६७-६८ साली जर्मन संगीत दिग्दर्शक बेथोवेन यांच्या २०० व्या जयंती निमित्त नवीन टपाल तिकीट एअर इंडियाचे संचालक जे.आर.डी टाटा यांच्या हस्ते कुलाब्याच्या ती आय एफ आर च्या सभागृहात जरी होणार असल्याचे पेपरमध्ये वाचले. मी तेथे

पोहोचलो व कार्यक्रमानंतर उद्योगपती जे आर डी. ची स्वाक्षरी मिळवली व तेथील फोटोग्राफरला त्या क्षणाचा फोटोही काढायला सांगितला. केवळ टाटा समूहातील एक उद्योगपतीच नव्हे तर भारताच्या विमान सेवेचे जनक व पितामह जे आर डी बरोबरचा फोटोही देखील मला खूप अभिमानाची गोष्ट वाटत होती.

टपाल तिकिटे जारी होण्याच्या दिवशीची प्रथम दिवस आवरणे याप्रमाणेच एअर इंडिया त्या काळात जेव्हा नवनवीन देशातील शहरांना विमानसेवा सुरु करू लागले तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ प्रथम उड्डाण आवरणे प्रसिद्ध करू लागली. त्या पैकी मॉस्को, नैरोबी, मॉरिशियस,अशा काही शहरांची प्रथम उड्डाण आवरणे मी विकत घेतली. खरं तर माझ्या आयुष्यातील रु.१५०/- च्या पहिल्या पगारातील रु. ६०/- मी ती आवरणे घेण्यासाठी खर्च केले होते. (माझ्या हिशोबी तर तो खर्च नसून ती बचत होती. पण ते सर्वांना कळणे कठीण होते, नी माझ्या एका मैत्रिणीला ते समजणे तर केवळ अशक्यच होते.)

काही दिवसांनी मॉरिशियस चे पंतप्रधान डॉ. शिवसागर रामगुलाम मुंबईत आल्याचे पेपरमध्ये वाचले. मग त्यांच्या स्वागतासाठी एक समारंभ इरॉस सिनेमा गृहामागील एका हॉटेलात होणार असल्याचे वाचले. मी तेथे वेळेआधीच पोहोचलो व एअर इंडियाच्या प्रथम उड्डाण आवरणावर त्यांची स्वाक्षरी घेतली. त्यामुळे त्या पाकिटाला प्रथम उड्डाण आवरण नी त्यावर मॉरिशसच्या पंतप्रधानाची स्वाक्षरी असे दुहेरी महत्व प्राप्त झाले.

त्याच सुमारास स्काउट ॲन्ड गाईड्स या आंतरराष्ट्रीय उपक्रमाच्या संस्थापिका ऑस्ट्रेलियातील लेडी बेडन पॉवेल मुंबईत आल्या होत्या. या निमित्त स्काउटॲन्ड गाईड्स या उपक्रमाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने भारत सरकार एक विशेष टपाल तिकीट त्यांच्या हस्ते एका समारंभात जारी करणार होते. मी ते तिकीट व त्याचे प्रथम दिवस आवरण मिळवले नी समारंभानंतर स्टेजवर जाऊन त्या बाईंची स्वाक्षरी घ्यायला गेलो. पण मिळाली नाही. म्हणून त्यांच्या वास्तव्याचा पत्ता शोधला. तर त्या सरकारी पाहुण्या असल्याने राजभवनात राहात असल्याचे कळले. मी माझा मोर्चा राजभवनाकडे वळवला. तेथील सुरक्षाचक्रामुळे मला आत जाता येईना. म्हणून तेथील सुरक्षा अधिकाऱ्यांना भेटलो. तर त्यांनी माझ्या दोन्ही वह्या व दोन दिवस आवरणे ठेऊन घेतल्या. ते स्वाक्षऱ्या घेण्याची व्यवस्था करतील व मी त्या वह्या व दोन प्रथम दिवस आवरणे दुसरे दिवशी परत नेऊ शकेन असे आश्वासन दिले व मला परत पाठवले. रात्रभर मला झोप लागेना. त्यांची स्वाक्षरी नाही मिळाली तरी माझ्या वह्या व प्रथम दिवस आवरणे सुखरूप असावीत व मला परत मिळवीत अशी प्रार्थना करत होतो. मला काळजी वाटत होती पण विश्वास ठेवणे भाग होते. दुसरे दिवशी मी पुनः राजभवनातील त्या सुरक्षा अधिकाऱ्यांकडे गेलो तर त्यांनी माझ्या दोन्ही वह्या नी प्रथम दिवस आवरणे परत केली ज्याच्यावर लेडी बेडन पॉवेल यांची स्वाक्षरी होती, वह्या नी पाकिट परत मिळाल्याच्या नी स्वाक्षरी मिळाल्याचा मला खूप आनंद झाला.

*

५.
डॉ. सी.डी.देशमुखांची मनधरणी.

स्वातंत्र्य भारताचे पहिले अर्थमंत्री अर्थतज्ज्ञ डॉ. चि. द्वा. उर्फ सी.डी.देशमुख यांच्या स्वाक्षरीसाठी मी केलेला पहिला प्रयत्न असफल झाला होतं. पण ते इतके महान व्यक्तिमत्व होते कि अशी हार मानणे मला परवडणारे व शक्यही नव्हते. मागे अर्थसंकल्पा वरील अडीच तासांचे भाषण ऐकण्याचे कष्ट घेऊन स्वाक्षरी न मिळाल्याचे एक गृहस्थाना सांगितल्यावर ते म्हणले विजय, ती आशा तू सोडून दे कारण ते कोणालाच स्वाक्षरी देत नाहीत. तसा त्यांचा नियम आहे. मग तर मी जिद्दीने पेटून उठलो व ठरवले कि प्रयत्न सोडायचे नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाकडे मी नेहमी लक्ष ठेऊन असे.
असेच एकदा एका दिवशी सायंकाळी ७ वाजता ते एका भोजनासाठी चर्चगेट येथील ॲम्बॅसिडर हॉटेलमध्ये येणार असल्याचे वाचले. मी ते येण्या आधीच तिथे पोहोचलो. मला कोणत्याही कार्यक्रमाचे कधीही निमंत्रण नसे. त्यामुळे कार्यक्रमाच्या जागी आत शिरकाव करून घ्यायचो. तसा मी त्या हॉटेलच्या गच्चीवर जाऊन एका कोपऱ्यातल्या एका खुर्चीत जागा पटकावली. डॉ. तेथे आले. त्यांचे हार व पुष्पगुच्छांनी स्वागत झाले. नंतर त्यांचे २०-२५ मिनिटे भाषण झाले व मग सर्व निमंत्रित भोजनासाठी उठले. मीकडेकडेने वाट काढत स्टेजजवळ गेलो. व एक योग्य संधी साधून डॉ. ना स्वाक्षरी देण्याची विनंती केली. पण त्यांनी त्यांच्या रिवाजाप्रमाणे नकार दिला व कोणा बरोबर तरी बोलण्यात व्यस्त झाले. भोजन सुरु झाल्यावर मी तेथून काढता पाय घेतला.

खाली आलो नी विचार केला कि दीड दोन तास तरी भोजनाचा कार्यक्रम चालणार.मग आपण नंतर यावे. म्हणून घरी फोन करून उशीर होईल असे कळवले व आजूबाजूला वेळ काढत फिरत राहिलो. साधारणपणे रात्री साडेअकराच्या सुमारास काही लोकांना खाली येताना पहिले. म्हणून एकाला विचारून कार्यक्रम संपला असल्याची खात्री करून घेतली व ६ मजले चढून गच्चीवरील शामियान्यात पोहोचलो. तिथे डॉ. ना गप्पा मारताना पाहिले. मी आणखीन थोडा वेळ काढला व थोडे मोकळे असताना त्यांना स्वाक्षरी देण्याची विनंती केली. पण तेव्हाही त्यांनी नकार घंटाच वाजवली. मग यजमानांचा निरोप घेऊन जेव्हा ते खाली येण्यास लिफ्टपाशी आलो तेव्हाही मी प्रयत्न केला पण यश मिळाले नाही. लिफ्टमध्ये मी आत घुसून त्यांच्याच बरोबर खाली येत होतो तेव्हा २-४ वाक्यात मला स्वाक्षरी का पाहिजे हे त्यांना पटविण्याचा प्रयत्न करत होतो. तर ते म्हणाले मी कधीही कोणालाही स्वाक्षरी देत नाही. सॉरी.

लिफ्ट तळमजल्यावर आली तेव्हा त्यांच्या पाठोपाठ मी बाहेर पडलो. ते जेव्हा गाडीची वाट पाहत होते तेव्हा मी पुनः विनंती केली. आणि काय चमत्कार झाला माहित नाही. रात्रीचे जवळ जवळ १२ वाजून गेले होते. मला इतके वेळा नाही नाही म्हणून ते ओळखायला लागले होते. शेवटी कंटाळून कि काय त्यांनी माझ्या हातातली वही घेतली. मी घाबरलो. वही रागाने फेकून तर देणार नाहीत ना अशी भीती वाटली. पण त्यांनी आपल्या जोधपुरी कोटाच्या खिशातील सोनेरी (पार्कर असावे) पेन काढले नी मला एकदाची स्वाक्षरी दिली. माझे नशीब फळफळले.माझ्या विश्वासच असेना. मी तर चक्क त्यांना खाली वाकून नमस्कार केला. व मनोमन आभार मानले. गाडी आल्यावर ते निघून गेले, गाडीत बसताना बहुतेक माझ्यापासून सुटका झाल्याचा श्वास घेत गेले असतील.

पण त्या वेळी स्वाक्षरी घेताना एक फोटोचा फ़्लॅश झाल्याचे कळले होते. म्हटला त्या फोटोग्राफारने डॉ. चा फोटो काढला असेल. पण तो माझ्याजवळ येऊन म्हणाला कि त्याने डॉ. बरोबर माझाही फोटो काढला आहे. दुसरे दिवशी कॉपी देऊ शकेन. मी त्याचे पैसे विचारले तर तो म्हणाला ३ रुपये पडतील. मी फोटो घेण्यास कबूल झालो व त्याला माझा नाव व ऑफिस पत्ता दिला. पण स्वाक्षरी मिळाल्याच्या आनंदात मी फोटोचे विसरूनही गेलो. अशी केली खूप मेहनतीने डॉ. सी.डी.देशमुख यांची मनधरणी. दुसऱ्या दिवशी दुपारी ४ च्या सुमारास तो फोटोग्राफर माझा पत्ता हुडकून काढत ऑफिसमध्ये आला व मला एक पाकीट दिले, त्यात मी डॉ. ची स्वाक्षरी घेतानाचा क्षण त्याने अचूक टिपला होता. तो फोटो पाहून मी खूप खुश झालो. त्याला पाठवल्यानंतर पेपर पाहून डॉ.चा आज काही कार्यक्रम आहे का शोधले. तर ते ६ वाजता कुठे तरी जाणार होते. मी ऑफिस सुटल्यावर बाहेर पडलो. व सचिवालय मागील बँक हाउस येथे पोहोचलो जेथे डॉ. मुंबईत असताना आपल्या भावाकडे राहतात असे ऐकले होते. मी तिथे पोहोचलो तर एक काळी गाडी पोर्चमध्ये उभी होती व त्यात डॉ. बसत होते. मी पुढे जाऊन त्यांची माफी मागितली. त्यांनी मला कालचा छळवादी मुलगा म्हणून ओळखले असणार. ते म्हणाले तुम्ही पुन्हा इथे? तर मी त्यांना तो फोटो दाखवला. हा कधीच फोटो? त्यांनी कुतूहलाने विचारले. मी म्हटलं काल

रात्रीचा. ॲम्बॅसिडर हॉटेल मधला. मग त्यावर स्वाक्षरी करण्याची त्यांना विनंती केली. आणि अहो आश्चर्यम. त्यांनी कोणतेही आढे वेढे ना घेता लगेच त्यावर स्वाक्षरी केली व तारीखही लिहून दिली व स्मित हास्य करत गाडीत बसून निघून गेले. कदचीत त्यांच्या त्या हास्यातून एका चिवट पण प्रामाणिक स्वाक्षरी संग्राहकाला स्वाक्षरी दिल्याचे समाधान व्यक्त केले असेल. पण मी मात्र खूपच समाधानी होतो.



सी.डी. देशमुख यांची स्वाक्षरी

मी घरी आल्यावर गुरुंना तो प्रकार सांगितला नी फोटो दाखवला तर त्यांनी सांगितले, विजय तू असे फोटोही जमवायचा प्रयत्न कर कारण ते फोटो तू स्वतः या व्यक्तींना भेटल्याचे रेकॉर्डिंग व पुरावे राहतील. ते काय म्हणाले ते माझ्या लगेच लक्षात आले, व या फोटोपासून मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या घेतानाचे फोटोही साधण्याचा सिलसिला सुरु झाला.
आजपर्यंत संग्रही असे ५०० हून अधिक फोटो आहेत. ज्यात मी त्या त्या मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या स्वतः घेतानाचे क्षण टिपलेले आहेत व एका अर्थाने पुरावेही आहेत. स्वाक्षऱ्या जमवणारे बरेच भेटतात पण या पद्धतीच्या कल्पनेचा वापर करणारा व जमल्यास त्या फोटोवर पुन्हा त्या मान्यवरांची स्वाक्षरी घ्यायची हा पायंडा पाडणारा (उद्गाता) असा मी पहिलाच होतो.
नंतर त्यांच्या दुःखद निधनानंतर भारत सरकारच्या टपाल खात्याने त्यांच्या सन्मानार्थ एक टपाल तिकीट जारी करून त्यांचा विशेष गौरव केला. तेव्हा ते तिकीट त्या ऐतिहासिक फोटोवर लावून त्यावर प्रथम दिवस शिक्काही मारून घेतला व त्याचे महत्व आणखीन द्विगुणीत केले.

*

६.
देव आनंद नी पर्ल बक



पर्ल बक

१९६३-६४ मध्ये देवानंद यांनी गाईड नावाचा चित्रपट काढला. तो इंग्रजीतसुद्धा काढणार अशी जाहिरात वाचनात आली. आधीच सबकुछ देवानंद असा गाईड चित्रपट आणि तो इंग्रजीतसुद्धा त्यामुळे उत्सुकता वाढली होती. एक दिवस या गाईड चित्रपटाच्या इंग्रजी संवादसाठी अमेरिकेतील नोबेल पारितोषिक विजेत्या मिस पर्ल बक या काही दिवसांसाठी मुंबईत येणार असल्याचे वाचले. त्यांना त्यांच्या गुड अर्थ या कादंबरीसाठी नोबेल मिळाले होते. मग माझे लक्ष नी उत्सुकता त्यांच्या दिशेला वळली कारण तोपर्यंत माझ्या संग्रहात कोणीही नोबेल विजेत्यांची भर पडली नव्हती.

एके दिवशी या मिस पर्ल बक यांच्यासाठी ताज महाल हॉटेलमध्ये स्वागत समारंभ ठेवला असल्याचे कळले. मी त्या कार्यक्रमाचा तपशील नोंद केला, त्या नुसार विचार चक्रे फिरू लागली व त्या समारंभाला पोहोचण्याची आखणी करू लागलो. जणू काही पहिले आमंत्रण मलाच होते. कार्यक्रमाच्या आधीच ताजला पोहोचलो. आत शिरताना पोर्चजवळ गेटजवळच लाल तोकडी विजार, पिवळा गालेबंद उंच कॉलरचा शर्ट, कमरेला मोठा रुंद पट्टा नी केसांची झुलफे अशा रूपातला एक तरुण येरझाऱ्या घालताना दिसला. मला शंका आली म्हणून त्याला समोरून पाहिलं आणि खात्री पटली कि तो खुद्द देवानंदच होतं. मी लगेच त्याच्यापाशी जाऊन त्याला वही व पेन देत स्वाक्षरी

मागितली. पण त्याने सिने नटाला साजेसा भाव खात आय एम बिझी असे सांगत नकार दिला.

मी सरळ पहिल्या मजल्यावर जेथे कार्यक्रम होणार होतं त्या क्रिस्टल रूममध्ये जाऊन शेवटच्या रांगेतल्या खुर्चीवर जाऊन बसलो. पाहुणी बाई देवानंद बरोबर आली तेव्हा कळलं कि तो तिच्या या कार्यक्रमाचा यजमान म्हणजे मुख्य निमंत्रक होता. तिचे स्वागत झाले. दोघांची भाषणे झाली, गाईडच्या संवादाचे नमुनेही देवानंदने म्हणून दाखवले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शनाचे भाषण सुरु झाले तेव्हा मीकडेकडेने सरकत स्टेज पर्यंत जाऊन पोहोचलो. व कार्यक्रम संपल्याचे जाहीर होताच मी पर्ल बक बाईंना स्वाक्षरी ची विनंती केली. त्यांनी काहीही आढे वेढे न घेता एक स्वाक्षरी केली नी मला विचारले, आर यु हॅप्पी? मी लगेच हावरटासारखे वहीचे पुढचे पान उलटून आणखी एका स्वाक्षरीची विनंती केली.ती देखील त्यांनी मला दिली. त्यांनी मला विचारले, हॅव यु टेकन द ऑटोग्राफ ऑफ युवर स्टार? मी म्हटले, नो. ही इज टू बिझी. लगेच तिने स्वतः माझी वही नी पेन देवानंद समोर धरून विचारले, हाऊ अबाउट युअर ऑटोग्राफ, मिस्टर देव? त्याने वर पाहिले नी लगेच स्वाक्षरी दिली. त्याला काय वाटले, मला माहित नाही, पण मला मात्र महत्वाच्या दोन स्वाक्षऱ्या मिळाल्याचा खूप आनंद झाला होता. पुढे काही वर्षांनी या पर्ल बक बाईंची ती स्वाक्षरी मी एका मित्राला दाखवली तर त्याने ही पर्ल बक कोण? असे मला विचारले, मी तिला तिच्या गुड अर्थ कादंबरीमुळे नोबेल मिळाले असल्याचे सांगितले. पण त्याला काही आठवेना. मग मी त्याला तिची ओळख देण्याचा प्रयत्न केला. अरे देवानंदचा तो गाईड सिनेमा आला होता नी त्याचे संवाद इंग्रजीत तिने भाषांतरीत केले होते. हे ऐकताच त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तो देवानंद च्या गाईड मुळे. पुढे मला कळले कि या महाशयाने इंग्रजी विषय घेऊन एम.ए. केलेले होते.

*



देव आनंद



७.
बालगंधर्वांच्या स्वाक्षरीला असा मुकलो

एकदा तीन दिवसांचा महाराष्ट्र राज्य नाट्य -चित्रपट महोत्सव दादरच्या डिसिल्वा हायस्कूलच्या पटांगणात होणार होता. त्यासाठी पहिल्यांदाच संध्याकाळी नटश्रेष्ठ बालगंधर्व व इतर या नाट्य चित्र व्यवसायातले बरेच मोठे कलाकार येणार होते. तेव्हा मला कळले कि प्रकृती अस्वाध्यामुळे बाल गंधर्वांचे गायन प्रथम होणार होते.

एक दोन घोषणानंतर कार्यक्रम सुरु होण्याची कल्पना आली. एवढ्यात दोघा जणांनी कोणाला तरी उचलून आणून स्टेजच्या मध्यभागी मायक्रोफोनजवळ बसवले. मला त्या गृहस्थांचा पांढरा अर्धा सदरा व पांढरा पायजमा असा पेहराव बघून आश्चर्य वाटले.पण एका माणसाला त्याचे नाव विचारले तर तो म्हणाला, बालगंधर्व! मी त्वरित समोर गेलो. त्यांना वाकून नमस्कार केला व स्वाक्षरीसाठी विनंती केली. तर त्यांनी पाठीवर हाताने थोपटत म्हणाले,बाळा सही दिली असती पण मी आता लिहू शकत नाही, मला माफ कर. हे ऐकून व त्यांची असहायता पाहून आणि त्याच बरोबर माझ्या कमनशिबाबद्दल मला रडू आले नसते तरच नवल ! आपण इतक्या महान कलाकाराला प्रत्यक्ष भेटत आहोत, त्याच्याशी बोलत आहोत पण त्यांची स्वाक्षरी घेऊ शकत नाही याचे खूप वाईट वाटले.
त्यांनतर त्याचवेळी पंडितराव नगरकर, जोत्स्ना मोहिले, मास्टर कृष्णराव, हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, जितेंद्र अभिषेकी अश्या अनेक मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या नि बाल गंधर्वांच्या मुकलेल्या स्वाक्षरी ऐ-वजी गोहारबाईची स्वाक्षरी घेऊन समाधान मनात मी रात्री दीड वाजता परत आलो. पण मनात मिश्र परिस्थिती होती. एकीकडे अनेक प्रसिद्ध कलाकारांच्या स्वाक्षऱ्या एकच दिवशी मिळाल्याचा आनंद तर दुसरीकडे प्रत्यक्ष भेट होऊनही बालगंधर्वांच्या स्वाक्षरीला कायमचा मुकल्याची चुटपूट, रुखरुख !

*

८.
दिलीप कुमार

जूनच्या एका पावसाळी संध्याकाळी इंग्लंड ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी सामना सुरु झाला. त्याच्या लंचपर्यंत इंग्लंडचा धावफलक ३ बाद ६३ ऐकला व एकदम सकाळी वाचलेले लक्षात आले, कि प्रसिद्ध चित्रपट अभिनेते दिलीप कुमार एका प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी जहांगीर आर्ट ग्यालरी येथे येणार आहेत. म्हणून मी बाहेर पडलो व चर्चगेटला उतरून जहांगीर आर्ट ग्यालरीला पोहोचलो. त्या रिमझिम संध्याकाळी देखील तेथे दिलीप कुमारच्या चाहत्यांची बरीच गर्दी होती. पण घुसत घुसत नि वाट काढत कसा तरी हॉलमध्ये पोहोचलो.

काही वेळाने दिलीप कुमार तेथे पोहोचले, पण त्यांना धड उभेही राहता येईना इतकी चेंगरा चेंगरी सुरु झाली. मी त्यांच्यापासून केवळ एक दीड फुट अंतरावर होतो, त्यामुळे त्या गर्दीतही त्यांना स्वाक्षरी मागत होतो. पण एकाला दिली तर सर्वांचा द्यावी लागेल व गर्दी व रांग संपणारच नाही या भीतीने त्यांनी कोणालाच स्वाक्षरी देण्यास नकार दिला.

बाहेर पावसाची रिमझिम चालू होती, पण आत प्रत्येकजण घामाने चिंब भिजलेला होता. आणि तरीही माझे स्वाक्षरी मिळविण्याचे प्रयत्न चालूच होते. त्यांच्यापासून अक्षरशः अर्ध्या हाताच्या अंतरावर असूनही ते मलाच काय, कोणालाही स्वाक्षरी देत नव्हते. काही स्वयंसेवकांनी त्यांच्या भोवतीकडे केले. मी चतुराईने त्यांच्यातच सामील झालो. कसेबसे त्यांनी रिबीन कापली व प्रदर्शनाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. मग ते एक एक चित्र पाहत सरकत होते, नव्हे पुढे ढकलले जात होते. गर्दी नि चेंगराचेंगरी पाहून एकदा मनात विचार आला कि नाद सोडून घरी जावे, पण मग वाटले इतक्या प्रसिद्ध असणाऱ्या नटाच्या इतक्या जवळ पुन्हा कधी पोहोचणार? म्हणून तसाच गर्दीत घुटमळत राहिलो.

प्रदर्शन पाहून झाल्यावर त्यांना दुसऱ्या खोलीत नेण्यात आले. ते कदाचित चहापाणी नि त्यांच्या बरोबरचे ग्रुप फोटो घेण्यासाठी असेल असा मी तर्क केला. जवळ जवळ अर्ध्यातसानंतर गर्दी ओसरली तेव्हा ते बाहेर आले व गाडीकडे जात होते. गाडी हॉल च्या दारासमोरच होती,पण तेथील फुटपाथ फारच रुंद आहे व बाहेर पुन्हा रिमझिम सुरु होती. त्यामुळे ते थोडे थांबले. तीच संधी साधून ते पायऱ्या उतरत असताना मी माझी छत्री त्यांच्या डोक्यावर धरली व त्यांना गाडीपर्यंत सोडले. मला त्यांचे क्रिकेट प्रेम माहित होते, त्यामुळे गाडीत बसताना त्यांना विचारले, आपने सुना क्या इंग्लंड ऑस्ट्रेलिया के बीच पहलामॅच दोपहर शुरू हुवा और लंच तक इंग्लंड का स्कोअर ६३ फोर ३ हुवा है. तर त्यांनी विचारले आप भी क्रिकेट खेलते हो?मी म्हटला, जी हा,कभी कभी.

तेवढ्यात ते गाडीत बसताना त्यांना स्वाक्षरी विचारली तर त्यांनी माझ्या हातातील वही नि पेन घेऊन स्वाक्षरी दिली. आणि ते निघून गेले. माझ्या विश्वासच बसेना कि मला आज दिलीपकुमारांची स्वाक्षरी मिळवता आली. परिणामी त्या संध्याकाळी एवढ्या दीड दोन हजार प्रेक्षकांच्या गर्दीत स्वाक्षरी मिळवणारा मी एकटाच होतो. तेव्हा मला खूप चिकाटी, संयम नि थोडी युक्ती या कामात कशी उपयोगी पडते ते कळून चुकले.

पण स्वाक्षरी मिळण्याचे भाग्य नेहमीच लाभते असे नाही कारण कधी कधी मन खट्टू करणारे अनुभवही वाट्यास येत असतात.

*



९.

स्वाक्षरी संग्रहातील कटू आठवणी

मी वयाच्या १० व्या वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक होतो. संघांच्या शाखेत नियमितपणे जात होतो. त्यामुळे खेळ, व्यायाम, थोडेसे बौद्धिक, व शिस्त यांचा संमिश्र फायदा मला होत होता. त्याच दरम्यान निरनिराळ्या उपक्रमातून व उत्सवांसारख्या कार्यक्रमातून संघाबद्दल, संघाच्या कामाबद्दल नि त्यांच्या संपूर्ण हिंदू समाज संघटीत करण्याच्या, हिंदुस्तानची जगातील एक प्रभावी राष्ट्र निर्माण करण्याच्या व त्यासाठी देश व धर्म याबद्दल प्रत्येक नागरिकात जागरुकता नि प्रेम निर्माण करण्याच्या अंतिम ध्येयाची व त्या संबंधीच्या आवश्यक संघटनाची माहिती मिळत ओढ निर्माण झाली. त्याच सुमारास स्वाक्षरी संग्रह सुरु झाल्यावर संघातील सर्वात प्रमुख व्यक्ती म्हणून आद्य संस्थापक नि हिंदू तत्त्वप्रणालीचे एक कट्टर तत्ववेत्ते, प्रखर विचारवंत, संस्कृत, मराठी, हिंदी, व इंग्रजी या चारही भाषांवर कमालीचे प्रभुत्व असलेले व प्रत्येक भाषेत अस्खलितपणे ओघवते वक्तृत्व करणारे तेजस्वी व्यक्तिमत्वाचे सरसंघचालक परमपुज्य श्री. गोळवलकर गुरुजी यांचा जुजबी परिचय वाचला व नोंद केला. त्यांची त्यांच्या मुंबई

भेटीची व त्यांना भेटण्याची मी आतुरतेने वाट पाहत होतो.
एकदा शिवाजी उद्यानावरील सायं शाखेत घोषणा झाली कि गुरुजी शाखेवर येत आहेत. मी त्यांना प्रथमच पाहिले नि मनावर खूप प्रभाव पडला होता व या महान व्यक्तीला प्रत्यक्ष भेटून त्यांची स्वाक्षरी मिळविण्याचा मी ध्यास घेतला. पण शाखेवर स्वाक्षरी घेणे संघाच्या शिस्तीत बसत नव्हते. पुढे एकदा ते आमच्या शाखेतील आमच्याच शिक्षकांच्या घरी उतरले असल्याचे कळले. म्हणून त्याना भेटायला सकाळी ८ वाजता त्या शिक्षकांच्या घरी पहोचालो. १०-१५ मिनिटांनी स्वतः गुरुजीच स्नान करून धोतर झब्बा या साध्या वेशात पण तेजस्वी मुद्रेने समोर आले. मी त्यांना वाकून नमस्कार करताच त्यांनी माझी विचारपूस केली. मी स्वाक्षरीची विनंती करताच अशी संग्रहासाठी स्वाक्षरी देणे संघ कार्यांत बसत नाही त्यामुळे मी स्वाक्षरी देऊ शकत नाही असे म्हणाले. पण मला पत्र लिहिलेस तर त्याला मी माझ्या अक्षरात जरूर उत्तर पाठवेन व त्यावर स्वाक्षरी नक्की असेल असे अतिशय नम्रपणे नि हळू आवाजात समजवून सांगितले.
एवढ्या महान व्यक्तीला भेटून त्यांच्याशी दोन शब्द बोलू शकलो याचे जरी समाधान वाटले तरी स्वाक्षरी न मिळाल्याने नाराजही झालो होतो. पुढे २-३ वेळा मी त्यांना प्रत्यक्ष भेटून स्वाक्षरी मिळविण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी कधीच स्वाक्षरी दिली नाही. पत्राने कदाचित स्वाक्षरी मिळवता आली असती पण मला प्रत्यक्ष भेटून ती घेण्याचा माझा आग्रह होता.
रशियाचा जगातला पहिला अंतराळवीर युरी गागारीन हा यशस्वी अंतराळ यात्रेनंतर भारत दौऱ्या दरम्यान मुंबईत आला होता. त्याला पाहायला ताज महाल हॉटेलमध्ये गेलो. तुडुंब गर्दी जमली होती. तरी स्वागत समारंभ संपल्यावर मी हळू हळू सरकत सरकत वाट काढत त्याच्या खुल्या गाडीपर्यंत पोहोचलो. तो जेव्हा गाडीत स्वार झाला तेव्हा मी टाळया वाजवून त्याचे लक्ष माझ्याकडे वेधले व हातातील माझी वही व पेन त्याला देवून खुणेने स्वाक्षरी देण्यास सांगत होतो, तेवढ्यात एका वाहतूक पोलिसाचा हाताचा झटका माझ्या हातावर पडला आणि वही गाडी बाहेर पडली. क्षणात ती गाडी निघून गेली आणि मी युरी गागारीन या अंतराळवीराच्या स्वाक्षरीला कायमचा मुकलो.
१९६१ साली ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट संघ घेऊन त्यांचा जगप्रसिद्ध अष्टपैलू कप्तान रिची बेनॉ भारत दौऱ्यावर आला होता. मुंबई कसोटी दरम्यान तीन दिवसांच्या खेळानंतर चौथा दिवस विश्रांतीचा होता. तरीही
खेळाडू सरावासाठी मैदानावर येतील हे ऐकल्यामुळे मी सकाळी ८ वाजताच स्वाक्षऱ्यांसाठी तयारीनिशी सीसीआयच्या मैदानावर पोहोचलो. आत हिरवळीवर प्रवेश मिळवला नि खेळाडूंची वाट पाहत होतो. माझ्याप्रमाणेच ३-४ चाहते नि काही छायाचित्रकार नेटच्या बाहेर उभे होते.
अपेक्षेप्रमाणे रिची बेनॉ थोड्यावेळाने मैदानावर चालत येताना दिसला. सहा फुट उंच, गोरापान, निळे डोळे, रुंद बहु, चौकोनी पुष्ट छाती असे एखाद्या हॉलीवूड नटाला शोभावे असे मोहक व्यक्तिमत्व पाहून चाटच झालो. शिवाय खेळात २००० धावा नि २०० हून अधिक बळी असे ऐकलेले विक्रमी कर्तृत्व डोळ्यासमोर आले. मी ताबडतोब त्याच्याकडे जाऊन स्वाक्षरी मागितली. पण भाव खात आता मी सराव करणार आहे, नंतर पाहू, असे (आफ्टर प्रॅक्टिस) हे बोलून मला परतवले.
नंतर क्षेत्र रक्षणाचा सराव झाल्यावर विश्रांतीसाठी तो नेटच्या मागे बसला

असताना मी पुन्हा गेलो व स्वाक्षरी मागितली तर मी बॅटिंगला जात आहे असे सांगून पुन्हा नकार दिला. पण मीही चिकाटी सोडली नाही. पण बॅटिंग प्रक्टिसनंतर मी आता थकलोय असा भाव खात स्वाक्षरी न देताच पॅवेलीयनकडे निघून गेला. तेव्हा डोक्यात विचार आला, कि एवढा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा खेळाडू पण साधी एक स्वाक्षरी देण्याची खिलाडू वृत्ती त्याच्याकडे नसावी? याचे स्वाक्षरी न मिळाल्यापेक्षाही जास्त वाईट वाटले. चीड आली नि नंतर तो खंवचट वृत्तीचा खेळाडू मनातून कायमचा उतरला.
याच रिची बेनॉचा समकालीन पण अतिशय सभ्य गृहस्थ म्हणून नावाजलेला वेस्ट इंडीजचा कर्णधार व क्रिकेट विश्वातील एक असामान्य व्यक्तिमत्व होता सर फ्रॅंक वॉरेल. तो मुंबईत यु जी सी च्या आमंत्रणावरून एका भाषणासाठी आला असल्याचे कळले. त्याचे भाषण विद्यापीठाच्या पदवीदान सभागृहात दुपारी साडे तीन वाजता होणार असल्याचे वाचले. मी लगेच तिथे पोहोचण्याचा प्रयत्न केला पण भाषण संपवून तो नुकताच कलकत्त्याला जाण्यासाठी विमानतळावर गेल्याचे कळले. मी लगोलग टॅक्सीने चर्चगेट गाठून रेल्वेने पार्ल्याला जाऊन रिक्षाने विमानतळावर पोहोचलो. पण तो आधीच काहीवेळापूर्वी विमानाकडे प्रस्थान झाला होता. परिणामी मला त्याला भेटता आले नाही व मी त्याच्या स्वाक्षरीला कायमचा मुकलो. कारण काही दिवसांनंतर त्याने दुर्दैवाने जगाचा कायमचा निरोप घेतल्याचे वाचले नि मन हळहळले.
अशा प.पु.गुरुजी, युरी गागारीन, सर फ्रयांक वॉरेल यांच्या घटनांनंतर मला कळून चुकले कि स्वाक्षरी मिळवणे हे नशिबात असायला लागते. कारण ती मिळाली तर आज आणि आत्ताच, नाहीतर कधीच नाही. इट्स नाऊ ऑर नेव्हर !!
मी ज्या स्वाक्षऱ्याना मुकलो त्या खूप महत्वाच्या तर होत्याच पण तरीही हार न मानता पुन्हा जिद्दीने इतर मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या मिळवू लागलो. कारण मुकलेल्या सर्वांचा मान राखूनहि संग्रहाच्या अंतिम ध्येयासाठी स्वाक्षरी मिळवताना म्हणावे लागते तू नहीं तो और सही !

*

१०.
फुटबॉल सम्राट पेलेची भेट.

जानेवारी १९७५! एअर इंडियाच्या आरक्षण विभागात कार्यरत असताना एका मित्राने मला एका टेलेक्स दाखवला व सांगितले हे लक्षात ठेव ! त्यात होते कि Edson -rantes do Nascimento.. नावाचा एक प्रवासी २६ जानेवारीला टोकियोहून मुंबईत येऊन दुसरे दिवशी २७ ता.ला सकाळी मॉरीशियसला जात आहे. नावावरून मला काहीच बोध झाला नाही. पण शेवटच्या ओळीत त्याची खास माहिती दिली होती कि हा प्रवासी जगप्रसिद्ध फुटबॉलपटू पेले आहे! मी ती माहिती माझ्याकडेच ठेवली.

पण १५ दिवसांत खरं तर ते विसरलो होतो, पण २६ जानेवारीला मला दुपारच्या पाळीला कामाला जायचे होते. पण उशिरा म्हणून सायंकाळी ६ वाजता ऑफिसला गेलो नी कामाच्या नादात आज २६ तारीख असल्याचे लक्षात आले. लगेच मी दुसरे दिवशी २७ ता.ला मोरीशियसला जाणाऱ्या प्रवाशांची यादी पहिली त्यात पेलेचे नाव वाचले नी खडबडून जागा झाल-ो. रात्री ९:३० नंतर हॉटेल सेन्टॉरला फोन करून Edson -rantes do NascimentoZm स्कीमेंतो नावाचा प्रथम वर्गाचा प्रवासी आला आहे का?



असल्यास त्याचा खोली क्र. विचारून घेतला. लगेचच खोली क्र.३०३ असल्याचे कळले. आणि मी तयारीला लागलो.

या स्वाक्षरी संग्रहाच्या १५-१७ वर्षाच्या अनुभव वरून मी काही ठोकताळे बांधले होते. त्यात माझी मोरपंखी रंगाची प्यांट नी पिस्ता रंगाचा फुल शर्ट मला लकी ठरत होता. म्हणजे ते कपडे घातले कि बऱ्याच वेळा मला स्वाक्षरी मिळत असे. म्हणून पँट घरी तयार असल्याचे आठवले. पण तो शर्ट माझ्या अंगावरच होता. तोच घालून सकाळी कसा जाणार?म्हणून आमच्या स्टाफ रूममध्ये गेलो, तेथील कोणाचा तरी गणवेशातला शर्ट घातला, हा पिस्ता शर्ट धुवून पंख्याखाली वाळत ठेवला. रात्री घरी गेल्यावर त्या शर्टला इस्त्री करून ठेवली. वडिलांनी विचारले कसली धावपळ आहे?मी म्हटलं,सकाळी लवकर जायचे आहे.

पहाटे ६ वाजता उठून सगळे आवरून मी घराबाहेर पडलो नी रेल्वेने पार्ले व पुढे रिक्षाने सेन्टॉर हॉटेल गाठले. साधारण साडेसात वाजले होते, म्हणून थेट तिसऱ्या मजल्यावरील खोली क्र. ३०३ जवळ पोहोचलो नी बेल वाजविली. आतून काळाकभिन्न पण कणखर बांध्याचा ५ साडे पाच फुटी फक्त टॉवेल गुंडाळलेला एक निग्रो बाहेर आला. मी त्याला गुड मॉर्निंग करून आपणच पेले का हे विचारले. त्यांनी हो म्हणताच मी त्याच्या पुढे वही नी पेन केले नी स्वाक्षरीसाठी विनंती केली. त्याने डोळे चोळत मी झोपलो आहे. विश्रांती घेत आहे. नंतर ९.३०ला विमानतळावर भेट असे सांगितले. मीही ठीक आहे म्हणत याहून जास्त त्रास न देता तिथून बाहेर पडलो.

तिथून मी निघालो व विमानतळावरील मॉरीशियसला जाणाऱ्या प्रथम श्रेणीच्या काऊंटरजवळ उभा राहिलो. दरम्यान तेथे घुटमळणाऱ्या एका फोटोग्राफरला मी इशारा केला व २-३ फोटो काढायला सांगितले. त्याने प्रत्येक प्रतीचे ७ रु. पडतील असे सांगितले. मी ठीक आहे म्हटले

नी पेलेची वाट पाहत तिथेच थांबून राहिलो. साधारण ९ च्या सुमारास सेन्टॉर हॉटेलची खास मिनी बस आली व त्यातून सुटात असलेले एक गोरा नी एक काळा असे दोघंजण उतरून त्या काउंटरपाशी आले.

मघाच्या टॉवेल मधल्याला सुटात पाहिल्यावर जरा थबकलोच. नंतर कळले कि तो गोरा गृहस्थ पेले चा मॅनेजर होता. त्याने तिकिटे व सामान देऊन चेक इन च्या फॉर्मलीटीज पुऱ्या केल्यावर मी लगेच पुढे सरसावलो. नी पेलेला स्वाक्षरीची विनंती केली. त्याने स्वाक्षरी केली आणि तारीखही घातली. मी आणखी एक मागितली तर ती देखील त्याने आनंदाने दिली. त्याच वेळेस त्या फोटो ग्राफरला खूण करून फोटो काढायला सांगितले. दरम्यान कदाचित तिथे गर्दी नसल्याने व माझा उत्साह पाहून त्या मॅनेजर ने आपल्या बॅग मधून एक कार्ड काढले. त्यावर पेलेचा किक मारतानाचा रंगीत फोटो होता. त्यावर मॅनेजरने पेलेला स्वाक्षरी करायला सांगितले.

पेलेने मला नाव विचारले, मी vijay, सांगितल्यावर त्या फोटो कार्डावर पीस (म्हणजे शांतता राहो) असे लिहून तो व्ही आय झेड ए आय असे माझे नाव लिहून स्वाक्षरी केली व मला कार्ड व फोटो बक्षीस दिले. त्या क्षणी मला काय वाटत होते, त्यापेक्षा पुढे काय घडत आहे याकडे माझे लक्ष होते.

नंतर त्या मॅनेजरने मला एक गोलाकार व्हिजिटिंग कार्ड दिले त्यावर दोन्ही बाजूला पेलेची स्वाक्षरी व त्यांचे पत्ते छापलेले होते. (घरी आल्यावर पुन्हा पुन्हा निरखून पाहिल्यावर कळले कि तो फुटबॉल पटू असल्याने त्यांचे कार्डही फुटबॉलच्याच आकारात गोल असे होते व त्यावर दोनही बाजूवर फुटबॉलची नक्षी एनग्रेव केलेली होती.) हे सगळे सोपस्कार नी माझे स्वाक्षरीचे काम झाल्यावर त्यांचे आभार मानत मी निघणारच होतो तोच एअर इंडिया ड्युटी मॅनेजर बाहेर आला व त्याने मला ओळखल्याने पटकन विचारले. थोडा वेळ आहे का?

मी हो म्हणताच त्याने मला व्ही आय पी लाउंजकडे नेले व म्हणाला प्लीज जरा १५-२० मिनिटे येथे थांब नी गेस्ट बरोबर कॉफी घे. मी वाट पाहत होतो तर खुद्द पेलेनी त्याचा मॅनेजर दोघेही तिथे आले. विमानाकडे जाण्यास थोडा वेळ असल्याने त्यांना तेथे थांबवले होते. मग कॉफी आल्यावर पेलेने मॅनेजरला दुभाषी करत माझ्याशी गप्पा सुरु केल्या.

मला खरं तर घाम फुटला होता. मी शिवाजी पार्क चा राहणारा असल्याने क्रिकेट माझा दुसरा धर्म. नी फुटबॉलविषयी तो हात न लावता पायाने खेळतात एवढेच माहित होते. नी मला गप्पा मारायच्या होत्या त्या जग प्रसिद्धफुटबॉल पटू पेले बरोबर ! माझी बोबडी वळेल नाही तर काय होईल? मग आमच्यात खालील संभाषण झाले. संभाषण म्हणजे पेले त्याच्या ब्राझिलियन (फ्रेंच) भाषेत प्रश्न विचारी, मॅनेजर त्यांचे इंग्रजीत भाषांतर करून मला विचारीत असे. नी मी इंग्रजीत उत्तर दिले कि त्यांचे फ्रेंच भाषांतर तो मॅनेजर करून पेलेला सांगत असे. मला आठवते ते आमचे संभाषण असे होते-

पेले - तू फुटबॉल खेळतो का?

मी- नाही. मी क्रिकेट खेळतो.

MUMBAI MIRROR | FRIDAY, JUNE 16, 2006 12

Pele? Who is that?

Mirror reader **Vijay Deshpande** recalls the 20 minutes when he met the legendary football player from Brazil, not knowing of his greatness!

In January 1976, when I was working at Air India's Reservations Department, a friend handed over a telex with travel details of the passenger, Edmond Arantus de Pele. At the end of the travel itinerary special information on the passenger said "famous football player".

As a child I had been a cricket fan and knew next to nothing about football. But my colleague, knowing very well my obsession with collecting autographs, told me that this particular passenger was revered in his sport and asked me to note his travel details. I also noted his date of arrival, January 26, and departure the next day.

Even if I didn't find this Pele interesting, I had nothing to lose. I could always keep the autograph away. But I could not miss the moment.

By the afternoon of 26th, I had nearly forgotten about my mission. When I reported for work, colleagues confirmed that, indeed, a passenger by the name of Pele had arrived and checked in at Hotel Centaur for an overnight stay.

At 8.00 am the next morning I knocked at Pele's room. When the door opened, I saw a strong, young, dark-skinned man half asleep, rubbing his eyes. Luckily for me, he didn't seem angry. Instead, he asked the purpose of my visit.

"May I have your autograph, Mr Pele?" I asked.

At that moment, Pele's manager came in and said very softly, "He is sleeping. Can you meet us at the departure at 0900?" I agreed and apologised for disturbing him. I was surprised that the door did not bang behind my back. Then I rushed to the departure lounge and caught hold of a photographer lingering near by, and asked him to click couple of pictures when I gave him the sign.

At 9.10 am a Hotel Centaur coach dropped Pele and his manager, who also doubled as his translator.

Once the check-in formalities were over, I approached the manager to see if I could get an autograph of the footballer. But the generous manager gave me one of Pele's action picture post-cards and also a football-embossed, round-shaped visiting card, bearing Pele's signature at the centre on both sides. On request the legendary footballer also autographed the card personally for me.

Later, the manager approached me and asked me for a cup of coffee. Over the hot brew, the manager translated Pele's questions. I had dreaded this. I knew nothing about football except that the ball is kicked by, well, the foot! He asked if football was famous in this town and in India. I told him that they were in wrong town. However, in Calcutta they would not have had a chance to rest as most people there are crazy over football.

As they left, they shook hands with me. I remember the handshake with Pele, but even then I did not realise his importance. However, two days after this meeting, I realised what a legend the man is.

I live in Shivaji Park, cricket is my second religion. The only thing I knew about football at that time, was that it was played with feet. And yet, I spent 20 minutes with nobody less than the god of football — Pele. Absolutely Unbelievable!

...tting your daily dose of the football World Cup? What's your reaction? Send us your opinion on the game, the players and the teams. Log ...to mumbaimirror.com and punch in what you have to say in the blogs section. Or email an article to mirrorfeedback@indiatimes.com. You ...uld also send us your photograph

पेले - तुमच्याकडे भारतात टी.व्ही आला आहे का?

मी - हो ५-६ वर्षापूर्वी आला.

पेले- त्यावर कधी फुटबॉलच्या मॅचेस पाहता का?

मी- हो कधी कधी.(नाही काय म्हणेन?)

पेले- मुंबईत फुटबॉल किती लोक खेळतात?

मी- फारसा नाही पण,सर तुम्ही चुकीच्या शहरात आला आहात. कलकत्त्यात गेला असतात तर तुम्हाला एक मिनिटही विश्रांती मिळाली नसती. तिथले लोक फुटबॉलचे खूप वेडे आहेत. त्यांनी तर तुमची मिरवणूकही काढली असती.

पेले- नाही, मी खाजगी कारणसाठी प्रवास करत आहे. मला ते काहीही नको आहे.

आमच्या गप्पा चालू होत्या नी माझ्या कपातली कॉफी संपत होती. मनात कधी एकदा यांना विमानाकडे नेतात व माझी सुटका होते याची वाट पाहत होतो. थोड्याच वेळात एअर इंडियाची एक कर्मचारी मुलगी तेथे आली व तिने त्या दोघांना विमानाकडे निघण्याची विनंती केली. लगेच त्यांनी माझ्याशी हस्तांदोलन करत निरोप घेतला. आपणास भेटून खूप आनंद झाला नी बॉन व्हॉयेज असे म्हणत मी पेलेचा हातातून हात सोडला, व ते दोघे विमानाकडे प्रस्थान झाले. त्याक्षणी पेलेशी केलेल्या शेकहँडच्या आठवणीने आजही

अंगावर रोमांच उठतात नी एवढ्या मोठ्या नी जगप्रसिद्ध फुटबॉल सम्राटाशी भेट झाल्याच्या आनंदाने मन फुलून येतं.

खर तर पेलेशी माझी भेट इथेच संपली होती. पण मला काय माहित मी काय करून बसलो होतो आणि कोणाला भेटून परतत होतो. या ऐतिहासिक भेटीचे दुसरे पर्व त्यानंतर सुरु झाले.

घरी आल्यावर मी मित्रांना पेले भेटल्याचे सांगितले तर प्रथम त्यांचा विश्वास बसेना. मग मी त्यांना त्यांचे कार्ड नी तो स्वाक्षरी केलेला फोटो दाखवला तेव्हा ते तर चरकले. पण माझ्याही डोक्यात प्रकाश पडला कि ही पेले ही काय व्यक्ती आहे. त्याने एकट्याच्या जीवावर ब्राझीलला फुटबॉलचा विश्वविजेता नी स्वतःला सर्वोत्तम खेळाडू म्हणून सिद्ध केले होते.

दोन दिवसांनी पेले बरोबरच्या त्या स्मरणीय भेटीचा फोटो मला मिळाल्यावर सर्व प्रथम मी तो माझ्या क्रीडाप्रेमी मॅनेजर श्री. अशोक गुप्ते यांना दाखवला. नी त्या भेटीचे सविस्तर वर्णन सांगितले. ते सर्व ऐकून तर ते इतके खुश झाले कि त्यांनी मला चक्क हात धरून १८ व्या मजल्यावरच्या एअर इंडियाच्या जे आर डी टाटानंतर दुसऱ्या क्रमांकाचे महत्वाचे अधिकारी तेव्हाचे कार्मार्शियल डायरेक्टर श्री. दस्तूर यांचेकडे नेले व त्यांना म्हटले, हे पहा जे तुमचे प्रसिद्धी अधिकारी करू शकत नाहीत ते माझ्या एका जुनिअर स्टाफ ने करून दाखवले,असे म्हणून पेलेची स्वाक्षरी त्याच्या बरोबरचा माझा फोटो, त्यांचे फुटबॉलच्या आकारातले नाविन्य पूर्ण गोलाकार विजिटिंग कार्ड नी तो रंगीत फोटो दाखवले. श्री. दस्तूर नी माझे तोंडभरून कौतुक करत अभिनंदन केले.

नंतर मी पेले बरोबरचा तो फोटो व त्याची स्वाक्षरी टाईम्स वृत्तपत्राच्या ऑफिसमध्ये नेउन दोघांना दाखवले तर मी ती बातमी कोणालाही न सांगितल्याबद्दल त्यांची संधी हुकवल्याबद्दल त्यांनी मला फक्त शिव्या द्यायचे बाकी ठेवले होते. नंतर तो फोटो दुसरे दिवशी इव्हिनिंग न्यूजच्या पहिल्या पानावर छापला,तो भाग वेगळा. पण ती बातमी कोणालाही न सांगण्यामागचा खरा स्वार्थी हेतू हा होता कि जर मी ही बातमी सगळीकडे पसरवली असती तर ती भेट खाजगी असल्याने खुद्द पेलेला आराम मिळाला नसता. शिवाय त्यांच्या सन्मानार्थ एखादा स्वागत समारंभ झाला असता, एखाद्या युवतीने त्याला हार घातला असता. दुसरीने पुष्पगुच्छ दिला असता. काही अधिकारी भाषण देत चमकले असते नी बातमी देणारा मी मात्र कुठेतरी कोपऱ्यात उभा राहून बघत बसलो असतो. स्वाक्षरी नी फोटो तर खूप लांबच्या गोष्टी राहिल्या. साधे दर्शनही मिळाले नसते. त्यामुळे आता पेले भारताबाहेर गेल्यानंतर या माझ्या घटनेला जे महत्व मिळत होते ते मिळाले नसते.

काही दिवसांनी मी पेलेची स्वाक्षरी व फोटो माझ्या एका फुटबॉलचा प्रेमीच नाही तर त्यातील किडा असलेल्या एका मित्राला दाखवला... तर त्यानेही तोंडभरून कौतुक करताना मला देवाला करतात तसा नमस्कार तर केलाच पण गमतीने म्हटले तू पेलेची स्वाक्षरी घेण्यापेक्षा त्याच्या पायाचा ठसा घ्यायला हवा होता.

लवकरच काही दिवसात पेलेला भेटणारा, त्याची स्वाक्षरी नी फोटो मिळवणारा एकमेव भारतीय म्हणून मी ओळखला जाऊ लागलो. आणखी एका मित्राला स्वाक्षरी नी फोटो दाखवल्यावर तो म्हणाला, you know Vijay,

what is Pele? Pele was the man who brought Brazil onthe world map. मीही त्याला तसेच उत्तर देत म्हटले, you know what is Vijay, he is the man who brought Pele on India map...त्याची प्रतिक्रिया बघण्यासारखी झाली होती.

काही दिवसांनी कामाच्या निमित्ताने माझी बीसीसी आय चे अध्यक्ष राज-सिंग डुंगरपुर यांची ओळख झाली. आणि ते प्रसिद्ध क्रिकेट समालोचक नी फुटबॉल समीक्षक श्री. बॉबी तल्यारखान यांचे मित्र असल्याचे कळले. एक दिवस पेलेची स्वाक्षरी नी त्यांच्या बरोबरचा फोटो श्री. बॉबी तल्यारखान यांना दाखवण्याची माझी इच्छा मी राजसिंग याना बोलून दाखवली. ती त्यानाही आवडली व एका रविवारी सकाळी सीसीआयवर येण्यास सांगितले. मी पेलेची स्वाक्षरी, फोटो, व्हिजिटिंग कार्ड व तो रंगीत फोटोही सगळी सामुग्री घेऊन तेथे पोहोचलो.

प्रथम त्यांनी ते सर्व पाहिल्यावर त्यांना खूप कौतुक वाटले. मग त्यांनी तल्यारखान यांच्याकडे मला नेले व माझी सामुग्री त्यांना दाखवत माझी ओळख करून दिली. तल्यारखान यांचा क्रिकेट नी फुटबॉल म्हणजे जीव कि प्राण. त्यामुळे पेलेची स्वाक्षरी पाहून तर त्यांच्या डोळ्यात पाणीच आले. अगदी भारावलेल्या स्वरात म्हणाले. Mr. Vijay I am very happy to see all this and I congratulate you. In fact I am the man who spent many years in writing about football and pele and missed him and how lucky you are, because you are a person who could meet Pele personally. By shaking hands with you, I feel I am shaking hand with Pele...

मीही सद्गदित झालो. मग राज सिंगनी स्वतः माझा तल्यारखान यांच्या बरोबर फोटो काढला नी एका वेटर कडून आमचा तिघांचाही फोटो काढून घेतला. हे क्षण माझ्या आयुष्यातील खूप मोलाचे आहेत. राजसिंग व तल्यारखान यांची अभिनंदनाची प्रशस्तीपत्रके मला पदवीपेक्षाही मोलाची वाटतात कारण ते दोघही क्रीडा क्षेत्रातील दोन विद्यापिठेच होती.

या पेलेच्या स्वाक्षरी नी फोटो ने मला खूप प्रसिद्धी मिळवून दिली. एअर इंडियाच्या Magic Carpet या मुखपत्राच्या पहिल्या पानावर नी इतर ५-६ मासिकातून ती छापून आली. आजही या घटना आठवल्यावर अंगावर मुठभर मांस चढल्या सारखे वाटते.

*

११.
एअर इंडियातील मुलाखत



सर एस. रामगूलाम यांची स्वाक्षरी

१९६६ ते १९७० मध्ये मुंबई विद्यापीठातील एका विभागात मी हंगामी लिपिक म्हणून त्यांच्या चर्चगेटच्या क्लब हाउस मधील कचेरीत कार्यान्वित होतो. काउंटरवर काम करताना एका वयस्क विद्यार्थ्याची ओळख झाली. त्यांनी मला माहिती दिली कि एअर इंडियात भरतीची जाहिरात आली आहे. त्याप्रमाणे दुसरेच दिवशी त्यांनी मला जाहिरात दाखवली. मी अर्ज केला. प्राथमिक लेखी परीक्षा भारतातील निरनिराळ्या केद्रातून १०,००० उमेदवारांप्रमाणे मी मुंबईत दिली व नंतर पहिल्या मुलाखतीसाठी १००० उमेदवारांची निवड झाली व शेवटच्या मुलाखतीसाठी १०० निवडक उमेदवारांमध्ये माझाही नंबर लागला व मला बोलावले गेले. त्याची तयारी करताना सामान्यज्ञानाबरोबरच एअर इंडियाचे संचालक, त्यांचे हवाई मार्ग, नव्याने सुरु झालेल्या निरनिराळ्या देशातील हवाई सेवा यांचीही माहिती माझ्या श्री शिद्ध्ये गुरूंकडून जमवली आणि गृहपाठ करत तयारी केली. मुलाखतीच्या वेळी संभाव्य प्रश्नामध्ये सामान्यज्ञान, वैयक्तिक माहिती व आपले फावल्या वेळेतील छंद, आवडी निवडीबद्दल विचारतील असे कळले.

म्हणून मी स्वाक्षरी संग्रहांबद्दल सांगण्याची तयारी केली.

मुलाखतीचे प्राथमिक प्रश्न झाल्यावर एका अधिकाऱ्याने अपेक्षेप्रमाणे प्रश्न विचारला, आपल्या फावल्या वेळातील उद्योग काय? तेव्हा मी माझ्या १५ वर्षापासूनच्या नी ६०० हून अधिक अशा स्वाक्षरी छंदाबद्दल माहिती दिली व अधिक माहितीसाठी संग्रहातील काही नमुने दाखवले. त्यात भारतातील विमान सेवेचे जनक नी तेव्हाचे एअर इंडियाचे संचालक श्री. जे आर डी टाटा आणि तेव्हाचे महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. अलियावर जंग यांच्या स्वाक्षऱ्या व त्यांच्या बरोबरचे माझे फोटो,स्काऊट ॲन्ड गाईड या आंतर राष्ट्रीय उपक्रमांच्या पंचाहत्तरी निमित्त भारताने जारी केलेल्या टपाल तिकिटाच्या प्रथम दिवस आवरणावरील या उपक्रमाच्या ऑस्ट्रेलियन संस्थापिका लेडी बेडन पॉवेल यांची स्वाक्षरी व एअर इंडियाने मॉरीशियसला नव्याने सुरु केलेल्या सेवेच्या स्मरणार्थ एअर इंडियानेच काढलेल्या प्रथम उड्डाण पाकिटावर मॉरीशियसचेच पहिले पंतप्रधान डॉ. शिवसागर रामगुलाम यांची स्वाक्षरी अशा अत्यंत अनोख्या व आकर्षक नमुन्यांचा समावेश होता.

ते पाहून नी विशेषतः एअर इंडियाचे संचालक श्री. जे आर डी टाटा यांची स्वाक्षरी नी त्यांच्या बरोबरचा फोटो पाहून ते मुलाखत घेणारे सर्व अधिकारी आश्चर्य चकित झाले व एकाने तर चक्क विचारले, आम्ही १०-१२ वर्ष काम करून त्यांची सही वा तोंडही कधी पाहिले नाही नी तू हे स्वाक्षरी व फोटो कसा मिळवलास? मी म्हटले, सर, तुम्ही कामात व्यस्त असता, नी मी या छंदासाठी हिंडत असतो. म्हणूनच तर या छंदाला ऑटोग्राफ हंटिंग म्हणतात. त्यावर ते नुसते हसले नाही तर माझी निवडही केली नी १४ मे १९७१पासून मी एअर इंडियात रुजू झालो.

योगायोग असा, कि विद्यापीठात मला विद्यार्थ्यांना निरनिराळ्या विद्यापीठात प्रवेशाचे वा सोडण्याचे दाखले देण्याचे काम होते तर एअर इंडियात सुरुवातीला प्रवाशांचे निरनिराळ्या देशांना जाण्याचे येण्याचे परवाने मिळवण्याचे काम मिळाले होते. पुढे कित्येक वेळा माझा स्वाक्षरी संग्रह वा त्याची प्रदर्शने पाहताना लोक म्हणायचे, बरोबर आहे. एअर इंडियातील नोकरीमुळे मान्यवरांना भेटणे व त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे सहज शक्य झाले.

त्यावर माझे म्हणणे असे कि मी कृतघ्न अजिबात नाही. एअर इंडियातील नोकरीची संग्रह वाढवण्यास खूप मदत झाली हे खरेच. पण सगळे मान्यवर केवळ एअर इंडियातच भेटतात असे नाही. शिवाय एअर इंडियात नोकरी मिळण्या आधीच माझ्याकडे १५ वर्षाचा नी ६०० स्वाक्षऱ्याचा संग्रह होता. त्यामुळे स्वाक्षरीसंग्रहामुळे एअर इंडियातील नोकरी मिळाली व नंतर एअर इंडियातील नोकरी मुळे संग्रहात भर पडली. म्हणजे दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक ठरल्या.

*

१२.
पर्थची स्मरणीय मिनी बॅट

१९८१ साली एअर इंडियाच्या आरक्षण विभागात असताना संगणक पद्धती सुरु करण्यासाठी परदेशातील एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी दोघा दोघांना निरनिराळ्या शहरी पाठवायचा निर्णय झाला नी त्यात मला ऑस्ट्रेलियातील पर्थ या शहरी पाठवण्याचे अधिकाऱ्यांनी ठरवले. लहानपणापासून क्रिकेटचे व त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे नाव खूपच ऐकून होतो व त्यांचे आकर्षण होते, एअर इंडियात नोकरी मिळाल्यावर मोफत प्रवासाची सोय असल्याचे मी ऐकल्यावर मी मनाशी खूण गाठ मारली होती कि आयुष्यात एकदा तरी ऑस्ट्रेलियात जायचेच. तसा नेहमीच सगळ्या अंतर्देशीय क्रिकेट सामन्यांवर नजर ठेऊन असे. त्यातल्या त्यात बेनॉ, हार्वे,ओनिल, लिन्ड वॉल डेव्हिडसन यांना ५८-५९मध्ये मुंबईत पहिले होते. काहीना भेटलोही होतो. काहींच्या स्वाक्षऱ्याही मिळवल्या होत्या. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे मला खूप आकर्षण होते. त्यात आमच्या अधिकाऱ्याने काही जणांना सिंगापूर सिडनी व पर्थ येथे पाठवण्याचे ठरवले व क्रमवारीप्रमाणे माझा नंबर ऑस्ट्रेलियासाठी लागेल हे कळल्यापासून माझ्या आनंदाला

पारावार उरला नाही. एक दोन दिवसातच माझे नाव पर्थसाठी नक्की झाले आणि मी माझ्या तयारीला लागलो. आरक्षणाच्या संगणकाच्या प्रशिक्षणाव्यतिरिक्त तेथील १० दिवसांच्या वास्तव्यात किती स्वाक्षऱ्या मिळवता येतील याचाही गृहपाठ करू लागलो.

पर्थ मधील मुक्कामात स्वाक्षरी संग्रहाच्या दृष्टीने दोन घटना घडल्या. पैकी पहिली होती चित्रपट दिग्दर्शकाच्या बाबतीत.

एके दिवशी ऑफिसचे काम संपवून हॉटेलवर परतत असताना शेजारच्या चित्रपटगृहाजवळ खूप गर्दी पहिली. तिथेल काही लोक गुलाबी रंगाचे कपडे घालून आले होते, व त्या प्रत्येकाच्या हातात एक गुलाबी रंगाचा विटे सारखा ठोकला होता. म्हणून मी त्या सगळ्याचा अर्थ एका मुलाला विचारला. तर त्याने सांगितले कि आता रात्री ८ वाजता एका सिनेमाचा रिलीज आहे. त्याला आम्ही सर्व आमंत्रित आहोत. आणि मुख्य म्हणजे या सिनेमाचे नाव पिंक पँथर असे असल्याने आम्हा आमंत्रिताना गुलाबी कपडे घालायला सांगितले आहे. मी त्याला मधेच थांबवून विचारले. तो प्रत्येकाजवळील गुलाबी ठोकळा काय आहे? तर तो म्हणाला तो गुलाबी ठोकळा हेच या पिंक पँथरच्या रिलीजचे आमंत्रण कार्ड आहे. फक्त हा ठोकळा जवळ असणाऱ्यानाच कार्यक्रमाला प्रवेश मिळणार आहे. मला या नाविन्यपूर्ण कल्पनेची नी त्या एकूणच वातावरणाची गम्मत वाटली. मग एक गाडी आली तिकडे बरेच फोटोग्राफर्स धावले, नी फोटोचे खूप फ़्लॅश चमकले. मला वाटले कोणी हिरोइन किंवा हिरो आला असेल. पण नंतर कळालं कि तो उतरलेला माणूस ऑस्ट्रेलियातील त्या चित्रपटाचा हॉलीवूड प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक अलेन पार्कर होता. त्याची मुलाखत चालू असताना मी पुढे घुसलो व त्याची माझ्या लेटरहेड असलेल्या पेपरवर स्वाक्षरी मिळवली. त्यावेळी ३-४ फ़्लॅश उडाले म्हणून एका फोटो ग्राफरला विचारले, तर त्याने ८ दिवस लागतील व ५ डॉलर्स (म्हणजे ५० भारतीय रुपये) लागतील असे सांगितले, मी त्याचा फोन नंबर घेतला नी ५ डॉलर्सची तयारीही केली. पण २-३ दिवसांनी भारतात परतत असल्याचे सांगितल्यावर मला फोटोचा नाद सोडवा लागला. पण हॉलीवूड प्रसिद्ध निर्मात्या दिग्दर्शकाची स्वाक्षरी प्रत्यक्ष मिळाली याचा खूप आनंद झाला.

पण दुसरी घटना जास्त महत्वाची ठरली. कारण माझे खर लक्ष ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि टेनिस खेळाडू होते. या आमच्या १० दिवसांच्या मुक्कामाचे पहिले ४-५ दिवस इंग्लंड ऑस्ट्रेलिया मालिकेचा शेवटचा सामना ब्रिस्बेन शहरी झाला तो देखील तेथील आमच्या पर्थच्या ऑफिसमधल्या मित्रांनी रोज गाड्यांमधून आणलेल्या पोर्टेबल टीव्हीवर पहिला. खरतर ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्या वरील पर्थपासून दोन अडीच हजार मैलावर तो सामना ब्रिस्बेन शहरी खेळला जात होता पण तेथील प्रगत तंत्रज्ञाना मुळे आम्ही तो पश्चिम किनाऱ्या वरील पर्थ शहरातील आमच्या ऑफिसमध्ये बसून दीड तासांच्या स्थानिक वेळेच्या फरकाने पण थेट (लाईव्ह) पाहू शकत होतो. याचे आम्हाला केवढे अप्रूप वाटत होते. (पण यापेक्षाही जास्त अवाक झालो होतो ते त्या आधी २-३ वर्षापूर्वी सिडनीहून मेलबोर्नला जात असताना ३०,००० फुटावर विमानात रेडिओवर लाईव्ह कोमेंट्री ऐकली तेव्हा ! आताच्या मोबाईल नी आय

पॉडच्या जगात हे अगदी क्षुल्लक वाटेल पण १९८८-८९ साली म्हणजे जवळ जवळ २४-२५ वर्षांपूर्वी तंत्रज्ञानातील या प्रगतीचे खूप आश्चर्य वाटले होते.) तेव्हा देखील व्हिडीओ कॉनफरंस द्वारे तिकडचे ब्रिस्बेन मधले सामन्याचे विशेषज्ञ टोनी ग्रेग नी रिची बेनॉ पर्थ मधल्या समालोचक बरोबर एकाच खोलीत बोलत असल्यासारखे वाटत होते. हा एक वेगळाच अनुभव मिळाला.

त्या मुक्कामात मी रस्त्यातून जाताना एकदा एक फलक पहिला कि १२ नोव्हेंबरपासून (आपल्याकडील रणजीसारख्या) आंतरराज्य अशा शेफिल्ड शिल्डच्या सामन्यांना सुरुवात होणार आहे व पहिला सामना पर्थ मधल्याच वॅका (वेस्टर्न ऑस्ट्रेलिया क्रिकेट असोसिअशन)च्या जग प्रसिद्ध मैदानावर व्हिक्टोरिया व वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये होत आहे. मी त्या सामन्यांचे तपशील नोंद केले व माझा गृहपाठ सुरु केला. म्हणजे हे वॅकाचे मैदान कुठे आहे? किती लांब आहे? इथे जायचे कसे? कोणती बस तिथे जाते, किती वेळ लागतो? इ.इ.

मग लक्षात आले कि १२ नोव्हेंबरलाच दुपारच्या ४ वा. च्या विमानाने आम्हाला सिंगापूर मार्गे मुंबईला परतायला निघायचे होते. म्हणजे २ वाजेपर्यंत हॉटेल सोडणे भाग होते. त्यामुळे चुटपूट लागून राहत होती कि सामना पर्थ मधेच होणार असल्याने स्टेडीयमवर जरी जाण्याचा प्रयत्नकरता आला तरी फार वेळ मिळणार नाही. त्या चौकशीत असे कळले कि तो स्टेडीयम आमच्या हॉटेलपासून चालत १५ मि. अंतरावर आहे. मग तर माझी चुटपूट अधिकच वाढली व मनात सारखे मैदानावर कसे जाता येईल याचाच विचार करत होतो.

सुदैवाने तेथील प्रशिक्षणाचे काम संपले असल्याने १२ ता.ला फक्त १० वा.पर्यंत हजेरी लावून १२ वा. हॉटेलवर परतून सामना तयार करायचे अशी सूचना मिळाली होती. त्यामुळे आदल्या दिवशी हॉटेलवर परत येतानाच वॅका स्टेडीयमचे तपशील गोळा केले. खर तर आमच्या बरोबर बाल सुब्रमनियम नावाचा एक अधिकारी मुंबईहून आला होता व तोही क्रिकेट प्रेमी होता. पण मी माझ्या डोक्यातील विचार कोणालाही न सांगता दुसरे दिवशी कसं काय करायचे याची आखणी करण्यात रात्रभर जागा राहिलो.

दुसरे दिवशी १२ ता.ला सकाळी ६ वाजता उठून सर्व आटपून व सामान तयार ठेऊन साडेसात वाजता गुपचूप एकटाच बाहेर पडलो. बॅगमध्ये कॅमेरा व स्वाक्षर्यां ची वही होतीच. विचारत विचारत अर्ध्या तासाने मी स्टेडीयमजवळ पोहोचलो. मग सुरक्षा भिंतीला चक्कर मारत मारत एका मोठ्या गेटजवळ आलो. तेथे सिक्युरिटी गार्ड नसल्याने दबकत दबकत आत शिरलो. तर समोर खुद्द मैदानात जाण्याचे दार दिसले. सर्वत्र शुकशुकाट होता. कारण सामना ११ वाजता सुरु होणार होता.

एवढ्यात अर्धी चड्डी टी शर्ट व बूट घातलेला एक गोरा माणूस दिसला. त्याला मी गुड मॉर्निंग करत माझी ओळख करून दिली कि मी भारतातील मुंबईहून आलेला एक क्रिकेट प्रेमी आहे. क्रिकेट माझा धर्म आहे, त्यामुळे वॅका या तीर्थ क्षेत्राला भेट द्यायची इच्छा आहे असे त्याला सांगितले. मग त्याने तो तेथील एक ग्राउंडमन आहे असे सांगितले. पण आठ साडे आठ वाजता स्टेडीयमवर आलेला भारतीय माणूस किती क्रिकेट भक्त असेल हे माझ्या चेहऱ्यावरून त्याला कळले असावे. त्याने हातातील पाण्याचा पाईप व झारी

खाली ठेवली व मला मैदानाच्या मध्यभागी जेथे सामना खेळला जातो त्या हिरवळीच्या खेळपट्टीवर नेले. तेथे मला अक्षरशः एखाद्या तीर्थक्षेत्री आल्या सारखे वाटले. मी तर खाली वाकून त्या मातीला व गवताला स्पर्श केला. माझा माझ्यावर विश्वास बसत नव्हता. त्यामुळे पुन्हा पुन्हा त्याला विचारात होतो कि जिथे कसोटी सामना खेळला जातो ती खेळपट्टी हीच का? त्याने हो म्हंटल्यावर तर माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. ज्या मैदानावर ब्रॅडमन, बेनॉ, होर्वे ओनिल या सारखे ओस्ट्रेलीयान, ग्रेग सारखे इंग्लिश, व हजारे मंकड, फडकर नसतील तर वाडेकर, रमाकांत देसाई, सरदेसाई सारखे भारतीय नी हॉल. गिलख्रिस्त,कन्हाय नी सोबर्स सारखे दिग्गज, यासारखी दैवते खेळून गेली त्याच खेळपट्टीवर मी त्या क्षण उभा होतो, माझा माझ्यावर विश्वास बसत नव्हता. खूप खूप आनंद वाटत होता. कोण कुठला मी एक भारतीय जो जेम तें शाळा कॉलेजसाठी खेळलो तो मी त्या क्षणी अशा खेळपट्टीवर उभा होतो. अति आनंदाने तर मी माझा फोटो काढायलाही विसरलो. मुंबई, घर, एअर इंडियाचे ऑफिस, या सर्वांचा विसर पडला होता.

मग त्याने मला जागे केले, व इतर पॅव्हेलीयन,गेस्ट व होम टीम्सच्या ड्रेसिंग रूम्स व महत्वाच्या जागी नेले. तेथे मुख्य हॉलच्या दरवाज्यावर एका बाजूला सर डॉन ब्रॅडमन नी दुसऱ्या बाजूला किम ह्यूजची भव्य छायाचित्रे दिसली.

मग मला त्याने एका अडगळीच्या खोलीत नेले. ते त्या स्टेडीयम मधील गिफ्ट शॉप होते.तेथे निरनिराळी क्रिकेटची मासिके, टी शर्ट,ब्याजेस,बॉल्स, मिनी बॅट अशी बरीच सोव्हेनियर्स विकायला होती. पण प्रत्येकाची किमत १०,१५,२०,२५ ऑस्ट्रेलीयन डॉलर्स अशी होती. मी लगेच माझ्या मनात १० चा पाढा म्हणून त्यांचे रुपयात रुपांतर करत होतो व शेवटी काहीच नको असे ठरवले. पण त्या ग्राउंडमन ने खूप आग्रह केला कि मी काहीतरी घेतलं पाहिजे. म्हणून लहानात लहान अशा ६-८ इंचाच्या क्रिकेटच्या हुबेहूब बॅटची किंमत विचारली तर तो १२ डॉलर्स म्हणाला. मी मनात १२० रु. ची बॅट घेण्याची आवश्यकता नाही (खरंतर ही श्रीमंती परवडणार नाही) असे मनाशी ठरवून बाहेर पडू लागलो, तर त्याने १०,७,६ करत खास माझ्यासाठी ५पर्यंत किंमत कमी केली. मग मनाशी म्हटले कि याला मी मुंबई पुण्याहून आलेला कोकणस्थ वाटेन. या विचाराने व संधी मिळाल्यास त्यावर स्वाक्षऱ्या घेण्यासाठी मी ती बॅट विकत घेतली. त्यानेही स्वखुशीने मी काहीतरी खरेदी केल्याच्या आनंदात एक क्रिकेट मासिक मला बक्षीस दिले. मग बाहेर पडताना खेळाडू कुठून येतील, कधी येतील, व कुठे भेटू शकतील हे विचारले. तर त्याने मला कार पार्किंग भागात थांबायला सांगितले. मी तर फक्त ४-५ खेळाडूना ओळखू शकलो असतो आणि जवळपास कोणीही नव्हते त्यामुळे दिसेल त्याची स्वाक्षरी घेऊन ठेवायची असे ठरवले.

मग ९ वा. च्या सुमारास एकेक गाडी तेथे येऊन त्यातून क्रिकेट चे भले मोठे कीट खांद्यावर घेऊन खेळाडू यायला लागले. तसतशी मी माझी वही त्यांच्याकडे देवून त्यांना वहीवर नी बॅटवर स्वाक्षरी करायला सांगितले. जमल्यास फोटोही काढत होतो. मग ५-१० लहान मोठी मुले तेथे जमू लागली तेव्हा त्यांच्याकडून खेळाडूंची नावे कळू लागली. एका क्षणी तर इकडे जाऊ ती तिकडे जाऊ अशी परिस्थिती झाली, कारण ५-६ खेळाडू एकदम आले. मग काहींनी १-२ मिनिटे थांबून त्यांना स्वाक्षरीची विनंती केली. हळूहळू १२-१४ स्वाक्षऱ्या मिळवल्या व ती मिनी बॅटहि भरून गेली. मग साडे नऊ

वाजता काहीजण सरावासाठी जवळच्याच नेटमध्ये आले व अर्धा पाऊण तास वार्मअप केले. १०.३०ला बरोबर दोन कप्तान बाहेर आले, त्यांनी टॉस केला व ११ वाजता खेळाला सुरुवात झाली. एक ओव्हर झाल्यानंतर मी चटकन भानावर आलो कि आपण भारतात नसून परदेशात काही कामासाठी आलो आहोत. व १०ला ऑफिसमध्ये जायचे आहे. व दुपारी सिंगापूरला निघायचे आहे. मग मी थोडासा अस्वस्थ झालो. लगेच ती मिनी बॅट, वही, पेन व कॅमेरा बॅगमध्ये भरले व ऑफिस च्या दिशेने भरभर चालायला लागलो.

रस्त्यात ऑफिसमध्ये उशीर होण्याचे कारण देताना काय थाप मारायची याचा विचार करत होतो. कारण प्रशिक्षण देण्याच्या कामावर आलो असताना स्वाक्षऱ्या जमवायला गेलो नी उशीर झाला हे कळले तर ओरडा बसेलच पण मुंबईला गैरशिस्तीची तक्रारही कळवली जाईल याची भीती वाटू लागली होती.

ऑफिसमध्ये शिरताच आमच्या मुंबईच्या सहकार्यांनी गराडा घातला व विचारपूस सुरु केली व वातावरण खूप तापले असल्याने मोठ्या शिक्षेला तयार हो असेही सांगू लागले. कारण मॅनेजरपासून सर्वच जण मी कुठे गेलो या रागापेक्षा काळजीने त्रस्त झाले होते. मला मॅनेजरचे बोलावणे आले. त्यांना मी प्रभात फेरीसाठी बाहेर पडलो नी रस्ता चुकलो,म्हणून उशीर झाला, शेवटी बसने कसा बसा पोहोचलो. पण मला क्षमा करा, असे सांगितले. परदेशी परगावी न सांगता कुठेही निघून जाता नी २-२ तास परत येत नाही या तुमच्या बेजबाबदार व निष्काळजीपणाला काय म्हणायचे? मी मान खाली घालून निमुटपणे ऐकत होतो. कारण दुसरे गत्यंतरच नव्हते. पण मनात मात्र त्या बोलण्यापेक्षा त्याने होणाऱ्या दुःखापेक्षा वॅकाचा अनुभव व मिळालेल्या स्वाक्षऱ्यांचे मला जास्त महत्व वाटत होते. कारण त्या बॅटवरच्या स्वाक्षऱ्या किम ह्यूज, अलेन बॉर्डर, केल्पर व्हेसल्स, रॉडनी मार्श, जेफ थोमसन अश्या एकापेक्षा एक अशा महारथी ऑस्ट्रेलियन्सच्या होत्या.

हि कहाणी इथेच संपत नाही. कारण हॉटेलवर आल्यावर मला पुरता ओळखणारा,माझे क्रिकेट व स्वाक्षरी वेड पक्के ओळखणारा माझा अधिकारी बाल सुब्रमण्यम याने विचारले, आता मला खरं सांग तू नक्की कोठे गेला होतास? मी त्याच्याकडून गुप्ततेची हमी घेतली व मग त्याला स्वाक्षऱ्या झालेली ती मिनी बॅट दाखवली. ते पाहून तर तो थक्कच झाला. व माझ्यावर रागवत व मला शिव्या देत म्हणाला,मला का नाही सांगितलेस, मीही आलो असतो. पण मला गाजावाजा करायचा नव्हता म्हणून मी काहीच बोललो नव्हतो.

तीच बॅट आणखी एका रुक्ष सहकाऱ्याने पहिली. तर त्याला काहीच कौतुक वाटले नाही. पण बॅट उलट सुलट करून पाहताना त्याला बॅटच्या तळाशी मेड इन इंडिया असा शिक्का दिसला. तेव्हा त्याने मला वेड्यात काढून म्हटले, कि विजय,इतक्या लांब येऊन घासाघीस करत १० डॉलर्स ची बॅट ५ डॉलर्सला आणली व तीही मेड इन इंडिया? म्हणजे भारतातून ऑस्ट्रेलियात येवून बॅट घेतली ती भरतीय बनावटीची? पण त्यावर मी म्हटले,मे बी, इट इज मेड इन इंडिया, बट ऑटोग्राफ्ड इन ऑस्ट्रेलिया !

*

श्रीलंकेचे माजी पंतप्रधान प्रेमदासा यांची स्वाक्षरी घेताना लेखक

१३.
श्रीलंकेतील प्रताप

१९७८ च्या मे महिन्यात एक महिन्यासाठी मला कोलंबो येथे जाण्याची संधी मिळाली. ऑफिस ड्युटीवर असले कि एक दिवस काय किंवा एक महिना काय, सगळे दिवस ५-स्टार हॉटेलमध्ये राहायला मिळायचे व हे आम्हा एअर लाईनवाल्यांना मोठे आकर्षण असे.

प्रचंड उन्हाळा,उकाडा, समुद्र किनारची दमट हवा, नी शाकाहारी जेवण असे काहीही असले तरी परदेशी ऑफिसमध्ये काम करण्याचे विशेष अप्रूप असे.

या मुक्कामात कळले कि बहुतांशी लोक बुद्ध धर्माचे अनुयायी आहेत. येथे इतर सार्वजनिक सुट्ट्या व्यतिरिक्त सर्व पोर्णिमाना सुट्टी असते आणि विशेष करून वैशाख पोर्णिमा (वेसाक)म्हणजे त्यांचा ३-४ दिवसांचा दिवाळी किंवा नाताळ सारखा वार्षिक सण असतो. याच वैशाख पौर्णिमेला गौतम बुद्धांचा जन्म,समाधी आणि पुनर्जन्म झाला होता. त्या मुळे या दिवसाला विशेष संपूर्ण श्रीलंकेत अतिशय महत्व असते. आणि माझ्या सुदैवाने हा वैशाख पौर्णिमेचा

वेसाकचा सण नेमका मे महिन्यात माझ्या मुक्कामातच आला त्यामुळे मला त्याचा अनुभव घ्यायला मिळाला. मी बाजारात फिरताना शुभेच्छा कार्ड्स, कंदील,पक्कान्नांची रेलचेल पहिली म्हणून विचारपूस केली तर कळले कि या वेसाकच्या तीन दिवसात सामुदायिक सुट्टी आहे. व मुख्य कार्यक्रम राष्ट्रपती भवनाच्या बाहेरील मोठ्ठ्या चौकात उभारल्या जाणाऱ्या एका भव्य शामियान्यात पहिल्या संध्याकाळी होणार आहे व त्याला तेव्हाचे राष्ट्रपती डॉ. जयवर्धने नी पंतप्रधान श्री.प्रेमदासा स्वतः उपस्थित राहणार आहेत. नशिबाने तो कार्यक्रम जेथे व्हायचा होता ते राष्ट्रपती भवन हॉटेलपासून ५-७ मी. च्या अंतरावर होते.

कार्यक्रमाच्या दिवशी तेथे खूप सजावट केली होती व खास कमान उभारून त्यावर बुद्धाच्या जीवनातील घटनावर अधारिक दृक श्राव्य असा कार्यक्रम दोन्ही प्रमुख पाहुणे तेथे बसून पाहणार होते.

मी कार्यक्रमाचा अंदाज घेतला तेव्हा सुरक्षा व्यवस्थेमुळे त्या दोघांच्या स्वाक्षऱ्या मिळवणे किती कठीण असेल याची कल्पना आली. तरीही कार्यक्रमाच्या तासभर आधी मी काही युक्ती कशी वापरता येईल याचा विचार करत होतो. मुख्य कार्यक्रमाआधी होणाऱ्या प्रार्थनेला दोन्ही पाहुणे उपस्थित झाले. मी लगेच एअर इंडियाचे ओळख कार्ड छातीवर लावले,टाय लावला व हातात वही नी कॅमेरा घेऊन प्रार्थना मंडपाजवळ गेलो. सुरक्षा अधिकाऱ्याने हटकल्यावर त्याला अतिशय नम्रपणे माझे कार्ड दाखवले व कंपनीच्या मॅजीक कार्पेट या मुखपत्रासाठी व भारतीयांच्या माहितीसाठी या श्रीलंकेतील महत्वाच्या सणाची व कार्यक्रमाची काही छायाचित्रे घेऊ इच्छितो असे सांगितले. मग त्याने कार्यक्रमात व्यत्यय येणार नाही याची काळजी घेत फोटो काढायला परवानगी दिली, व त्याच्या देखरेखी खाली मी मर्यादित जागेत फिरत काही फोटो काढत राहिलो.

ठरल्या वेळेला राष्ट्रपती व पंतप्रधान यांचे आगमन झाले व त्यांना प्रार्थनेसाठी बुद्धाच्या सोन्याच्या भव्य मूर्तीजवळ नेले. तेथे त्यांनी मेणबत्त्या व दिवे लावून प्रार्थना केली व नंतर त्यांना पायीच जवळच्या शामियान्यात खास वकडेकोट बंदोबस्तातील आसनांकडे नेण्यात आले. तेथे शेकडो खुर्च्या रस्त्यावर मांडलेल्या होत्या पण मी मिशन स्वाक्षरीसाठी बाजूलाच उभा राहिलो.

मी सारखे निरनिराळे फोटो काढत होतो व फक्त फोटो ग्राफर आहे असे भासवत होतो. दोन्ही पाहुणे स्थानापन्न झाल्यावर अंधार झाला व स्लाईड शो सुरु झाला. ते दोघंही ज्या पहिल्या रांगेत बसले होते. त्या रांगेच्याच टोकाशी मी उभा होतो. जवळ बरेच पोलिस उभे होते. तरीही अंधाराचा फायदा घेऊन माझ्याकडील कॅमेरा शेजारच्या माणसाला देवून मी त्यांच्याशी बोलू लागलो तर फोटो काढ असे त्याला सांगितले. आणि मी गुडघ्यावर रांगत रांगत जेथे राष्ट्रपती बसले होते त्यांच्याजवळ पोहोचलो. त्यांना नमस्कार करून त्यांच्या हातात वही नी पेन दिले व स्वाक्षरीची विनंती केली. त्यांनी स्वाक्षरी केल्यानंतर शेजारीच बसलेल्या पंतप्रधानांकडे वळून त्यांना नमस्कार केला नी वही पेन त्यांच्या हातात देऊन स्वाक्षरीसाठी विनंती केली. त्यांनी देखील काहीही आढे वेढे न घेता स्वाक्षरी दिली. हे होताना त्या माणसाने दोन फोटो काढले पण फ्लॅश झाल्याने सुरक्षा अधिकारी जागे झाले. मी परत येताच त्यांनी माझी कॉलर पकडून बाजूला नेले व मी कोण,कुठला, कुणाच्या



डॉ. जयवर्धने



प्रेमदास

परवानगीने मी तेथपर्यंत कसा पोहोचलो याची माहिती विचारत मला ताब्यात घेऊन बाजूला नेले.

त्या क्षणी मला पुढील सर्व चित्र समोर दिसू लागले. चौकशी, पोलिस कोठडी, शिक्षा !!! आता काही खरं नाही हे कळून चुकले, एवढ्यात माझी कॉलर पकडलेल्या अधिकाऱ्याशी बोलायला दोन पोलिस आले व त्यांच्याशी संभाषण चालू असताना त्याची माझ्या कॉलरची पकड सैल झाली.

त्या क्षणी मी अंधाराचा फायदा घेऊन मी गर्दीत घुसलो, टाय काढून फेकून दिला, शर्ट बाहेर काढला, चष्मा खिशात ठेवला नी कॅमेरा खिशात कोंबून मी तेथून जी धूम ठोकली ती थेट हॉटेलच्या ६ व्या मजल्यावरील माझ्या खोलीत शिरलो. दरवाजा लाऊन घेतला व मग सुटकेचा श्वास सोडला. त्यानंतर दोन दिवस मी बाहेर पडलोच नाही. कारण एकतर परदेशात मी राष्ट्रपती नी पंतप्रधानांच्या कार्यक्रमात व्यत्यय आणला होता त्यामुळे जबर शिक्षा होऊ शकते. या विचाराने देखील छातीत धस्स होत होते.

पण एवढी कसरत केली, एवढा धोका पत्करला तरीही त्यांचे चीज झाले कारण त्या दिवशी माझ्या संग्रहात श्रीलंकेचे राष्ट्रपती डॉ. जयवर्धने व पंतप्रधान श्री. प्रेमदासा यांच्या प्रत्यक्ष मिळवलेल्या स्वाक्षऱ्या व त्या बरोबरच त्यांच्याशी बोलतानाचे माझे फोटो आले होते. हे धाडस मला चांगलेच भोवले असते. इतके कि मी त्यांच्या तुरुंगात सडत पडलो असतो. आणि हे पुस्तकही लिहता आले नसते.

✻

१४.
राजसिंग साब, हॅट्स ऑफ टू यू

१९७८-७९ साली क्लाइव्ह लॉर्डसच्या नेतृत्वाखाली एक वेस्ट इंडीजचा संघ भारत दौऱ्यावर आला होता व त्यांच्या तीन महिन्याच्या दौऱ्याला पुण्यातील एका तीन दिवसीय सामन्याने सुरुवात होणार होती. त्या आधी दोन दिवस हा संघ मुंबईत दाखल झाला आहे व तो संघ ब्रेबॉर्न स्टेडीयमवर सकाळ संध्याकाळ सराव करत आहे असे पेपरमध्ये वाचले. तेव्हा एका दुपारी मी स्टेडीयममध्ये प्रवेश मिळवला व लांबूनच वेस्ट इंडीज संघाचा सराव पाहत होतो. नेटच्या बाहेर हिरवळीवर वेताच्या खुर्चीत बी सी सी आय चे माजी अध्यक्ष राजसिंग डुंगरपुर काही सहकाऱ्यांशी गप्पा मारत होते. ते पुढील २ सामन्यांसाठी भारतीय संघाचे व्यवस्थापक असणार होते हे वाचले होते. त्यांचे लक्ष माझ्याकडे जाताच मी त्यांना नमस्कार केला. तेव्हा त्यांनी विचारले, विजयभाई, तुम्ही येथे काय करत आहात? एअर इंडिया च्या संदर्भात त्यांची तशी तोंडओळख झाली होती पण ते म्या पामराला लक्षात ठेवतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. त्यमुळे त्यांच्या प्रश्नाने मी गांगरून गेलो व म्हणालो, वेस्ट इंडीज खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घ्यायला आलो आहे. त्यावर ते म्हणाले मी इकडे असताना तुम्ही का त्रास करून घेता? वही माझ्याकडे देवून ठेवा, मी स्वाक्षऱ्या घेऊन ठेवेन व वही तुमच्याकडेएअर इंडिया ऑफिसमध्ये पाठवून देईन. माझी अर्धी भरलेली वही कोणाकडे देण्याचे धाडस होत नव्हते. तर माझ्या चेहऱ्या वरील काळजी पाहत तेच म्हणाले काळजी करू नकोस, माझ्यावर विश्वास आहे ना? त्यांनी इतके बोलल्यावर माझी काय बिशाद होती कि मनाही म म्हणेन? मी घाबरतच पण लगेच माझी वही त्यांच्याकडे दिली व त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानून तेथून बाहेर पडलो. खरं तर इतक्या मोठ्या माणसाच्या लक्षातस्वाक्षर्यां ची ही लहान गोष्ट राहील का?त्यांना कुठे शोधायचे, वही हरवली तर? आणि वही मिळालीच नाही तर? आधीच्या सह्या परत कश्या मिळवायच्या? एक ना अनेक प्रश्न



Raj Singh Dungarpur

Dear Vijay,

Sincerely Thank You
for your
congratulatory message
and good wishes
sent on my election
as the President of
B.C.C.I.

with best wishes

डोक्यात पिंगा घालायला लागले.

साधारण ८-१० दिवसांनी मी हे एका सहकाऱ्याला सांगितले तर त्याने मला मुर्खात काढत म्हटलं आता ती वही विसर. त्यांच्या कुठे लक्षात राहणार आहे नी त्यांना स्वाक्षऱ्या घ्यायला ऑकवर्ड नाही का वाटणार? त्याच्या या बोलण्याने तर मी अधिकच काळजीत पडलो. पण नंतर ४-५ दिवसांनी मी दुपारच्या पाळीत काम करत असताना संध्याकाळी साडे सातच्या सुमारास एक सिक्यूरिटी ऑफिसर सेक्शनमध्ये आला नी म्हणाला कि बाहेर कोणी डॉ. सिंग नावाचे गृहस्थ तुम्हाला भेटायला आले आहेत. मला वाटले कि कोणा डॉक्टरला काही अर्जंट सीट रिझर्वेशन हवे असेल. मी त्यांना आत पाठवायला सांगितले. पाचच मिनिटात एक सूट परिधान केलेले गृहस्थ सेक्शनच्या दारात आले नी म्हणाले मिस्टर विजय देशपांडे प्लीज?

मी माझी ओळख करून दिल्यावर त्यांनी कोटाच्या खिशातून एक पाकीट काढत म्हणाले, मी, राजसिंगचा भाऊ, डॉ. सिंग.त्यांनी मला हे पाकीट खास तुमच्या ताब्यात पर्सनली द्यायला सांगतले म्हणून मी आलो. मी ते पाकीट उघडून पहिले तर त्यात माझी स्वाक्षरीची वही होती. मग त्यांनीच मधले पान पान उघडून दाखवले तर त्यावर वेस्ट इंडीज संघाच्या सगळ्या १६ खेळाडूंच्या निरनिराळ्या रंगात केलेल्या स्वाक्षऱ्या होत्या. मी खुश झालो व त्यांना म्हणालो, थँक यू व्हेरी मच. राजसिंग साहेबानाही माझे थॅन्क्स सांगा. मी खूप खुश आहे. ते गेल्यावर मला तर वही परत मिळाल्याचा नी स्वाक्षऱ्या मिळाल्याचा दुहेरी आनंद झाला होता. कारण भारतीय संघाचे व्यवस्थापक म्हणून एवढे व्यस्त असताना देखील राजसिंग यांनी १५ दिवस माझी वही सांभाळली. त्यावर स्वाक्षऱ्या करवल्या आणि नंतर ती मला नीट पोहोचवण्याची तसदी घेतली होती. याचे मला खूप कौतुक वाटले. मनात म्हटले राजसिंग साब, हॅट्स ऑफ टू यू.!!!

*

सचिन तेंडूलकर यांची स्वाक्षरी घेताना लेखक

सचिन तेंडूलकर यांची स्वाक्षरी

लेखक सुनील गावस्कर यांची स्वाक्षरी घेताना बाजूला सचिन

विजय मांजरेकर यांच्यासह लेखक



विजय हजारे

लेखक टायगर पतौडी यांची स्वाक्षरी घेताना



सुनील गावस्कर यांची स्वाक्षरी



दुलीपसिंगजी



विजय मर्चंट

टायगर पतौडी

एन.एस.ताम्हणे

▲ १९८३-८४ मधील ऑस्ट्रेलीयन संघातील खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या

▲ डॉन ब्रॅडमन यांची स्वाक्षरी

▲ पॉली उम्रीगर यांच्यासमेवत लेखक

१५.
दानशूर रमाकांत देसाई

१९५९-६१ च्या काळात भारताला रमाकांत देसाई नावाचा एक द्रुत गती गोलंदाज मिळाला, व तो चांगलाच नावा रुपाला येत होता. ३०० हून अधिक धावा काढणाऱ्या पाकिस्तानच्या हनीफ महम्मदला कायम बकरा करून त्याला जवळ जवळ आयुष्यातून उठवणारा हा फास्ट बॉलर. ह्याच काळात ऑस्ट्रेलियन दौऱ्यासाठी त्यांची निवड झाली, त्यावेळी त्यांचा लहान भाऊ सुरेश रुपारेल कॉलेजमध्ये माझ्याच वर्गात व बॅचमध्ये असल्याने चांगलाच परिचित झाला होता. मी त्याला सहज म्हटले कि रमाकांत ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी जात आहे. जमले तर त्याला माझ्या संग्रहांसाठी काही जुन्या खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या आणायला सांगशील का? तो म्हणाला मी सांगतो पण किती व कसे जमेल माहित नाही, मी म्हटले ठीक आहे. दीड दोन महिन्यांचा दौरा संपवून भारतीय संघ परतला व रमाकांत देसाईही जिमखान्यावर नेहमी सारखा यायला लागला. त्यांना समोर बघितल्यावरही त्याला थांबवून माझ्या कामाचे काही जमले का हे विचारायचे धाडस होईना.

एका संध्याकाळी जिमखान्या वरून परत जाताना त्यांनी मला पहिले, तोपर्यंत सुरेशचा वर्ग मित्र म्हणून त्यांच्याशी तोंड ओळख झाली होती. मला पाहताच त्यांनी थांबून विचारले सुरेशचा मित्र देशपांडे तूच ना? मी हो म्हटल्यावर त्याने पँट च्या मागच्या खिशातून एक पाकीट काढले व त्यातील ८ पदरी घडी केलेला एक पांढरा पातळ पेपर माझ्या हातात दिला व म्हणले हे तुझ्यासाठी.मला कळेना ते काय आहे? मी फक्त आभार मानले व तो गेल्यावर पेपर उघडून पहिला तर ते साऊथ ऑस्ट्रेलियन क्रिकेट असोसिअशनचे लेटर हेड होते व त्यावर त्या तीन स्वाक्षऱ्या होत्या. त्या ऑस्ट्रेलियन दिग्गज खेळाडू लीड्से ह्यासेट, बिल ओरेली व दस्तूर खुद्द सर डॉन ब्रॅडमन यांच्या होत्या. क्रिकेटची पुस्तके वाचून ही मंडळी किती नावाजलेली होती याची मला माहित होती पण त्यांच्या स्वाक्षऱ्या आपल्या संग्रहात कधी काळी येतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. माझ्या हातात सर डॉन ब्रॅडमन यांची त्यांनी स्वतः केलेली व झेरॉक्स नसलेली मूळ स्वाक्षरी होती आणि रमाकांत ने ती इतक्या सहजतेने मला दिली होती यावर माझा विश्वासच बसत नव्हता. मी त्यांचे कितीही आभार मानले असते तरी ते कमीच होते. काय हा दानशूरपणा.

रमाकांत देसाई यांची स्वाक्षरी

*



Reception in honour of

H.R.H. Prince Aga Khan

by

Shri H. H. Ismail, Sheriff of Bombay

and the Committee of Hosts

representing [illegible] Social, Cultural & Educational Institutions of Bombay

at the Cricket Club of India 'Eastern Lawn'

on Thursday 23rd November 1967 at 6.00 p.m.

१६.
एस.पी गोदरेज नी आगाखान

१९८०-८५ साली बोहरी समजाचे धर्मगुरू प्रिन्स आगाखान मुंबईत येणार असल्याचे व त्यांचा सत्कार सी सी आयवर होणार असल्याचे वाचले. खरं तर मी नेहमीप्रमाणे आमंत्रण नसल्याने वेळेआधी कार्यक्रमाच्या स्थळी पोहोचलो होतो पण या वेळी मला आत जाता आले नाही. म्हणून मी तास दीड तास बाहेरच वेळ काढून परत सी सी आय च्या प्रवेश द्वाराजवळ आलो तर काही लोकांना कार्यक्रम संपवून परत जाताना पहिले. व बाजूबाजूने सरकत सरकत आत प्रवेश मिळवला. एका खुर्चीवर त्या कार्यक्रमाचे आमंत्रण कार्ड पडले होते. ते उचलले नी अंदाज घेत फिरत होतो.

एवढ्यात फोटो ग्राफरची गर्दी व गाड्यांची ये जा दिसली त्यावरून तेथे कोणी व्ही आय पी असावेत असा अंदाज केला नी गर्दीत घुसलो. तर खुद्द प्रिन्स आगाखान त्यांच्या विशिष्ट वेशात काही लोकांशी हस्तांदोलन करताना दिसले. त्यांच्यापर्यंत पोहोचण्या आधीच ते एका गाडीत बसले व दुसऱ्या बाजूने त्यांच्याच शेजारी प्रसिद्ध उद्योगपती एस.पी. गोदरेज गाडीत शिरत होते. त्यांना आगाखान बरोबर पाहून लक्षात आले कि गोदरेज त्यांचे

यजमान असावेत. म्हणून मी चटकन आगाखानची स्वाक्षरीची विनंती केली तर त्यांनी त्यांची असहायता दर्शवली तर गाडीचे दार बंद होता होता माझ्या हातातले कार्ड त्यांच्या गाडीत कोंबले व नमस्कार करून त्यावरील फोटोवर आगाखान ची स्वाक्षरी घेण्याची विनंती केली व ते कार्ड मी नंतर तुमच्या कडून घेईन असे खुणेने सांगत होतो. एवढ्यात खिडकीची काच बंद झाली व गर्दीतून वाट काढत काढत गाडी बाहेर निघून गेली.

त्याच वेळी आगाखानच्या आणखीन एका कार्यक्रमाबद्दल वाचल्याचे अंधुकसे आठवले. म्हणून बाहेर येऊनस्टॉलवरचा पेपर वाचला तर पुढील कार्यक्रम ७ वा. ताज हॉटेलमध्ये असल्याचे कळले. मी लगेच ओव्हल मैदान ओलांडून माझा मोर्चा ताजच्या दिशेने वळवला व भर भर तिथे पोहोचलो. समोरच्या फलकावर कळले कि तो कार्यक्रम पहिल्या मजल्या वरील क्रिस्टल रूमच्या हॉलमध्ये होणार आहे. मी जिना चढून त्या हॉलमध्ये आत
शिरणार एवढ्यात शर्टच्या बाह्या वर करून कार्यक्रमाची व्यवस्था पाहत असलेले स्वतः एस.पी. गोदरेज माझ्या दृष्टीस पडले. मी हळू हळू आत शिरलो व फक्त त्यांच्या समोर येईन असा उभा राहिलो.त्यांनी फक्त मला पहिले नी मघाशी कार्ड देणारा तूच का असे विचारले. मी हो म्हटल्यावर माझा हात धरून जवळ जवळ खेचतच जिन्यावरून खाली आणून कॉरीडोर मधून बाहेर नेत बाहेरील शिवाजीच्या पुतळ्याजवळ आणले. मला वाटले बाहेर हाकलतील व रागवत माझा हात सोडतील तर त्यांनी पुन्हा खेचत जवळच पार्क केलेल्या गाडीजवळ नेले. गाडीचे दार उघडून सीटवर असलेले कार्ड मला दिले. मी ते पाहिले तर त्या कार्डवरील फोटोवर आगाखान यांनी केलेली स्वाक्षरी दिसत होती. ते कार्ड माझ्या हातात देत ते म्हणाले,ही त्यांची स्वाक्षरी खास तुझ्यासाठी.आता ती घे नी मला काम करू दे. आणखीन त्रास देऊ नकोस. असे म्हणत ते पुन्हा हॉटेलमध्ये गेले. माझ्या मनात आले कि इतक्या व्यस्त असलेल्या इतक्या मोठ्या उद्योगपतीने ते कार्ड स्वीकारले. त्यावर गाडीतच माझ्यासारख्या एका मामुली मुलासाठी त्यांची स्वाक्षरी घेतली, मी दिसताच मला ओळखून गाडीपर्यंत स्वतः नेवून ते कार्ड स्वतःहून माझ्याकडे सुपूर्त केले यावरून त्यांच्यातील माणुसकीचे दर्शन झाले व ते आधीच इतके मोठे असलेल उद्योगपती आणखीनच मोठे झाले. या त्यांच्या माणुसकीच्या कृतीला माझा नेहमीच सलाम राहिला आहे.

✻

एस. पी. गोदरेज

१७. जगप्रसिद्ध संगीतकार झुबीन मेहता.

एकदा भारतीय वंशाचे मूळ असलेले
जगद्विख्यात पाश्चात्य संगीत संयोजक
conductor of the Philharmonic Orchestra
मुंबईत जन्मलेले झुबीन मेहता मुंबई दौऱ्यावर
आले, मला पाश्चात्य संगीतातील र ट फ सुद्धा
कळत नसतानाही पेपरमध्ये त्यांच्याबद्दल
आलेली माहिती वाचून ही हस्ती खूप मोठी
आहे, ते पाश्चात्य संगीतात जगप्रसिद्ध आहेत
व त्यांचे नाव खूप मोठे आहे हे माझ्या लक्षात
आले व त्यामुळे त्यांची स्वाक्षरी आपण
घ्यायची असे ठरवले. मग त्यांचे कार्यक्रम
कुठे कुठे आहेत त्याकडे लक्ष ठेऊन होतो. पण
प्रत्येक जाहिरातील तिकिटांचे रु. २००, ३००,
५००, १००० असे दर वाचून कार्यक्रमाला



झुबीन मेहता यांची स्वाक्षरी

जाणे कठीण आहे हे माहित होते पण तरीही स्वाक्षरी मिळवायची होती. म्हणून संधीची वाट पाहत होतो. त्यांचा एक कार्यक्रम सायनच्या षणमुखानंद हॉलमध्ये होणार असून तो दूरदर्शनवर थेट प्रक्षेपित होणार असे वाचले. सुमारे एक तास तो कार्यक्रम घरी टी.व्हीवर पहिला.पाहिलाच, कारण कळत काहीच नव्हते, त्यामुळे ऐकण्याचा भागच नव्हता. व्हायोलीन, सेक्साफोन, झायलोफोन, ड्रमर्स,ऑर्गन, पियानो, अशा प्रत्येक प्रकारच्या वाद्यांवर डझन डझन वादक कलाकार गुंग होवून वाजवताना पहिले आणि झुबीन मेहतांचे महत्व पटले.

मी लगेच वही व पेन घेऊन बसने षड्मुखानंद हॉलमध्ये पोहोचलो. कार्यक्रमाला आत जाण्याची कल्पना नव्हतीच. पण तो संपल्यावर आत जाता आले तर झुबीन मेहतांची स्वाक्षरी मिळवायची असा विचार करत होतो. थोड्याच वेळात सुटा बुटातले प्रेक्षक बाहेर पडू लागले तेव्हा कार्यक्रमाची भैरवी सुरु झाली असावी असा कयास बांधला. नंतर परत जाणाऱ्या प्रेक्षकांचे लोंढे जसे बाहेर पडू लागले, तसा मी कडेकडेने हॉलमध्ये शिरलो तर रंगमंचा वरील पडदा उघडला होता. व घामाघूम झालेले १५०-२०० कलाकार आपापल्या वाद्यांची आवराआवर करत होते. त्यातील ९५ टक्के कलाकार अमेरिकन होते. मी हळूहळू स्टेजच्या मागील बाजूस गेलो तर विंगेतून घामाने निथळत असलेल्या स्वतः झुबीन मेहता यांना २-३ लोकांशी चक्क गुजराथीमध्ये बोलताना पहिले. त्यांचे संभाषण संपल्यावर मी त्यांच्याकडे गेलो व नमस्कार करत स्वाक्षरी देण्यास विनंती केली तर मी ५ मिनिटात शर्ट बदलून येतो. व मग स्वाक्षरी देतो असे म्हणाले. व जिन्याने वर रंग पटाकडे गेले. मी त्यांची वाट पाहत थांबलो होतो. एवढ्यात एक

फोटोग्राफर दृष्टीस पडला. मी त्याला खूण केली कि १-२ फोटो काढ असे सांगून ठेवले. थोड्याच वेळात झुबीन मेहता शर्ट बदलून थोडा फ्रेश होऊन आला. तेव्हा तो इतरांच्या गराड्यात सापडण्याआधी मी त्याला गाठले व वही आणि माझ्या लेटर हेडवर स्वाक्षऱ्या घेतल्या. त्याच वेळी फोटोग्राफरला मी खूण केल्या बरोबर त्याने २-३ फ्लाश उडवले. झुबीन मेहतानिघून गेल्यावर त्या फोटोग्राफरने त्यांचे कार्ड मला दिले नी ३-४ दिवसांनी फोन करायला सांगितले. मी घरी आल्यावर वडिलांना स्वाक्षरी दाखवत म्हटले, मघापासून त्याचा कार्यक्रम तुम्ही पहात होतो. त्यांची ही स्वाक्षरी. त्यांना आश्चर्य वाटले नी मी तर एका आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलाकाराची सही मिळवल्या मुळे खूपच खुष होते.

साधारणपणे एक आठवडा उलटल्यावर मी त्या फोटोग्राफरला फोन एल तर त्याने एका प्रतीचे रु. १००/- आकारेन, किती कॉपीज काढू असे सांगितले. तेव्हा तर मला घाम फुटला. कारण हौसेला मोल नाही हे जरी खर असलं तरी मला माझी ताकद माहित होती. त्यामुळे मी त्याला नंतर कळवतो असे सांगितले, पण माझं खरं उत्तर नको असंच होते. परिणामी त्याचा अर्थ माझ्या नशिबी झुबीन मेहतांचा फोटो नव्हता असे दिसत होते. माझ्या हिशोबी त्याला उत्तर मला फोटो नको पण तुझ्या स्टुडीयोत तो जरूर लाव,असे होते. अशा प्रकारे झुबीन मेहतांचा फोटो हा विषय माझ्यासाठी संपलेला होता.

पण तो षड्मुखानंद मधील झुबीन मेहतांचा कार्यक्रम टाइम्स ॲन्ड टॅलेंट नावाच्या संस्थेने केला होता हे माझ्या लक्षात होते. शिवाय निरनिराळ्या प्रवास कंपन्या,क्लब, व रोटरीसारख्या संस्थांकडे एअर इंडियाचे सेल्स अधिकारी त्यांचे प्रवासी मिळवण्यासाठी जात असतात हेही ऐकून होतो. त्यामुळे एका अधिकाऱ्याला या टाइम्स ॲन्ड टॅलेंटकडे कोणी जातात का असे विचारले. त्या अधिकाऱ्याचे नाव कळल्यावर त्याला मी सांगितले कि टाइम्स ॲन्ड टॅलेंटक्लबमध्ये ओळख असली तर त्यांच्या झुबीन मेहताच्या कार्यक्रमाच्या फोटो अल्बममध्ये माझा फोटो असला तर मला मिळवून देशील का? त्या अधिकाऱ्याला माझे स्वाक्षरी संग्रहाचे माहित असल्याने तो प्रयत्न करतो असे म्हणाला.

साधारण एक महिन्यानंतर तो सेल्स अधिकारी मला शोधत माझ्या सेक्शनमध्ये आला नी त्याने एक ब्राऊन पेपरचे पाकिट माझ्या हातात दिले, मला वाटले आरक्षणासाठी काही विनंती पत्रे असतील. पण पाकिट उघडून पहिले तर त्यात मी झुबीन मेहता ची स्वाक्षरी घेतानाचा फोटो होता. माझ्या चेहऱ्या वरील आश्चर्य नी आनंद पाहून त्याने विचारले,आर यू हॅप्पी? मी म्हटले ऑफ कोर्स, आय अम व्हेरी हॅप्पी थॅन्क्स फ़ॉर धिस बट हाऊ मेनी आय हॅव टू पे? तर तो म्हणाला डोंट वरी, इट्स गिफ्ट फ्रॉम मी. ऑल द बेस्ट. मी प्रचंड खुष झालो. मुख्य म्हणजे असा महत्वाचा फोटो मी आस सोडली असताना मिळाला आणि तोही रु. १००/- ऐवजी चक्क चकट फू !

पुढे पुढे जेव्हा झुबीनबद्दल काही ऐकले किंवा वाचले तेव्हा तेव्हा त्याची स्वाक्षरी व वरील फोटोची कहाणी आठवते.

या संग्रहाच्या प्रवासात कधी कधी काही युक्त्याही लढवायला लागल्या होत्या. त्याचेच हे एक उदाहरण !

अशोक कुमार यांची स्वाक्षरी घेताना लेखक

अशोक कुमार यांची स्वाक्षरी

१८. उंचे लोग

मुंबईच्या ताजमहाल हॉटेलच्या आर्ट ग्यालरीमध्ये भरणाऱ्या एका प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध हिंदी सिने अभिनेता अशोक कुमार उर्फ दादा मुनी करणार असल्याचे वाचले. त्याप्रमाणे कार्यक्रमाच्या आधीच मी तेथे पोहोचलो. उद्घावटन समारंभ संपल्यावर प्रमुख पाहुणे अशोक कुमार यांच्या बरोबर चहापान चालू होते. मी त्यांच्याकडे जाणार एवढ्यात तेथील सर्व फोटो ग्राफार्सनी त्यांचा मोर्चा मुख्य दाराकडे वळवला. अशी लगबग,अशा हालचाली, पोलिसांची किंवा आयोजकांची धावपळ, फोटोग्राफर्स पळापळ म्हणजे कोणी नवीन पाहुणे आले असणार हे आत मला हळू हळू कळायला लागले होते. मीही तिकडे पाहिले तर आणखीन एक प्रसिद्ध जानी फेम हिंदी चित्रपट अभिनेता राजकुमार तेथे पोहोचला होता. त्या दिवसात अशोक कुमारांचा सेनाधिकारी व राज कुमारचा इंस्पेक्टर असलेला उंचे लोग नावाचा चित्रपट खूप गाजत होता. त्यामुळे ही जोडगोळी प्रसिद्धीच्या प्रकाश झोतात होती. व त्यांच्या उपस्थितीने त्या कार्यक्रमाला वेगळेच आकर्षण लाभले व पर्यायाने मला दोघांच्याही स्वाक्षऱ्या मिळाल्या तर खूप आनंद होणार होता.

राज कुमार आला. दादा मुनींची भेट झाली. व दोघेही गप्पा मारत होते तेव्हा मी आधी राज कुमारची स्वाक्षरी घेतली व नंतर दादामुनीनकडे वळलो व वही पेन हातात देत स्वाक्षरीसाठी विनंती केली. तर ते म्हणाले अब हम बुड्ढों के ऑटोग्राफ लेने के सिवा नये कलाकारोंकी ऑटोग्राफ लिजिये. तर मी म्हटले, उनके तो लेंगेही पर पहिले आप जैसे उंचे लोगो के तो ले लेते. यावर ते दोघांनी मोठ्याने हसले व मग दादामुनिनी स्वाक्षरी दिली. एका अत्यंत लोकप्रिय नी अतिशय प्रभावी सामर्थ्याच्या अभिनेत्याची स्वाक्षरी मिळाल्याने खूप आनंद झाला.

*

१९.
डॉ. सेथना व नोबेल विजेते

पदार्थ विज्ञान आणि भौतिक शास्त्र या विषयातील नोबेल पारितोषिक मिळवणारे दोन ब्रिटीश वैज्ञानिक ब्लॅकेट आणि पॉवेल आले आहेत व ते ताजमहाल हॉटेलमध्ये त्यांचा सत्कार समारंभ होणार होता. तेथे मी पोहोचलो पण त्यांच्यापर्यंत जाऊ शकलो नाही. थोड्या चौकशी अंती त्या दोघा नोबेल विजेत्या वैज्ञानिक पाहुण्यांसाठी त्याच संध्याकाळी भारताचे अणुशास्त्रज्ञ डॉ. होमी सेथना यांच्या घरी भोजनाचा कार्यक्रम आहे व मध्यरात्री ते लंडनला परत जाणार आहेत असे कळले. मी लगेच टेलिफोन डिरेक्टरी पाहून डॉ. सेथना यांचा पत्ता शोधला. ते पेडर रोडवर एका बिल्डींगमध्ये राहत असल्याच वाचले. मला हळूहळू गेल्या काही वर्षापासून मुंबईतील काही भागांची व तेथे जाणाऱ्या बसेस ची माहिती होऊ लागली होती.

मी लगेच चर्चगेट स्टेशनला जाऊन ग्रांटरोडला रेल्वेने पोहोचलो व पुलावरून बस पकडून पेडर रोडच्या डॉ. सेथना यांच्या बिल्डींग पाशी पोहोचलो.

तिसरा मजला असल्याने व लिफ्ट नसल्याने थोडा दम खात खात तिसऱ्या मजल्यावर पोहोचलो, तर डाव्या हाताला एक सुंदर कोरीव काम केलेले लाकडी दार व त्यावर चकचकीत पितळी मुठ होती. तसेच दारावर त्यांच्या नावाची पाटी होती. मी पुन्हा थोडा दम खाऊन व धीर करून दार वाजवले. तर दार उघडले गेले व दारात पाच सव्वा पाच फुट उंचीचे शेरवानी घातलेले वमध्ये भांग पाडलेले स्वतः डॉ. सेथनाच साक्षात उभे होते. त्यांना नमस्कार करत तुमच्याकडे दोन नोबेल विजेत्या वैज्ञानिकांना भोजन असल्याचे ऐकले, मला त्यांच्या स्वाक्षऱ्या हव्या आहेत. त्यांनी माझ्या घामाघूम झालेल्या अवताराकडे पाहून मला विचारले, पाणी हवंय का?घशाला कोरड पडलेल्या आवाजात मी हो म्हणताच त्यांनी मला दाराजवळील सोफ्यावर बसायला सांगितले व नोकराकरवी चांदीच्या पेल्यातून पाणी दिले. मी मग त्यांनी माझी स्वाक्षरीची वही दाखवत त्यांची स्वतः ची स्वाक्षरी घेतली व माझ्या छंदाबद्दल चार वाक्यं सांगितली.

पण त्या वहीतल्या मार्शल टीटो,हॅरॉल्ड मॅकमिलन, एडवर्ड हिथ, अन्वर सादात, पेले या बरोबर क्रिकेटपटूच्या नी सिने नटांच्या स्वाक्षऱ्या पाहून ते म्हणाले,ते कोणी सिने नट,राजकारणी किंवा खेळाडू नाहीत आणि मुळात धिस इज नॉट द क्रिकेट यू आर प्लेईंग, सो यू शुड नॉट डिस्टर्ब अस. त्यावर मी त्यांना विनवत म्हटले माझ्या संग्रहांसाठी त्यांच्या स्वाक्षऱ्या महत्वाच्या आहेत. व ते आज रात्री मायदेशी परतले तर मी त्यांच्या स्वाक्षऱ्याना कायमचा मुकेन. कृपया मला प्रयत्न करू द्या. मला त्यांना एकदा भेटू द्या. त्यांनी नाही म्हटले तर मी शांतपणे परत जाईन. डॉ. सेथनाना माझी काय दया आली माहित नाही पण मला बसायला सांगितले.

थोड्याच वेळात वक्तृशीर पाहुणे तेथे पोहोचले. त्यांचे स्वागत करून ते स्थानापन्न झाल्यावर डॉ. सेथना त्यांना म्हणाले, देअर इज वन बॉय वेटिंग फ़ॉर युअर ऑटोग्राफ. वूड यू लाईक टू ओब्लाइज हिम? त्यांनी होकार दिल्यावर मला शेजारच्या गच्चीत बोलावले गेले. त्यांच्या स्वाक्षऱ्या होत असताना मी त्यांना माझ्या हातातील फाईल दाखवली त्यात मार्शल टीटो, हॅरॉल्ड मॅकमिलन, एडवर्ड हिथ, मार्गरिट थॅचर,अन्वर सादात, पेले अशा काही महत्वाच्या स्वाक्षऱ्याचा,त्यांच्या पत्रांचा व फोटोचा खजिना होता. तो डॉ. सेथनांनीही पाहिला व तो पाहून कदाचित माझ्या प्रयत्नांना न्याय दिल्याचे समाधानही त्यांना वाटले असावे. स्वाक्षऱ्या झाल्यावर मात्र त्या दोघांपैकी एकजण म्हणाला,थँक यू. डॉ. सेथना,वुई नेव्हर न्यू द्याट वुई वूड बी इन सच रिच कंपनी टूनाईट. त्यांच्या या अभिप्रायाने मी भारावून गेलो. मी डॉ. सेठ्नांचे पुन्हा आभार मानले व पाहुण्यांचा निरोप घेऊन बाहेर पडलो.

माझ्या संग्रहातले आतापर्यंतचे हे ३ रे व ४ थे नोबेल विजेते होते. त्या आधी अमेरिकन कादंबरीकार मिस पर्ल बक व हरित क्रांतीचे जनक डॉ. नॉर्मन बोरलॉग यांच्याही स्वाक्षऱ्या मिळवल्या होत्या.

*

२०.
विमानतळावर वेस्ट इंडीज संघाची भेट.

एकदा क्लाइव्ह लॉइडचा संपूर्ण वेस्ट इंडीज संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यासाठी जाताना लंडन - मुंबई - सिडनी अशा मार्गे एअर इंडियाने जाणार होते त्यात मुंबईत विमान बदलण्यासाठी फक्त दोन तासांसाठी थांबून शहरात न येता तेथूनच विमान बदलून ते सर्व सिडनेला जाणार होते. त्यामुळे दोन तासातच स्वाक्षऱ्यासाठी प्रयत्न करायचे ठरवले व विमानाच्या आगमनाच्या बराच आधी सांताक्रूझ विमानतळावर पोहोचलो व तेथील ड्युटी ऑफिसर श्री. तेलंग यांना भेटलो. तो अधिकारीही क्रिकेट प्रेमी असल्याने त्याला वेस्ट ईंडीयन टीमच्या या हालचालींची माहिती तर होतीच. पण क्रिकेट व स्वाक्षऱ्यांचे वेड त्याला माहित असल्याने मला तेथे पाहून त्याला अजिबात आश्चर्य वाटले नाही. त्यांनी मला कस्टम अधिकाऱ्याकडे नेवून माझ्यासाठी थोडी परवानगी मिळवली. त्यामुळे मला सावध राहणे भाग होते. कारण ज्या भागात विमाने उभी असतात तो भाग अत्यंत संवेदनशील व सुरक्षा कड्याच्या कक्षेत येतो. तेथे कामावर असलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही फिरकायची परवानगी नसते. माझ्याकडे तर फक्त शहरातील ऑफिसचे परिचय कार्ड होते. पण तरीही ड्युटी ऑफिसरच्या मदतीने मी त्या भागात प्रवेश केला होता.

ठरल्या वेळी दुपारी २.३० वाजता लंडनहून आलेल्या एअर इंडियाच्या जम्बो विमानाखाली शिडीजवळ मी उभा होतो. माझा विश्वास बसेना कि मी एका जम्बो खाली उभा होतो. हळू हळू वेस्ट ईंडीयन खेळाडू शिडीवरून खाली उतरले. ८-१० तासांच्या प्रवासानंतर आखडलेले खेळाडू आळस देत, हात-पाय मोकळे करून ताजी हवा घेत होते. आजपर्यंत ज्यांचे फक्त फोटो पहिले होते किंवा ज्यांना टीव्ही वर पहिले होते ते जग प्रसिद्ध खेळाडू प्रत्यक्षात कसे दिसतात, आपसात कसे वागतात ते डोळे भरून पहात होते. (कारण ऐसा मौका फिर कहा मिलेगा?) थोड्याच वेळात त्या सर्वांना शेजारीच १५०-२०० फुटावर उभ्या असलेल्या सिडनीला जाणाऱ्या जम्बो विमानांकडे नेण्यात आले. आपल्या हातातील जड सामान सांभाळत ते परत नव्या विमानात जाऊन बसले. ५-१० मिनिटातच मीही जिना चढून त्यांच्या विमानात गेलो व बरोबर आणलेल्या कात्रणातील पूर्ण टीमच्या फोटोंवर व माझ्या वहीवर प्रत्येकाची स्वाक्षरी घेतली, ज्यात कर्णधार लॉईड, कालीचरण,मार्शल, गार्नर,मरे या व अशा सर्वांचा समावेश होता. मग विमानातील परिचारक कर्मचारी आल्यावर पुन्हा एकदा त्यांना डोळे भरून पाहून मी खाली उतरलो.

एका विमानातून दुसऱ्या विमानात धावपट्टीवर खेळाडूंचा बदल चालू असताना तेथे स्वाक्षऱ्या घेणारा अर्थातच मी एकटाच होतो. याचा मला विशेष आनंद होत होता. अशा प्रकारे कसरत करून स्वाक्षऱ्या घेणारा बहुदा माझ्या सारखा कोणी विरळाच असेल. ड्युटी ऑफिसर श्री. तेलंग यांचे आभार मानून मी वेगळ्याच समाधानाने घरी परतलो.

*

२१.
जागतिक बँकेचे अध्यक्ष रोबर्ट मॅकनामारा

जागतिक बँकेचे भूतपूर्व अध्यक्ष रोबर्ट मॅकनामारा हे मुंबईच्या दौऱ्या दरम्यान ताजमहाल हॉटेलमध्ये उतरणार असल्याचे पेपरमध्ये वाचले. त्यांच्यापर्यंत पोहोचणे कितपत जमेल कळत

नव्हते. त्यामुळे अरेमिकन दूतावासनी ताजमहालच्या पत्त्यावर मी त्याच्या स्वाक्षरीसाठी विनंती पत्रे आधीच पाठवली होती. पण प्रत्यक्ष भेटून स्वाक्षरी घेण्याची जिद्द पेटून उठे. पण एखाद्या राष्ट्राध्यक्षासाठी असावी इतकी कडक सुरक्षा व्यवस्था जागतिक बँकेच्या अध्यक्षासाठी पाहून हबकलो नी वाटले काही खरे नाही. दिवसभर डाळ शिजली नाही, थोडा निराश होऊन घरी परतत होतो तर दोन पोलिसांकडूनच ही व्ही आय पी पार्टी दुसरे दिवशी ६ला ताज मधून निघून परदेशी प्रयाण करणार असल्याचे कळले, मग मीसुद्धा माझी आखणी केली.

दुसरे दिवशी पहाटे ४ वाजता उठून तासाभरात घरा बाहेर पडलो नी लोकल ट्रेनने चर्चगेट व नंतर ओव्हल मैदान क्रॉस करून साडे ५पर्यंत ताजमहाल गाठले. व्ही आय पी सूट ५ व्या मजल्यावर आहे असे कळले म्हणून ५ माजले चढायला लागलो तर जिन्यात प्रत्येक मजल्यावर २-२ पोलिसांचा कडक बंदोबस्त होता. म्हणून मनात आपले काही खरे नाही आपण परत जावे हे म्हणून खाली आलो तर प्रमुख दाराजवळ काही हालचाल दिसली व ३-४ गाड्या येउन उभ्या राहिल्या. आता इतक्या वर्षात अशा हालचालीचा अर्थ मला कळायला लागला होता. मी वही नी पेन घेऊन सज्ज झालो. व दाराजवळच्या एका कोपर्यागत जाऊन उभा राहिलो. लिफ्ट ने सुट घातलेले स्वतः रोबर्ट मॅकनामारा खाली आले व गाडीकडे जात होते. त्यांच्या बरोबर काही साध्या वेशातले सी आय डी अधिकारी त्यांच्या भोवतीकडे करून चालले असताना मी थोडे धाडस करत त्यांच्याजवळ पोहोचलो, त्यांना गुड मोर्निंग करून अभिवादन केले व वही नी पेन देऊन स्वाक्षरीची विनंती केली. त्यांनी गाडीचे दार बंद होण्याआधी मला स्वाक्षरी दिली व लगेच ते त्यांच्या ताफ्याबरोबर भुर्रकन निघून गेले. सुदैवाने पहाटेच्या ६ ची वेळ असल्याने माझ्या सारखे स्वाक्षरी घेणारे कोणीही नव्हते त्यामुळे एखाद्या राष्ट्राध्यक्षाच्या मानाच्या या व्यक्तीची स्वाक्षरी मला सहज मिळाली.

*

२२.
दोन चुकले पण आनंद भेटला.

आनंद भेटला हे जर वेगळे मराठी वाटेल पण मला तेच म्हणायचे आहे. त्याचे असे झाले कि विश्व विख्यात अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन मुंबईच्या भेटीवर आले. त्यांचे मुंबईत पहिलेच एक खुले भाषण नरिमन पॉइन्ट येथील अत्यंत अलिशान अशा टाटा ऑडीटोरीयममध्ये संध्याकाळी ६ वाजता होणार होते. त्या आधी वरळीच्या वल्लभभाई स्टेडीयम येथील नॅशनल स्पोर्ट्स सेंटर येथे बॅडमिंटनच्या सामन्यासाठी राष्ट्रीय विजेता गोपीचंद व राष्ट्रीय विजेती अपर्णा पोपट हे येणार होते. ते सामने दुपारी दोन वाजता सुरु होणार होते. तेथे अपर्णा पोपट हिची स्वाक्षरी घेतली व तिच्या बरोबरच फोटो तिच्या वडिलांकडूनच काढून घेतला. तिथे गोपीचंद यांची वाट पाहत होतो, पण त्यांना यायला उशीर झाला नि ५ वाजल्यानंतर मी बसने डॉ. अमर्त्य सेन यांच्या भाषणासाठी नरिमन पॉइन्टला जाण्यासाठी बाहेर पडलो.

भाषण सायं. ६ वाजता होते, पण लवकर आलेल्यांना बाहेर रांगेत उभे केले होते. कारण भाषण खुले असल्याने प्रथम येणाऱ्याला प्रथम प्रवेश मिळणार होता. मीही रांगेत उभे राहिलो. पण हळू हळू गर्दी खूप वाढायला लागली. मला हॉलच्या तिसऱ्या मजल्यावर पाठवले गेले. पण तेथे शिरायलाही जागा नव्हती.

कसे बसे आत गेलो तर वरून पहिले कि तीनही मजले तुडुंब भरले होते व चेंगरा चेंगरी सुरु झाली. व त्यामुळे तेथील बसण्याच्या व्यवस्थेचे तीन तेरा वाजले होते. पण ते माझ्या पथ्यावर पडले. मी संधी साधून खाली आलो. तेथे कोणताही अडसर न जुमानता मी सभागृहाच्या आतील पायऱ्या एक एक करत उतरत गेलो व थेट पहिल्या रागेजवळील मधल्या जागेत कसाबसा पोहोचलो. तेथील वातावरण पाहून खुर्चीची आशा व लाज न बाळगता पायरीवरच जागा पटकावली. भाषण सुरु झाले तरी लोकांची चेंगरा चेंगरी व ढकला ढकली चालूच होती. उडालेल्या गोंधळामुळे तर भाषणात २-३ वेळा व्यत्ययही आला पण त्याकडे दुर्लक्ष करत. डॉ. सेन यांनी भाषण चालूच ठेवले. भाषण अर्थशास्त्रावरील असल्याने मला एकही अक्षर कळत नव्हते. पण त्यांना मिळणाऱ्या प्रतिसादा वरून डॉ. सेन किती मोठे असावेत याचा अंदाज येत होता. भाषण चालू असताना मी मात्र एवढ्या गर्दीतून त्यांच्यापर्यंत कसे पोहोचायचे याचाच विचार करत होतो.

४०-५० मिनिटांनंतर भाषण संपल्यावर आभार प्रदर्शन सुरु असतानाच लोकांचे लोंढे डॉ. सेन यांना भेटण्यासाठी खाली यायला लागले. तसे मी थेट स्टेजवर पोहोचलो, व आभाराचे चार शब्द संपता क्षणी मी टेबलाजवळ जावून त्यांची स्वाक्षरी मागितली. पण क्षणाची उसंत न देत आयोजकांच्या स्वयंसेवकांनी त्यांना मागच्या दरवाज्याने गाडीजवळ पोहोचवले व पोलिसांच्या मदतीने रस्ता मोकळा करत बाहेर पाठवले. परिणामी संध्याकाळी त्यांनी कोणालाच स्वाक्षरी दिली नाही.

हॉल बाहेर पडताना मला दोन समछंद स्वाक्षरी संग्राहक भेटले व कोणालाच यश न मिळाल्याने आम्ही सगळेच सम दुःखी होतो. नंतरच्या गप्पात रात्री ८ वाजता विश्व विजेत्या बुद्धिबळ पटू विश्वनाथ आनंद याचा सत्कार राजभवनात होणार आहे व तेथे ते दोघे कारने निघाले होते.औपचारिकपणे गाडीत जागा आहे का विचारल्यावर करूया कसे तरी अडजेस्ट असे कारच्या मालकाने सांगितल्यावर आम्ही तीनही स्वाक्षरी वेड्यांनी मोर्चा राजभवनाकडे वळवला. तेथे पोहोचताना स्वाक्षरी हुकण्याचा इजा,बिजा,नि आता तिज्या होणार नाही न किंवा तीन तिघाडा काम बिघाड असे होणार नाही न याची काळजी वाटत होती. अर्ध्या तासात मरीन ड्राइव्ह वरून राजभवनात पोहोचलो. तो कार्यक्रम आधीच सुरु झाला असल्याने प्रवेश सहज मिळाला व स्वतः आनंदला स्टेजवर पाहिल्यावर जरा हायसे वाटले. मग पुन्हाकडेकडेने वाट काढत स्टेजपर्यंत पोहोचलो व समारंभ संपता क्षणीच स्टेजवरच आनंदाची स्वाक्षरी घेतली. मित्राकरवी त्यांच्याबरोबरच फोटो ही काढून घेतला. मित्राचाही आनंदबरोबर फोटो काढला. मग इतर गर्दीत ग्रँड मास्टर प्रवीण ठिपसे व खाडिलकर भगिनींसह इतरही खेळाडू दिसले. मग त्या सर्वांच्या स्वाक्षऱ्या घेऊन रात्री ११ला घरी पोहोचलो. आधी गोपीचंद व नंतर डॉ. सेन यांच्या स्वाक्षऱ्या चुकल्या होत्या पण दिवसभरात विश्वनाथ आनंद सारख्या जागतिक कीर्तीच्या भारतीय ग्रँड मास्टरची स्वाक्षरी मिळाली याचे समाधान वाटले कारण तोही आनंद कमी नव्हता.

*

२३.
नोबेल विजेते अर्थतज्ज्ञ डॉ. अमर्त्य सेन

आधीच्या अनुभव कथेत डॉ. सेन यांची स्वाक्षरी कशी चुकली ते वाचले. पण अशा एका अपयशाने नाराज होणारा वा हिरमोड होणारा मी नसल्याने स्वाक्षरी संग्रहाच्या बाबतीत मात्र पुन्हा पुन्हा पडल्यावरही जिद्द न सोडता वर चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोळयाचा मी बाप आहे. व तीच जिद्द काही दिवसांनी कामी आली.

काही दिवसातच डॉ. अमर्त्य सेन यांना अर्थ शास्त्राचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले व माझे लक्ष पुन्हा त्यांची स्वाक्षरी मिळविण्याच्या विचारात मग्न होते. एक दिवस मुंबई विद्यापीठानेसुद्धा त्यांना सन्माननीय डी.लिट. ही पदवी देण्याचे जाहीर केले. तो कार्यक्रम विद्यापीठाच्या राजाबाई टॉवर शेजारील पदवीदान समारंभात होणार होता. त्याला राज्यपाल येणार होते असे वाचेल. त्यासाठी डॉ. सेन आदल्या दिवशीच ताजमहाल हॉटेलमध्ये उतरल्याची माहितीही मिळवली. पदवीदान समारंभ सायंकाळी ५.३० वाजता होणार होता. त्या नुसार मी काही अंदाज बांधला कि ५.०० वाजता तेथे पोहोचायला ते ४.४५ला बाहेर पडणार असतील तर त्याआधी त्यांना हॉटेल मधेच भेटता येईल का? व त्यानुसार मी दुपारी ३ वाजल्यापासूनचजवळ जवळ त्यांच्या

खोली क्र. ३०३ च्या बाहेर ठिय्या मांडून येरझाऱ्या घालत वेळ काढत होत-ो. कि जेणे करून कधीतरी त्यांच्या खोलीचे दार उघडले गेले तर स्वाक्षरी मागता येईल. कारण पूर्व परवानगी शिवाय बेल वाजवून थेट भेटणे रास्त नव्हते. साधारण सव्वा चारच्या सुमारास दोन गृहस्थ त्यांच्या खोलीकडे गेले. मग त्यांच्याशी बोलून दोन मिनिटातच बाहेर आले, व तळ मजल्याकडे गेले. आणि माझा अंदाज बरोबर ठरला कारण ते दोघे विद्यापीठाचे अधिकारी त्यांना घेऊन जायला आले होते.

बरोबर ४.४५ला हातावर कोट ठेऊन टायची गाठ मारत डॉ. सेन बाहेर आले, नि लिफ्टसाठी थांबले होते. तिथे मी एकटाच होतो. मी धाडस करून त्यांना अभिनंदन करण्याची औपचारिकता झाल्यावर माझी ओळख एअर इंडियात नोकरी करतो व हे तुमच्या स्वाक्षरीसाठी विनंती पत्र असे म्हटले व बरोबर आणलेले पाकीट त्यांच्या हातात दिले. तोपर्यंत लिफ्ट आल्याने ते आत शिरले. मीही त्यांना विचारून त्याच लिफ्टमध्ये शिरलो. खाली येईपर्यंत त्यांनी अर्थतज्ञाला साजेसा एकच यक्ष प्रश्न विचारला, एअर इंडिया व इंडियन एअर लाईन्सच्या विलीनीकरणाचे कुठपर्यंत आले? खरं तर माझी विकेट गेली होती. पण तरीही मीही थोड्या धिटाईने मी आरक्षण विभागात खूप लहान स्टाफ आहे, ते विलीनीकरणाचे मला माहित नाही. कदाचित वरचे मोठे अधिकारी त्या संबधी ठरवत असतील, असे उत्तर दिले. तळमजल्यावर आल्यावर मघाच्या दोन व्यक्तींनी त्यांचे स्वागत केले, पैकी एक विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. खोले होते. ते त्यांना न्यायला आले होते. त्यांना गेट पाशी नेउन गाडीची वाट पाहत थांबले. तेवढ्यात संधी साधून मी डॉ. सेन त्यांना वही व पेन दिले. व स्वाक्षरीसाठी विनंती केली, व मी एकटाच असल्याने त्यांनी मला स्वाक्षरी दिली. स्वाक्षरी मिळाल्याचा खूप आनंद झाला, पण आजूबाजूला कोणीच नसल्याने फोटोचे मात्र जमवता आले नाही.

तेथून मी चर्चगेट स्टेशनकडे परत येत असताना विद्यापीठाच्या बाजूने राजाबाई टॉवर जवळून चाललो होतो, तेथे प्रांगणात डॉ.सेन यांच्या पदवीदान समारंभासाठी भव्य मंडप घातलेला होता. तेथे इतका कडेकोट बंदोबस्त होता कि पलीकडचे चिटपाखरूही दिसत नव्हते. ते पाहून मी मनात म्हटले, येथे एवढा बंदोबस्त नि तिकडे ताजमहाल हॉटेलमध्ये मी एकटा त्यांच्या बरोबर लिफ्ट ने येउन त्यांची स्वाक्षरी स्वतः घेऊ शकलो, किती भाग्यवान मी?

*

२४.
पु.ल. देशपांडे यांचा ६० वा वाढदिवस

मला आयुष्यात दोघा महान व्यक्तींचे ६० वे वाढदिवस अनुभवत आले. एक पु.ल. देशपांडे व दुसरे
बाळासाहेब ठाकरे!

८ नोव्हेंबर १९७९ रोजी महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व व माझे वैयक्तिक दैवत पु.ल. देशपांडे यांचा ६० वा वाढदिवस होता. त्यांना तसा एक दोन वेळा भेटलो होतो नि स्वाक्षरीही घेतली होती, अगदी फोटोसह! पण काही व्यक्तिमत्वाच इतकी थोर असतात कि त्यांना एकदा भेटून समाधान होत नाही आणि त्यांच्या कीर्तीला पुरेशी दाद दिल्याचे समाधान वाटत नाही नि पुनःपुनः भेटायचा योग आला तर चुकवता येत नाही. जसे जेआरडी टाटा,लता मंगेशकर, पं. कुमार गंधर्व, पं. भीमसेन जोशी, सचिन तेंडूलकर इ. त्याच मालिकेतील एक अग्रगण्य व्यक्ती म्हणजे पु.ल. !

१९६६ मध्ये हातात पडलेले त्यांचे प्रवास वर्णन अपूर्वाई एका बैठकीत संपवले व माझीच वाचनाची काही रेकॉर्ड्स मी मोडीत काढली. त्या पुस्तकाने मी इतका

vijay deshpande

with

Ustad Bismillah Khan

Pele

Mr. J. R. D. Tata

Mr. Harold Macmillan

Dr. Christian Barnard

Mr. Jayaprakash Narayan

Sir Edmund Hillary

[illegible]

२८ नोव्हेंबर १९७८

मा० पु० ल० [illegible] –

आपल्या "साठी" निमित्त

जीवेत् शरदः शतम्!

तुम जीओ हमारे साल —!

MANY HAPPY RETURNS!

आपला
विजय देशपांडे

[illegible]
विनंती – कृपया [illegible] आपली सही मिळेल काय?
[illegible]

पु. ल. देशपांडे

[illegible], bombay-400 028

[illegible], आशीर्वाद – मुंबई [illegible]

स.न.
पत्र पोहोचले. [illegible]
[illegible] पत्र लिहिले [illegible]
[illegible] लिहिले [illegible]
[illegible] कृपालोभ असो — [illegible]
पु. ल. देशपांडे

पु.ल. देशपांडे

पुणे ४
५-१२-७८

प्रिय विजय,

माझ्या ६० व्या वाढदिवसानिमित्त पाठवलेल्या शुभेच्छा मिळाल्या. त्याबद्दल छापील पत्राने आभार मानणं मला प्रशस्त वाटत नाही. पण तुमच्यासारख्या माझ्या इष्ट मित्रांनी माझ्यावर शुभेच्छांचा एवढा वर्षाव केला आहे की प्रत्येकाला पत्र पाठवून आभार मानणं अगदी अशक्य आहे. आयुष्यातल्या उरलेल्या वाटचालीसाठी तुमच्या सद्भावनांचा मला फार मोठा आधार लाभला आहे. त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद — तुम्हाला आणि श्री डी. वाय. देशपांडे यांना

तुमचा
पु. ल. देशपांडे

बाळासाहेब ठाकरे यांची स्वाक्षरी घेताना लेखक



सुभाषचंद्र बोस यांची स्वाक्षरी



आर. के. लक्ष्मण यांची स्वाक्षरी

आर. के. लक्ष्मण यांची स्वाक्षरी

किशोर कुमार यांची स्वाक्षरी घेताना लेखक

किशोर कुमार यांची स्वाक्षरी



पं. दिनदयाळ उपाध्याय यांची स्वाक्षरी

प्रभावित झालो कि दुसरेच दिवशी आडनावाचा फायदा घेऊन त्यांच्याशी अघोषित काकांचे नाते जोडले व तोपर्यंत वाचलेल्या त्यांच्या साहित्याचा व कलाकृतींचा गौरव करणारे १०-१२ पानी पत्र लिहिले. त्याला त्यांनी ४ ओळींचे एक कार्डावर स्वतःच्या अक्षरात पाठवले. हे मला खूप मोलाचे वाटते. त्यानंतरह ३-४ वेळा मला त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचे योग आले व त्या क्षणाचे मी सोने केले हे सांगायला नको. ते सुवर्ण क्षण माझ्या आठवणीच्या खास कप्प्यात खास जपून ठेवले आहेत.

अशा परम प्रिय पुलं चा ६० वा वाढदिवस म्हटल्यावर प्रथम ८ दिवस आधी मी एक अभिनंदनपर पत्र लिहिले. मग त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी संध्याकाळी त्यांचा धोबीतलाव येथील रंगभवनमध्ये जाहीर सत्कार झाला. त्या प्रसंगी माझ्या लेटर हेडवर त्यांना खास शुभेच लिहिल्या. त्या षठ्याशब्दी पूर्ती निमित्त हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा, मेनी मेनी हॅप्पी रीटर्न ऑफ द डे. आणि तुम जियो हजारो साल अशा तीन भाषेत लिहिलेल्या होत्या. तेव्हा मला ६० भाषा यायला हव्या होत्या अशी खंत वाटून गेली. कार्यक्रम संपल्यावर तेथे जमलेल्या झुम्बडीत देखील मी तो त्यांना दाखवला तर त्यांनी त्यावर स्वाक्षरी करून (म्हणजे वाचून पोच देत) व त्या क्षणाला फोटोत टिपण्याची परवानगी देत परत केला. त्याच कागदावर त्यांच्या शेजारी बसलेल्या त्यांच्या मातोश्री लक्ष्मी बी देशपांडे यांचीही स्वाक्षरी घेतली. पुढे कोणीतरी विचारले त्यांच्या आई ची स्वाक्षरी कशाला? मी म्हटले त्या विरपुत्राच्या वीरमाता आहेत म्हणून ! आजच्या घडीला पुलंची स्वाक्षरी असणारे लक्षावधी चाहते सापडतील पण त्यांच्या मातोश्रींची स्वाक्षरी फार थोड्या जणांकडे असेल. त्यामुळे माझ्या आनंदाला पारावर उरला नाही.

आणि बाळासाहेब ठाकरेंचा ६० वा वाढदिवस !!

२३ जानेवारी १९९१ रोजी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना ६० वर्ष पूर्ण होत होती. त्या निमित्ताने शिवाजी पार्क येथील सेना भवनावर खूप गर्दी जमली होती. चौकशी करता कळले कि रांग लावून प्रत्येकाला बाळासाहेबांना प्रत्यक्ष त्यांचे अभिनंदन करता येणार होते. मी व लहान भाऊ अविनाश आम्ही वही पेन व कॅमेरा सह रांगेत उभे राहिलो. रांग पुढे सरकत सरकत आम्ही दुसऱ्या मजल्यावर पोहोचलो. तेथे हार व पुष्पगुच्छ यांचे ढीग पडले होते. आमचा नंबर आल्यावर प्रथम बाळासाहेबांच्या शेजारी असलेल्या त्यांचे बंधू संगीतकार श्रीकांत ठाकरे यांची स्वाक्षरी घेतली. आम्ही दोघा भावांनी आलटून पालटून बाळासाहेबांना भेटलो. हस्तांदोलन करून त्यांचे अभिनंदन केले. स्वाक्षऱ्या घेतल्या आणि त्यांच्या बरोबरचे फोटोही काढले.

खरं तर त्यांच्या व्यंग चित्र मासिकाच्या दुसऱ्या वर्धापन दिन विशेषांकावर त्यांची स्वाक्षरी आधीच घेतली होती, पण त्यांच्या ६० व्या वाढ दिवशी त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली. त्यावेळी सेना भाजपच्या युतीच्या पहिल्या सभेच्या वेळी घेतलेल्या त्यांच्या फोटोवर त्याचं स्वाक्षरी घेतली व तो क्षणही फोटोमध्ये साठवला.

*

२५.
आर्ट ऑफ लिव्हिंग चे श्री श्री रवि शंकर

नरिमन पॉइन्ट येथील टाटा थिएटरमध्ये जागतिक कीर्तीच्या आर्ट ऑफ लिव्हिंग उपक्रमाचे जनक श्री श्री रवि शंकर यांचे योगाच्या प्रात्यक्षिकासह प्रवचन होणार होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचलो तर तो कार्यक्रम फक्त आमंत्रित सभासदांसाठी होता असे कळले. बाहेर तुफान पाऊस चालू होता. मी पावसामुळे ओलाचिंब झालो होतो, पण बरोबर माझा एक लकी शर्ट ब्यागेत घेतलेला होता. तरीही कार्यक्रमाला प्रवेश मिळेल असे वाटत नव्हते. मुख्य प्रवेशद्वाराजवळ गेलो तर तेथे रु. ७५०/- भरून तात्पुरते सभासदत्व मिळू शकत होते. ते भर नि कार्यक्रमास या असे सांगण्यात आले. त्यामुळे एकतर पूर्ण भिजलो असल्याने हॉल च्या ए.सी.ने कुडकुडत होते, व ७५०/- रु. आवाक्यात नसल्याने प्रवेश न मिळाल्याने नाराजही होतो.

इतक्यात पूर्ण सुटा बुटात छातीवर मोठ्ठा बिल्ला लावलेले एक सद्गृहस्थ समोर दिसले. शेवटचा प्रयत्न म्हणून मी त्यांना सांगितले मी खूप लांबून आलो आहे आणि मला प्रवचन ऐकण्याची खूप इच्छा आहे, पण सभासद नसल्याने आत येता येत नाही. माझी त्यांना काय दया आली माहित नाही. त्यांनी दरवाज्यावरील कार्यकर्त्यांना खूण करून मला आत जाऊ देण्याबद्दल सांगितले. मी त्या भल्या सद्गृहस्थाचे मनोमन आभार मानले. कारण प्रवेश मिळाल्याबद्दल खूप हायसे वाटले. चिंब भिजलेल्या स्थितीत एवढ्या लोकांमध्ये कसे बसायचे याचा विचार केला तर बॅग मधल्या शर्टची आठवण झाली. लगेच प्रसाधन गृहात जाऊन शर्ट बदलला

नि केस विंचरून ओल्या पँटनेच सभागृहात शिरलो. बसायची व्यवस्था काही नियमित अशी दिसली नाही. त्यामुळे चौथ्या रांगेत थोडाकडेला जागा मिळवून बसलो नि कार्यक्रम सुरु होण्याची वाट पाहत होतो. तेथील लोकांचे कपडे जरी पांढरे होते, तरी त्यांचे हाय फाय राहणे काही लपू शकत नव्हते. मी मनात म्हटले कार्यक्रमाला ७५०/-रु. तिकीट असले तर नवल नाही.

इतक्यात डावीकडील दरवाजाजवळ कार्यकर्त्यांची व काही यजमान मंडळींची लगबग दिसली. तसेच फोटोग्राफरही धावताना दिसले. तर क्षणातच टीव्ही कॅमेऱ्यांच्या प्रकाशांत पांढऱ्या धोतर कुडत्यातले दाढी व लांब केसाचे पण तेजस्वी चेहर्यामचे हसतमुख स्वतः श्री श्री रविशंकर हॉलमध्ये येताना दिसले. त्या धावपळीचा नि गर्दीचा फायदा घेऊन मीही माझ्या कॅमेरातून त्यांचे ३-४ फोटो टिपले. हळू हळू सर्वांचे अभिवादन स्वीकारत नि सगळयांना आशीर्वाद देत ते रंगमंचावर पोहोचले. मग कार्यक्रम सुरु झाला. प्राथमिक स्वागतपर नि परिचयाच्या भाषणानंतर व खुद्द श्री श्री रविशंकरजींचे प्रवचन सुरु झाले. तासभर योगासह अध्यात्मावरील त्यांचे भाषण झाले. सोबत त्यांनी भक्त श्रोत्यांकडून प्राणायामाचे काही योग करूनही घेतले.

तासभराच्या त्यांच्या मंत्रमुग्ध प्रवचनानंतर आभार प्रदर्शन सुरु होताच मी फिल्डिंग लावायला सुरुवात केली. म्हणजे स्वाक्षरी कशी मिळवायची त्याची तयारी करू लागलो. लगेच मी हळू हळू स्टेजच्या डाव्या बाजूला जाऊन श्री श्रीजींना वाकून नमस्कार केला. त्यांनी पाठीवर हात ठेऊन आशीर्वाद दिला. पण मी लगेच माझी वही व पेन पुढे करून त्यांना आशीर्वाद म्हणून स्वाक्षरी देण्यास विनंती केली. हे असे योगी पुरुष स्वाक्षरी देतील कि नाही याबद्दल

मी जर साशंक होतो. कारण पूर्वी प.पु.गोळवलकर गुरुजींनी, विनोबा भावे, यांनी स्वाक्षरी दिली नव्हती. तर डॉ. सी.डी. देशमुख,भारत रत्न डॉ. पां. वा. काणे,डॉ. नारायण मूर्ती यांनीही तत्व म्हणून स्वाक्षरी देण्यास नकार दिला होता. तरीही मी श्री श्री जीना आपल्या हस्ताक्षरात आशीर्वाद द्या असे आग्रहाने विनवले. तेव्हा माझ्या हातातील पेन घेऊन त्यांनी वहीवर फक्त श्री श्री असे लिहून दिले. आणि तसा त्यांचा लेखी आशीर्वाद मिळवणारा मी एकटाच ठरलो. कारण त्यानंतर त्यांच्या भक्तांची एवढी गर्दी उसळली नि झुंबड उडाली कि त्यांना कोणालाही लिहून देणे शक्य झाले नाही.

शेवटी पुन्हा एकदा त्यांत अशक्य परिस्थितीतही माझा लकी शर्ट एवढा लकी ठरला कि कार्यक्रमाला केवळ प्रवेशाच नाही तर श्री श्री च्या हस्ताक्षरात आशीर्वादही मिळाला होता.

याचा कार्यक्रमाला उपस्थित आणखीन दोन व्यक्तीच्या त्या दिवशी स्वाक्षऱ्या मिळाल्या त्या म्हणजे विश्व सुंदरी लारा दत्त नि प्रसिद्ध उद्योगपती राहुल बजाज यांच्याही स्वाक्षऱ्या मिळाल्या. म्हणजे आंधळा मागतो एक, नि देव देतो तीन, असा अनुभव आला. लकी शर्टला पुन्हा अनेक धन्यवाद !!

*

२६.
आय एम सी हॉल !

तशा मुंबईत बऱ्याच जागा आहेत जिथे मला मौल्यवान स्वाक्षऱ्या मिळाल्या. अगदी शिवाजी पार्कपासून मुंबई विमानतळ किंवा घराखालील शेटे हॉटेलपासून थेट ताजपर्यंत ! किंबहुना अशा थोड्याच जागा असतील कि जिथे मी स्वाक्षरी मिळवली नाही. पण या यादीत मोठे योगदान आहे ते ताज महाल हॉटेल व आय.एम.सी हॉल यांचे. म्हणजे चर्चगेट स्टेशन समोरील ईंडीयन मर्चंट चेंबर हॉल.

याच आय.एम.सी हॉलमध्ये एका रविवारी सकाळी एका लेडीज क्लबच्या समारंभसाठी प्रसिद्ध अभिनेता अनिल कपूर येणार आहे असे पेपरमध्ये वाचले. मि. इंडिया सारख्या अनेक चित्रपटामधील एक नायक म्हणून तो माझ्या स्वाक्षरी संग्रहाच्या रडारवर होताच. मी लगेच तयारी करून सकाळी ९ च्या कार्यक्रमाला १० मिनिटे आधीच पोहोचलो. लेडीज क्लबचा कार्यक्रम असल्याने प्रवेश मिळतो कि नाही ही धाकधूक होतीच. पण कसा तरी आत घुसून कोपऱ्यात जागा मिळवली. ९ चे १०.३० वाजले तरी कार्यक्रम सुरु होण्याची लक्षणे दिसेनात. शेवटी १०.४५ च्या सुमारास एक उद्घोनषणा झाली कि अनिलला कपूर लोणावळ्याजवळ अपघात झाला असल्याने तो येणार नाही. त्यामुळे कार्यक्रम रद्द झाला आहे. इतक्यात आणिक एक निरोप आला कि अनिल कपूर ऐवजी दुसरा पाहुणा येत आहे. त्यामुळे कार्यक्रम होणार आहे. काही मिनिटातच बदली पाहुणी हॉलमध्ये हजर झाली नि सर्वांना एकदम सुखद आश्चर्याचा धक्का बसला. कारण बदली पाहुणा दुसरा तिसरा कोणी नसून स्वप्न सुंदरी लक्षावधी सिने प्रेमी लोकांची आवडती माधुरी दीक्षित होती. इतरांप्रमाणे माझाही विश्वास बसेना. पण तिला प्रत्यक्ष पाहत होतो. काही काळ म्हणजे जवळ जवळ १५ मिनिटे तर तिचे फोटो काढण्यात गेले. मग कार्यक्रम सुरु झाला. कोणाचेही लक्ष कार्यक्रमाकडे नव्हते. पण केवळ त्या स्वप्न सुंदरीला पाहण्यात होते. हे सांगणे न लगे. तेथील महिलांची जर अशी परिस्थिती होती तर म्या पामराची काय कथा !!

कार्यक्रम संपल्यावर काही वेळ टीव्ही मुलाखतीत गेला. मग ग्रुप फोटोत गेला. व मग शेवटी ती जेव्हा परत जायला निघाली तेव्हा लिफ्टजवळ तिला भेटून तिची स्वाक्षरी घेतली व शेजारील एका प्रेस फ़ोटोग्राफ़रला फोटो काढायला सांगितला. आता त्याही वेळेस किती गर्दी असेल याची कल्पनाच केलेली बरी. पण एका महत्वाच्या आघाडीच्या अभिनेत्रीची स्वाक्षरी मिळाली व तीही माधुरी दीक्षितची याचा आनंद वेगळाच होता. व तेही अनिल कपूरसाठी आलो असताना हे विशेष !

याच आय.एम.सी हॉलमध्ये एकदा प्रसिद्ध अणु शास्त्रज्ञनी भाभा अणुशक्ती

संशोधन केंद्राचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांचा पद्मविभूषण मिळाल्याबद्दल सत्कार होणार होता. मी तेथे गेलो. कार्यक्रमानंतर त्यांची मुलाखत चालू असताना त्यांना स्वाक्षरी ची विनंती केली तर त्यांनी खुशी-ने दिली तर मला खूप आनंद झाला होता. कारण डॉ. होमी सेथना व डॉ. एम.जी.के मेनन यांच्यानंतरचे माझ्या संग्रहातील ते तिसरे बी.ए.आर.सी चे अध्यक्ष आणि एक पद्म विभूषण होते.

याच हॉलमध्ये आधी विजय मर्चंट,राजसिंग डुंगरपुर, व पुढे सास भी कभी बहु थी फेम स्मृती इराणी (आताच्या केंद्रिय मंत्री) व प्रसिद्ध समाज सेवक डॉ. प्रकाश व डॉ. सौ.मंदा आमटे यांचाही स्वाक्षऱ्या मिळाल्या. पण येथीलच आणखीन एक अनुभव स्मरणीय ठरला.

एकदा जगप्रसिद्ध संगणक निर्मात्या इन्फोसिस या संगणक कंपनीचे सर्वेसर्वा डॉ. नारायण मूर्ती यांच्या स्वाक्षरीसाठी याच हॉल मधील एका कार्यक्रमात झगडत होतो. तरीही थोडा मागोवा घेत असताना कळले कि ते शेजारच्या एका बंदिस्त मिनी हॉलमध्ये पत्रकारांना मुलाखत देत आहेत. मी कसातरी आत शिरलो. व मुलाखत संपताच त्यांना स्वाक्षरीची विनंती केली तर त्यांनी मला ऑफिसकडून अश्या स्वाक्षऱ्या द्यायला परवानगी नाही असे सांगत मला नकार दिला. एवढ्यात एका महिला पत्रकाराने त्यांचा ई मेल आय डी विचारला. तो त्यांनी स्वतःच्या अक्षरात लिहून दिला त्यात एन एम मूर्ती अत इन्फोसिस डॉट कॉम असे त्यांनी लिहून दिले. मी विचार केला स्वाक्षरी म्हणजे त्यांच्या हस्ताक्षरातील त्यांची आठवण व शिवाय त्यांनी त्यांचे स्वतः चे नाव लिहिले होते. तेच मी स्वाक्षरी सारखे जपून ठेऊ शकतो. म्हणून मी सुद्धा माझी वही त्यांच्या समोर धरली व ई मेल आय डी लिहायला सांगितले व आश्चर्य म्हणजे ते त्यांनी काहीही आक्षेप न घेत आढेवेढे न घेत लिहून दिले.

नंतर खाली गाडीची वाट पाहत ते थांबले असताना पुन्हा एकदा त्यांना स्वाक्षरीची विनंती केली. पण पुन्हा त्यांनी तेच कारण सांगितले कि मला ऑफिस कडून अश्या स्वाक्षऱ्या द्यायला परवानगी नाही.त्यामुळे कसेही का होईना त्यांच्या हस्ताक्षरात त्याचे लिहिलेले नाव मिळाले त्यातच खुश होऊन मी घरी परतलो. असा हा आय एम सी हॉल मला कित्येक वेळा माझ्या संग्रहात बहुमोल भर टाकणारा लकी ठरला व त्यामुळे स्मरणातहि राहिला.

*



नारायण मुर्ती

२७. डॉ. मांडके यांची आगळी वेगळी स्वाक्षरी

कधी कधी एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीची स्वाक्षरी मिळाली नाही तर त्यांच्या नुसत्या हस्ताक्षरावर मी समाधान मनात असतो. पुरी चे श्री शंकराचार्य एकदा एअर इंडियाच्या सांताक्रुझ विमानतळावरच्या ऑफिसला भेट द्यायला आले होते.तेव्हा त्यांना विमानतळाची धावपट्टी व विमानांची देखभाल करणारे कारखाने दाखवले जात होते. तेव्हा मी त्यांच्याजवळ जाऊन त्यांना स्वाक्षरीची विनंती केली तर त्यांनी गीतेतला एक श्लोक लिहून दिला. जो मी त्यांची आठवण म्हणून जपून ठेवला आहे.

इन्फोसिसच्या सर्वे सर्वा डॉ. नारायण मूर्तींनी त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून दिलेला ई मेल आयडी मी जपून ठेवला आहे. तर आर्ट ऑफ लिव्हिंगच्या जगप्रसिद्ध श्री श्री रविशंकर यांनी लिहून दिलेला श्री श्री हा आशीर्वाद त्यांची स्वाक्षरी म्हणून जपून ठेवला आहे. पण प्रसिद्ध हृदय शल्य विशारद डॉ. नीतू मांडके यांची आठवण आणखीनच वेगळी आहे.

२००२ च्या ऑगस्टमध्ये मला हृदय विकाराचा झटका आल्याने उपचारासाठी हिंदुजा हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. त्या दरम्यान प्राथमिक चाचण्या झाल्या नंतर बायपास सर्जरी करण्याचा निर्णय झाला. संमती देण्याशिवाय काही पर्यायच नव्हता व एअर इंडिया च्या ओळखीने त्यासाठी तेव्हाचे अग्रक्रमी व प्रख्यात हृदय शल्यविशारद डॉ. नीतू मांडके यांनी करावे असे ठरले. पण ते दुबई हून यायला २-३ दिवस लागणार होते. तरीही त्यांना निरोप पाठवून दोन दिवसात पाचारण करण्यात आले. लगेचच रविवारी सकाळी

ते मला तपासायला आले. त्या आजारात सुद्धा माझ्या विश्वासच बसत नव्हता कि साक्षात डॉ. मांडके मला तपासत आहेत, कारण त्यांची ख्याती मा. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर त्यांनी केलेल्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर खूपच वाढली होती. तेव्हा ते तपासत असताना माझ्या मनात त्याची स्वाक्षरी मिळवण्याचे विचारच होते.

त्यांची तपासणी संपवून त्यांनी ऑपरेशनची तारीख नक्की करायला सांगितली व ते निघणार एवढ्यात त्या बेडवर असताना देखील मी त्यांना थांबवून दोन मिनिटे वेळ द्याल का असे विचारले. त्यांनी घड्याळाकडे पाहत म्हटले नो प्रोब्लेम, गो अहेड. मी त्यांना माझा थोडक्यात परिचय करून दिला व स्वाक्षरीची इच्छा बोलून दाखवली. तर त्यांनी हो म्हणत विचारले, कुठे करू?तेव्हा मी सध्या पेशंट असल्याने माझ्याकडे वही नाही पण लवकरच मागवून घेईन,असे सांगितले. त्यांनी पुन्हा घड्याळाकडे पाहत म्हटले ठीक आहे. अजून २० सेकंद बाकी आहेत. अजून काही विचारायचे आहे का? मी विचार करत होतो कि हे डॉक्टर किती बिझी असतात?१०-२० सेकांदांचाही हिशोब ठेवतात ! आता मला एवढ्या प्रसिद्ध डॉ. ची स्वाक्षरी नक्की मिळणार या आनंदात खरं तर माझे २ दिवसांनी बायपास ऑपरेशन आहे हेही विसरून गेलो होतो. पण त्यांना मात्र मी काहीतरी ऑपरेशनबद्दल विचारावे अशी अपेक्षा असावी.

ठरल्याप्रमाणे बुधवारी माझे ऑपरेशन झाले. त्यानंतर १-२ वेळा मी आयसीयुमध्ये असताना ते मला पाहायला आणि पुढील उपचाराबद्दल मार्गदर्शन करायला येउन गेले पण माझी प्रत्यक्ष भेट झाली नाही. या ऑपरेशनच्या दरम्यान माझ्या डाव्या हातातील एक रक्त वाहिनी काढून वापरल्याने हातावर मोठी जखम होती. ती भरून यायला एक दोन महिने लागले. पण त्या जखमेचा वण हातावर कायम राहील असे सांगितले गेले.

नंतर दोन आठवड्यांनी मी घरी आलो. नंतर दर महिन्यातून एकदा त्यांना दाखवायला फ़ॉलो अपसाठी लीलावती हॉस्पिटलमध्ये जावे लागले. पण त्या वेळी कधीही त्यांची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. कारण त्यांचे सहकारी कनिष्ठ डॉक्टर्सच मला तपासत असत. परिणामी डॉ. मांडक्यांशी माझी पुन्हा कधीही भेट झाली नाही. मी मनाशी म्हटले ठीक आहे, आत ओळख झाली आहेच, कधीतरी स्वाक्षरी मिळेलच या आशेवर होतो.

पण नशिबात काही वेगळेच होते. कारण दुर्दैवाने ५-६ महिन्यातच त्यांना स्वतःलाच हृदय विकाराचा तीव्र झटका आला व त्यातच त्यांचे दुखः द निधन झाले. एवढा मोठा प्रसिद्ध नि निष्णात डॉक्टर ज्याने रोज ३-४ या दराने हजारो लोकांवर बायपास ऑपरेशन केली व त्यांना नवीन जन्म दिला तोच स्वतः आपल्या स्वतःला त्याच दुखण्यावर इलाज करू शकला नाही. काय हा दैव दुर्विलास? याची मला खूप हळहळ वाटलीच पण त्याच बरोबर मी त्यांचा डायरेक्ट पेशंट असूनही अखेर त्यांच्या स्वाक्षरीला कायमचा मुकलो याचेही खूप दुखः झाले. त्यामुळे आजकालबायपासच्यावेळी माझ्या डाव्या हातावरील रक्तवाहिनी काढल्याने हातावर राहिलेला आठ इंचाच्या जखमेचा वण पाहून लोक विचारतात हे काय आहे. तर वरील कथा सांगून मी तो वणच जणू डॉ. मांडक्यांची स्वाक्षरी आहे असे सांगतो व अशी ही एक आगळी वेगळी स्वाक्षरी दाखवत मिरवत असतो.

*

२८.
भारत रत्न डॉ. पां.वा. काणे.

१९६७ च्या सुमारास माझ्या गुरूंनी भारतरत्न व थोर तत्ववेत्ते डॉ. पां. वा. काणे यांची स्वाक्षरी मी मिळवावी असे सुचवले. त्यांच्याविषयी थोडी माहिती जमा केली नि आणखीन एका महत्वाच्या नि भारत रत्न असलेल्या मान्यवरांची स्वाक्षरी मिळवावे मी मनाशी पक्के केले. मग एके दिवशी दुपारी मी आणि माझा लहान भाऊ अविनाश असे आम्ही दोघे डॉ. काणे यांच्या गिरगावातील २/३ मजल्यावरील घरी पोहोचलो. आज एका भारतरत्न महानुभावाच्या स्वाक्षरीची आमच्या संग्रहात भर पडेल. या कल्पनेत असतानाच आतून धोतर कुडता नेसलेले व कल्पनेतल्या तत्ववेत्या सारखेच जाड चष्मा लावलेले म्हातारे गृहस्थ समोर आले आणि त्यांना वाकून नमस्कार केला नि आमचे मिशन सांगितले. आम्ही केवळ त्यांच्या स्वाक्षरीसाठी शिवाजी पार्क हून आलो आहोत हे कळल्यावर आम्हाला प्रथम बसायला सांगितले. आम्हाला वाटले ते स्वाक्षरी आता देतील. मग देतील.

पण ते जमिनीवर बसून छोट्या डेस्क वरील लिखाण भिंगातून वाचत वाचत आमच्याशी बोलत राहिले. हे बघा, मला खूप कामे आहेत. प्रुफ तपासायचे आहेत. आजारी पत्नीला औषध पाणी द्यायचे आहे. यावर मी म्हणालो, आम्हाला फक्त आपली स्वाक्षरी हवी आहे. आपली कामे संपेपर्यंत आमची थांबायची तयारी आहे. तर ते म्हणाले, स्वाक्षऱ्या जमवणे हा परदेशी छंद आहे. वयाने वेळेचा अपव्यय होतो असे माझे मत आहे. या छंदाला मी प्रोत्साहन देत नाही. त्यामुळे मी स्वाक्षरी देणार नाही. तेव्हा तुम्ही निघालात तर बरे. आम्ही दोघांनी त्यांना पुन्हा पुन्हा विनंती केली कि त्यांची स्वाक्षरी आमच्या संग्रहासाठी अमुल्य आहे. पण ते मानायलाच तयार होईनात. शेवटी खिन्न मनाने त्यांची प्रत्यक्ष भेट होऊनही स्वाक्षरी न मिळवताच आम्ही घरी परतलो.

पण या छंदातून शिकलेल्या नि जोपासलेल्या काही गोष्टींपैकी एक म्हणजे चिकाटी. त्यामुळे आम्ही धीर सोडला नाही. त्यांच्या घरच्या पत्त्यावर त्यांना एक पत्र लिहून पुन्हा स्वाक्षरीची विनंती केली व सोबत परतीचे पोस्टाचे तिकिटाची जोडले होते. ८-१० दिवसांनी टपालामध्ये एक पाकिट मिळाले. ते पाहिले तर आत एक वृद्ध माणसाचे हस्ताक्षर होते. ते डॉ. काणे यांचे होते व त्यात पुन्हा तीच कारणे देत व हा परदेशी छंद असल्याने मी त्याला प्रोत्साहन देत नाही म्हणून स्वाक्षरी पाठवत नाही राग नसावा. व पत्रा खाली शेवटी आपला पां.व.काणे अशी स्वाक्षरी केलेली होती, ते वाचून घरी सर्वांनाच व गुरूंनाही हसू आवरले नाही. वडील म्हणाले,कसे हट्टी तत्वनिष्ट असतात हे मोठे लोक. पण स्वाक्षरी देत नाही म्हणत स्वाक्षरी दिलीच. या प्रसंगामुळे त्यांच्या पत्राला माझ्या संग्रहात एक विशेष स्थान आहे. असाही एक अनुभव !!!

स्वाक्षऱ्या नि संदेश

मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या घेताना त्यांच्या कडून काही संदेश लिहून घेण्याचीहि पद्धत आहे. बरेच खेळाडू व अभिनेते रीगार्डस, विनम्र विथ लव्ह लिहितात,तर लेखक वा कवी काही तरी ओळी लिहून देतात. सर्वात पहिल्यांदा कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांनी हिंदू म्हणून जगा, हिंदू म्हणूनच मरा व धर्माचे पालन करा असे संदेश दिले. तर प्रसिद्ध अभिनेत्री वैजयंती मला व स्वामी चिन्मयानंद यांनी स्वाक्षरीच्या आधी ओम लिहिले होते. तर विनोदी अभिनेते दामू अण्णा मालवणकर यांनी कष्ट करा असे लिहून दिले. १९७० च्या दशकात महाराष्ट्रात अत्यंत प्रसिद्ध झालेले कवी त्रिकूट मंगेश पाडगावकर, विं.दा.करंदीकर व वसंत बापट यांच्या काव्य वाचनाच्या कार्यक्रमानंतर एकदा त्यांच्या स्वाक्षऱ्या घेताना पाडगावकरांनी लिहिले, जगा जगवा. फुला फुलवा करंदीकरांनी लिहिले ती जनता अमर आहे. तर बापटांनी लिहिले एकच आहे मानव्याचा सिंधू!

या उलट जादुगार पी सी सरकार यांनी त्यांच्या स्वाक्षरी सोबत त्यांचे स्वतः चे रेखाचित्र काढून दिले, तर भारतीय हवाई सेवेचे जनक भारत रत्न जे.आर.डी टाटा यांनी अतिशय विनम्रतेने सिन्सियरलि असे लिहून आपल मौल्यवान स्वाक्षरी दिली. या उलट व्यंगचित्रकरांचे वेगळे अनुभव आले. जग प्रसिद्ध व्यंग चित्रकार आर.के लक्ष्मण यांनी त्यांचे प्रसिद्ध पण त्रस्त कॉमन मॅन चे व्यंग चित्र काढले. टाईम्स मधूनच प्रसिद्ध झालेले दुसरे व्यंग चित्रकार मरिओ मिरांडा यांना त्यांच्या ऑफिसमध्ये भेटलो तर स्वाक्षरी देताना त्यांनी त्यांचे स्वतःचे रेखाचित्र काढून दिले. श्याम जोशी यांनी मला माझे व्यंगचित्र काढून दिले तर मोहिनी प्रसिद्ध शि.द.फडणीसांनी एका कप बसचे चित्र काढले. त्यातील कपाचा कान खेचणारा एक हात दाखवला नि त्यामुळे त्रास झालेला रडणारा कप रेखाटला. प्रसिद्ध विनोदी लेखक वि.आ.बुवा यांनी तुम्हीही स्वाक्षरी देण्या एवढे मोठे व्हा. असा (मौल्यवान) संदेश दिला.

नागपूरला गेलो असताना मेव्हण्याना माझ्या या संग्रहाची माहिती कळल्यावर त्यांनी मला त्यांचे वर्ग मित्र व मराठीतील एक महान कवी सुरेश भट यांचे घरी नेले. ते पलंगावर पडून काही वाचन करत होते. त्या निजलेल्या स्थितीत त्यांनी स्वाक्षरी व फोटोसाठी पोझ दिली व संदेश देण्याची विनंती केल्यावर मग उठून टेबलाजवळ गेले. स्वतः चे एक लेटर हेड काढले, त्यावर कवितेच्या चार ओळी स्वतः च्या अक्षरात लिहून दिल्या व सोबत स्वतःचे व्हिजिटिंग कार्ड त्या कागदाला जोडून दिले व मला विचारले, आता खुश आहेस का? मी त्यांना खाली वाकून नमस्कार केला व मनात म्हटले आज एका महान कवींना प्रत्यक्ष भेटता आले !! समाधान वाटले.

असे निरनिराळे संदेशांचे अनुभव मला या संग्रहाच्या निमित्ताने आले. या मिळालेल्या संदेशांपैकी एक आणि विंदानी कवितेतून दिलेला एक संदेश मी सिरियस घेण्याचा अतोनात प्रयत्न करत असतो. वि आ. बुवानि सांगितल्याप्रमाणे स्वाक्षरी देण्या इतका मोठा होण्याचा नि नंतर विंदानी कवितेतून सांगितल्याप्रमाणे घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घेण्याचा !! पण ते दोन्ही संदेश या जन्मी अंगी उतरवता येतील असे वाटत नाही.

*

२९.
भारतीय क्रिकेट महर्षी प्रो. डी.बी,देवधर

पुण्याच्या मुक्कामात एकदा ९८ वर्ष वयाचे भारतीय क्रिकेट महर्षी प्रो. दि.बा उर्फ डी.बी. देवधर जे भारतीय क्रिकेट मधील उध्वर्यू मानले जातात ते डेक्कन जिमखाना भागात राहतात व त्यांचा पत्ता असा आहे. हे कळल्यावर तो पत्ता, वही, पेन व कॅमेरा घेऊन मी एका सकाळी डेक्कन जिमखान्यावर पोहोचलो. प्रो, डी.बी.देवधर रोड शोधला नि मग त्यांच्या बंगल्याजवळ पोहोचलो.

सकाळचे ९ वाजत आले होते,मी त्यांच्या बंगल्यात शिरलो तर बाहेर एका बारावी शिकत असलेल्या मुलाने माझे स्वागत केले. मी देवधर सरांविषयी विचारताच तो म्हणाला. ते काय समोरच पेपर वाचत बसले आहेत. मी त्याला माझे नाव सांगून मुंबई हून त्यांच्या स्वाक्षरीसाठी आलो आहे तर त्यांची परवानगी विचारयला पाठवले.

त्यांनी हो म्हणताच मी मंदिरात जावे तसे बूट काढून आत गेलो. तेथे अगदी पुणेरी पद्धतीत आराम खुर्चीत बसून पेपर वाचत होते. माझा विश्वास बसत नव्हता कि ज्यांनी भारतीय क्रिकेटच्या अगदी सुरुवातीच्या काळात चौरंगी व पंचरंगी सामन्यात परदेशीयांविरुद्ध खेळून नुसतेच विक्रम केले नव्हते तर पुढे ज्यावर हजारे नायडू मंकडपासून आजच्या सुनील कपिल, व सचिन सारख्या नवीन खेळाडूंच्या खेळाचे मनोरे रचले गेले असा भक्कम पाया रचला होता, ते क्रिकेट महर्षी समोर बसले होते. मी आत येऊ का असे विचारत आत गेलो व त्यांना खाली वाकून नमस्कार केला व माझा थोडक्यात परिचय करून देत माझे मिशन सांगितले. मी शिवाजी पार्क भागात राहतो मुंबईहून आपल्या स्वाक्षरीसाठी

आलो आहे. हे सांगितल्यावर ते अधिकच आनंदाने स्वाक्षरीसाठी तयार झाले व त्यांनी स्वाक्षरीहि दिली. मी त्या बाहेर बसलेल्या मुलाला बोलावून त्यांच्या बरोबरच्या फोटोची परवानगी मागितली तर ते म्हणाले, डोळ्यांना फ़्लॅशचा त्रास होतो म्हणून फोटो नको.

त्यांनी फोटोला नकार दिला पण एवढ्या महान व्यक्ती समोर उभा आहे पण त्याच्या बरोबर फोटो काढता येत नाहीये याची मला चुटपूट लागली. पण इलाज नव्हता. मी कॅमेरा ब्यागेत ठेवला. त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्यांनीही मोठ्या आवाजात पण थरथरत उत्तरे दिली. मी त्यांचे आभार मनात पुन्हा नमस्कार करून त्यांचा निरोप घेतला नि बाहेर आलो. तर दाराप-

शीच त्या मुलाला पाहिले. मग मला सुचले कि माझे नाव पत्ता त्याला देऊन त्यांचा स्वाक्षरी केलेला फोटो त्याला मला पाठवायला सांगावे. ते त्याने मान्य केल्यावर त्याला माझे नाव व पत्ता लिहून दिला आणि देवधर सरांची प्रत्यक्ष भेट घेऊन किमान त्याचं स्वाक्षरी तरी मिळाली या आनंदात परत आलो.

मुंबईला परतल्यावर काही दिवस पोस्टमनची वाट पहिली नि मग आशा सोडली. पण १५-२० दिवसांनी एके दिवशी एक पोस्टमन दाराशी आला नि त्याने सांगितले, तुमच्यासाठी एक पत्र आहे, पण १० रु. दंड भरावा लागेल. मी पत्र देवधर सरांकडून आले हे पाहिल्यावर दंडाचे कारण न विचारता आधी रु.१० भरले नि खूप उत्सुकतेने ते पाकीट उघडून पहिले तर आत सरांचा चक्क फलंदाजी करण्याच्या पवित्र्यातला पण ७५-८० वय असलेला कृष्ण धवल पण सुंदर फोटो होता व त्यावर मुख्य म्हणजे त्यावर त्यांनी स्वाक्षरी केलेली होती. त्यांच्याबरोबरचा फोटो चुकल्याने हिरमुसलेला होतो. पण त्या फोटोने खुष झालो.

दुपारी पुन्हा ते पाकीट निरखून पाहत होतो कि दंड का भरावा लागला तर त्याव a Not Paid असा शिक्का होता. पण मला त्यावर ४-५ तिकिटे चिकटवलेली दिसली म्हणून मी आणखी निरखून पहिले तेव्हा लक्षात आले कि त्यांच्या बंगल्या बाहेरच्या त्या मुलाने पाकिटावर रु.५ च्या पोस्टाच्या तिकीटा ऐवजी भारत सरकारचेच पण १-१ रुपयांचे ५ Revenue Stamps लावले होते, जे टपाल सेवेला चालत नाहीत. मी डोक्यावर चक्क हात मारला. मला दहा रुपयांचे काही वाटले नाही पण आयुष्याच्या खेळ पट्टीवर जीवनाचे शतक पूर्ण करण्याऱ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या एवढ्या एकमेव महान व्यक्तीचा पत्रव्यवहार जर हा मुलगा असा सांभाळत असेल तर कसे होत असेल? त्या बारावी शिकणाऱ्या मुलाला पोस्टाच्या नि रेव्हेन्यू तिकीटातील फरक माहित नसावा याचे आश्चर्य वाटले.

✻

३०.
सुनील गावस्करचे पत्र.

पूर्वी कॉलेजमध्ये असताना क्रिकेटच्या प्रेमापायी ब्रिटीश कौन्सिल लायब्ररीतून क्रिकेटवरील पुस्तके वाचायला मिळवत असे, त्याच ओघात एकदा सर डॉन ब्रॅडमन यांच्याबद्दल एक घटना वाचनात आली. त्यांच्या तडफदार खेळामुळे ते ऑस्ट्रेलियातच नाही तर क्रिकेट जगतात खूप प्रसिद्ध होते. एकदा ऑस्ट्रेलीयन संघ इंग्लंडमध्ये असताना एका क्रिकेट प्रेमीने त्यांना एक पत्र लिहिले ज्यावर नाव ऐवजी त्यांचा फोटो चिकटवला होता. व खाली पत्त्या ऐ-वजी लिहिले होते Playing somewhere in England आणि तरीही ते पत्र त्यांच्यापर्यंत पोहोचले होते. या मुळे साध्या पोस्टमननेही त्यांना ओळखावे अशी ब्रॅडमनची ख्याती याबद्दल ही घटना बरेच काही सांगून गेली.

विशेषतः भारताच्या लिटल मास्टर सुनील गावस्करला त्याच्या अत्युच्च यशाच्या दिवसात भारतातील चिल्ली पिल्ली सुद्धा ओळखत असतील असा माझा एक समज होता. गावस्करने ब्रॅडमनचा ३२ कसोटी शतकांचा विक्रम ज्या सामन्यात मोडला तो सामना दिल्लीत चालू होता. म्हणजे भारतात, (इतर देशात नाही) राजधानी दिल्लीमध्ये व पाकिस्तान विरुद्ध चालू होता. त्यामुळे सर डॉनचा विक्रम मोडला त्याच दिवशी त्याचे कौतुक भारतातील प्रत्येक भाषेतील वर्तमान पत्रात अगदी पहिल्या पानावर गावस्करच्या फोटोसह सर्वत्र छापून आले होते. इंग्रजी पेपर्स मधून तर Dawn of the Sunny Era (सनी युगाचा प्रारंभ) अशा शब्दात त्याचे कौतुक केले होते व त्यांच्यावर बक्षिसांचा वर्षाव होत होता. इतक्या महत्वाच्या प्रसिद्धीच्या योग्य असा हा सन्मान होता.

याच पार्श्वभूमीवर मी दुसरेच दिवशी गावस्करला अभिनंदनाचे पत्र लिहिले व ब्रॅडमन सारखेच नाव न लिहिता त्या पाकिटावर गावस्करचा फोटो चिकटवून Playing somewhere in Delhi. (नुसते भारत असेसुद्धा नाही) असे लिहून पुरेसे टपाल लाऊन पेटीत टाकले. तेव्हा आपले टपाल खाते आजच्यापेक्षा १० टक्के तरी तत्पर होते असा माझा समज होता. पण तरीही खात्री देता येत नव्हती. आणि माझी शंका रास्त ठरली. कारण १०-१२ दिवसांनी पोस्टमन रु. १० च्या दंडाची मागणी करत घरी आला. व त्याने मीच पाठवलेले गावस्करच्या फोटोचे पत्र दाखवले. मी ते ताब्यात घेतल्यावर पाहिले तर त्यावर लाल शाईत शेरा मारलेला होता. letter not delivered due insufficient address. मला भारतीय टपाल खात्याची कींव करावीशी वाटली.

पुढे त्याहून मोठा कहर होता. मित्राच्या सांगण्यावरून टपाल खात्याचा खरपूस समाचार घेतला जावा म्हणून ते पत्र मी एका इंग्रजी वर्तमान पत्राच्या ऑफिसमध्ये नेउन दिले तर ते तेथील वार्ताहराने गहाळ केले. एक तर टपाल खात्याचा बेजबाबदार कारभार नि वर वर्तमान पत्राच्या ऑफिस मधील बेफिकीरी व बेपर्वाई काय म्हणावे याला?

*





३१.
वाजपेयींची भेट - एक देवदर्शन

एअर इंडियातील नोकरीमुळे मिळालेल्या फ्री तिकिटावर मी एकदा लंडनला जात होतो. विमान दिल्लीमार्गे जाणार होते. दिल्लीला पोहोचल्यावर सुरक्षा रक्षकांची व एअर इंडियातील अधिकारी लोकांची धावपळ मी पाहिली. म्हणून विचारले तर कळले की माजी पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी याच विमानाने पहिल्या वर्गाने लंडनला जात आहेत. हे कळल्यावर त्यांची स्वाक्षरी व त्यांच्याबरोबर फोटो कसा मिळेल याची गणिते माझ्या मनात सुरु झाली.

दिल्लीहून विमानाने उड्डाण केल्यावर मी विमानातील उड्डाणसेवेतील प्रमुख कर्माचार्यानकडून श्री. वाजपेयी विमानातात आहेत याची खात्री करून घेतली. दिल्ली लंडन प्रवास ८-९ तासांचा असल्याने मी थोडा श्वास घेतला. विमान ३३००० फुटावर पोहोचल्यावर कुर्सीकी पेटी छोड सकते है अशी सूचना मिळाल्यावर माझी चुळबूळ सुरु झाली. उड्डाणसेवेतील प्रमुख कर्मचारी कामात गुंतला होता तरीही त्याला माझे कार्ड व माझ्या स्वाक्षरी संग्रहाचे माहिती पत्रक देउन ते कृपया श्री वाजपेयीकडे पोहोचवण्याची विनंती केली. त्यानेसुद्धा ते मान्य केले. व जेवण झाल्यावर मला भेटता येईल असा निरोपही त्याने मला सांगितला. मग सर्व प्रवाशांना प्रथम सकाळची न्याहारी दिली गेली. पण माझे लक्ष वरच्या मजल्यावरील पहिल्या वर्गाच्या दिशेला लागलेले होते. न्याहारी संपल्यावर २ तासांनी जेवण दिले गेले. पण माझा घास तिकडे वर पहिल्या

वर्गात अडकलेला होता. जेवण संपल्यावर मी त्या प्रमुख कर्मचाऱ्याला आठवण केली. तो वर जावून परवानगी घेऊन आला व मला वर पहिल्या वर्गाकडे घेउन गेला.मी जय्यत तयारीनिशी म्हणजे
स्वाक्षरीची वही, पेन व कॅमेरा घेवून निघलो होतो खरा, पण सुरक्षा कारणासाठी फोटो काढू नका असे त्याने बजावले होते. मी दारात उभा राहून आत पाहत होतो, तर १६ प्रवाश्यांच्या त्या सबंध कक्षेत ते एकटेच होते. पांढरा झब्बा तपकिरी जाकीट व धोतर नेसलेले ते त्यांचें रूप फोटोत परिचित होते पण त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यावर देवदर्शन झाल्यासारखे वाटले, विश्वास बसेना. मी स्वतःला चिमटा काढून हे स्वप्न नसल्याची खात्री करून घेतली.मी त्यांच्या पासून ६ फुटांवर होतो पण माझे हातपाय थरथरत होते. ते खरे तर पुस्तक वाचण्यात गर्क होते पण माझी चाहूल लागताच मला आईये म्हणाले. मी आत जाउन प्रथम त्यांना वाकून नमस्कार केला.मग थोड्क्यात माझा परिचय करून दिला व भेटण्याचे (मिशन ऑटोग्राफ) कारण सांगितले.

आप क्या करते हो असे विचारल्यावर मै एअर इंडियामे नौकरी करता हू असे सांगितले. मुंबई में कहा रहते हो विचारल्यावर शिवाजी पार्क के नजीक रहता हूं और शिवाजी उद्यान सायं शाखा का स्वयंसेवक हूं. असे सांगितले. हे ऐकल्यावर त्यांनी विचारले शिवाजी उद्यान के नजीक याने हमारी बकवास सुनते हो? त्यावर मी म्हटले वह बकवास नही होती, हम तो आपको सुननेके लिये तरसते है. यावर त्यांनी मिश्कील हास्य करत मै आपकी क्या मदत कर सकता हू असे विचारल्यावर तर मला शरमिंदल्यासारखे वाटले.देशा-चे पंतप्रधान एका छोटया नागरिकाला असे विचारत होते, काय ही नम्रता? मी माझ्या स्वाक्षरी संग्रहाची माहिती सांगितली व त्यात नेताजी सुभाषचन्द्र बोस,लाल बहाद्दूर शास्त्री, स्वा. सावरकर,जे आर डी टाटा यांचा उल्लेख केला व स्वाक्षरी देण्याची विनंती केली.व त्यांनी देखील स्वखुशीने माझ्या वहीत स्वाक्षरी केली.मी धन्यवाद म्हणत नि पुन्हा त्यांना वाकून नमस्कार करून तेथून बाहेर पडलो.खाली येवून माझ्या जागेवर बसलो तर माझा आनंद गगनात मावेना.त्यांच्या बरोबर फोटो मिळाला नाही याचे दुःख झालेच पण देवव्रत वाजपेयींची स्वाक्षरी स्वतः प्रत्यक्ष भेटून घेवू शकलो याचे समाधान वाटत होते.माझ्या संग्रहाला त्याक्षणी वाजपेयींच्या स्वाक्षरीने सुवर्णस्पर्श झाल्याचा आनंद झाला आमचे विमान जरी ३३००० फुटांवर होते तरी मी आनंदाच्या अत्युच्च शिखरावर असल्याचा सुखद अनुभव घेत होतो.

*

३१. डॉक्टर नेल्सन मंडेला – एक अयशस्वी मोहीम !

सेवानिवृत्ती नंतर लगेचच एप्रिल २००१ मध्ये मी दुबईला गेलो होतो.तेथे माझ्या स्वाक्षरी संग्रहावर आधारित मीच तयार केलेले Slide and Talk shows करण्याचा मानस होता.. त्याप्रमाणे एका दिवशी भारतीय दूतावासाच्या एक शाळेमध्ये ८वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या फावल्या वेळात सकाळी ११ ते दु.५पर्यंत एकामागोमाग एक असे ५-६ प्रयोग केले. नंतर दुबई, शारजाह आणि अबुधाबी या तीनही ठिकाणी महाराष्ट्र मित्रमंडळातर्फे प्रयोग झाले .. आणि मुंबईला परतण्याच्या दोन दिवस आधी, एका दुपारी पेपर मध्ये दुबईच्या अमेरिकन युनिव्हरसिटीमध्ये विद्यार्थ्यांना संबोधीत करायला जगप्रसिद्ध शांतीदूत दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष नोबेल विजेते डॉ. नेल्सन मंडेला येणार असल्याचे वाचले. माझां भाऊ संध्याकाळी कामावरून घरी परत आल्यावर त्याला ती बातमी वाचायाला दिली. त्याने लगेच कपडे करून जाण्याची तयारी केली... (कारण त्यालाही स्वाक्ष-या जमवण्याचा छंद आहे.) आणि अर्ध्या तासात दुबईच्या अमेरिकन युनिव्हरसिटीतील त्या कार्याक्रमाच्या स्थळी पोहोचलो.

मुख्य सभागृहाच्या बिल्डींग पासून २०० मी. अंतरावर शेकडो गाड्या पार्क केलेल्या होत्या..तेथे एका रिकाम्या जागी गाडी पार्क करून, जरा नेकटाय लावून आम्ही मुख्य सभागुहाच्या दिशेने जाऊ लागलो.

मुख्य कार्यक्रम सुरु झाला होता.एक दरवाज्याने आत डोकावून पहिले तर तीनमजली सभागृह शाही मान्यवर आणि आमंत्रित विद्यार्थ्यांनी तुडुंब भरलेले होते त्यामुळे आत जाणे शक्य नव्हते.राष्ट्राध्यक्षाला साजेशी कडक सुरक्षा व्यवस्था पाहिल्यावर भारतातील नेहमीच्या युक्त्या वापरून रंगमंच्याच्या जवळ पोहोचता येईल असे न वाटल्याने नाराज झालो होतो व इतर एखाद्या नवीन कल्पनेच्या शोधात होतो. त्यावेळी cctv च्या सहाय्याने शेजारच्या सभागृहात पडद्यावर ते भाषण थेट दाखवले जात होते, त्यावरून मंडेला इकडे किती प्रसिद्ध होते ते दिसत होते. ते दुसरे सभागृहही तसेच तीनमजली होते व खचाखच भरलेले होते शिवाय जागोजागी शाही पोलिसांची नजर होती. त्यामुळे पहिल्या बिल्डींगच्या स्टेजच्या मागे जायाला संधीच दिसत नव्हती एवढ्यात मागील बाजूस एक दार दिसले,ते ढकलल्यावर तेथे एक जिना दिसला. तेथे कोणी पोलीस दिसले नाहीत म्हणून तो उतरून हळूहळू खाली खाली आलो तर भाषणाचा स्पष्ट येऊ लागला. त्यावरून अंदाज केला कि आपण स्टेज जवळ पोहोचत आहोत .एकदम एक दार उघडले गेले तर तेथून मुख्य भव्य स्टेज दिसले आणि ३०-४० फुटांवर साक्षात डॉ. मंडेलांचे व्याख्यांन देत असतानाचे दर्शन घडले. मी एकदम आनदीत झालो. म्हटले आता आपल्याला भाषणानंतर स्वाक्षरी मिळू शकते कारण तेथे दुसरे कोणीच नव्हते.

एवढ्यात त्या दारातून एक अरबी पोलीस बाहेर आला नि त्याने आम्हाला गोंधळलेले पाहिले व चौकशी सुरु केली. आम्ही तेथे कसे पोहोचलो ते विचारले, माझ्या हातातील कॅमरा घेउन ३-४ वेळा क्लिक केले व तो धोकादायक नसल्याचे नक्की केले . मग दुस-या पोलीसाला बोलावून हे बेकायदेशीररित्या येथे आले आहेत त्यांना बाहेर घेउन जा असे सांगितले.. मग मला पुढील चित्र दिसू लागले. त्याने जवळजवळ खेचतच आम्हाला ३ मजले चढवून त्या सभागृहाबाहेर आणले ,..आमच्या कडील माझा पासपोर्ट व भावाचे वर्क परमीट व इतर कागदपत्रे ताब्यात घेतली नि बाहेर हाकलले. त्या माथेफिरू माणसाशी हुज्जत घालण्यात काही अर्थ नव्हता पण ते पेपर्स मिळवणे आवश्यक असल्याने ते कधी व कुठून घेऊन जावू ते विचारत होतो तर ते ही त्याने सांगितले नाही; फक्त आमच्या गाडीजवळ सोडले नि जा सांगून निघून गेला.

आता काय काय होईल याचा विचार करत होतो कारण मी पामर परदेशी प्रवासी आणि भांऊ तेथे २५ वर्षे नोकरी करत होता. परदेशी राष्ट्रपतीच्या सरकारी कार्यक्रमात परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे तेथे पोहोचल्यामुळे भावाची २५ वर्षांची नोकरी जावून त्याचा नोकरीचा परवांना तर रद्द होईलच, शिवाय त्याला गाशा गुडाळून २४ तासात भारतात परतावे लागेल यापासून कितीही दिवस तेथे तुरुंगात सडावे लागेल येथपर्यंतची भिती वाटू लागली कारण परदेशी राष्ट्रपतीच्या कार्यक्रमात परवानगीशिवाय जाण्याचा गम्भीर गुन्हा आमच्याकडून झाला होता.शिवाय तो कार्यक्रम इतका महत्वाचा होता कि शारजाचा शेख स्वत: या कार्यक्रमाचा यजमान होता नी बंदोबस्तासाठी त्याचे खास झेड डिग्री सुरक्षा पोलीस पथक कामावर होते.
घरी आल्यावर भावाने झाली घटना बायकोला सांगितली तर ती ६ वर्षाच्या मुलीनंतर ६ महिन्यांची गर्भार बाई तर हातपाय गळून सुन्न झाली.. काय करावे ते सुचेना..मला सुद्धा विना पासपोर्ट कसे नि कुठे जावे लागेल कळत नव्हते..सर्वात भीतीदायक म्हणजे तुरुंगात किती दिवस नि कुठे जावे लागेल काही उमजत नव्हते..डोके भीतीने सुन्न झाले होते.. रात्रभरात कोणालाही फोन केला नाही कि कोणाचा फोन घेतला नाही. सगळी रात्र आम्ही जवळजवळ जागूनच घालवली..

सकाळी सगळे आवरून आंम्ही पुन्हा ३० किमी वरील अमेरिकन युनिव्हरसिटीमध्ये पोहोचलो, कालच्या कार्यक्रमाला कोणते खास सुरक्षा पोलीस होते, त्यांचे ऑफिस कुठे आहे ते विचारले तर ते उलट दिशेला ४० किमी वरील वाळवंटात कोठेतरी आहे असे कळले, एक तास फिरून ते शोधून काढले.मग गेटवर माहिती काढत योग्य अधिका-याच्या ऑफिसची माहिती मिळवत होतो..मग आम्ही पेपर्स न्यायला आले असल्याचे आत कळवले तर गेट वरून चार पोलीसांनी जीपने भावाला आतमध्ये कुठेतरी नेले. मी वाट पहात रणरणीत वाळवंटात ३५-३७ सेल्सियस च्या रखरखीत उन्हात तसाच पाण्याशिवाय गेटवर थांबलो. वेळ काही कळेना   त्यामुळे त्याला डायरेक्ट तुरुंगात तर नेले नाही ना, माझे कसे होणार, मी कुठे आहे, घराचा पत्ता काय, तेथे जायचे कसे, काहीच माहीत नव्हते नि कळत नव्हते..मग ४० ४५ मिनिटांनी एक जीप आली व त्यांनी मलादेखील जीपमधून खूप आत नेले,आजूबाजूला फक्त गणवेशातले बंदूकधारी पो-

लीस, आर्मी च्या जीप्सची ये-जा नि ठीक ठिकाणी तंबूतून पोलिसांचे काम चालले, असेच वातावरण सर्वत्र दिसत होते. शिवाय घसा कोरडा पडून घामही येत होता..दीड दोन किमी गेल्यावर एका तंबूवजा ऑफिस मध्ये मला नेले तर आतमध्ये दोन पडद्यापलीकडे एक केबिन वजा जागेवर भावाला बाकावर बसलेला पहिला आणि थोडेसे हायसे वाटले. मग माझी अरबी मिश्रित मोडक्या तोडक्या इंग्रजीत उलटतपासणी झाली. केलेला गुन्हा फार गंभीर आहे व त्याची शिक्षा काहीही होऊ शकेल असे तो अधिकारी सांगत होता. कदाचित कशाला(मारायला) तेथे गेलात? असेच सारखे विचारत असावा. त्या खाकी भेजावाल्या माणसाला स्वाक्षरी म्हणजे काय, ती कशाला नि का घेतात, त्याचा संग्रह कशाला करायचा हे कितीही सांगतले तरी त्याच्या डोक्यात शिरणे कठीण होते..मग सुचले, कि याला पेपर दाखवावा, ज्या गल्फ टाईम्समध्ये त्याच दिवशी माझी माहिती नी मदर तेरेसा बरोबरचा फोटो छापून आला होता..तो त्याला दाखवला तरी त्याला कळेना ..शेवटी आम्ही भारतीय आहोत , आम्ही चुकलो, पुन्हा असे करणार नाही असे त्याला ४-४ वेळा अगदी विनवून सांगत होतो,(कारण पायाही पडलो असतो- अडला नारायण सारखे- पण ते त्या बिनडोक्याला कळले नसते.) मग एका हिंदी कळणा-या पोलिसाने काही तरी समजल्यावर आम्ही अतिरेकी नाही, आमच्याकडून (त्यांना व त्यांच्या आखाताला) काहीही धोका नाही हे त्या अधिका-याला समजावून सांगितले, तेव्हा त्याने आम्हाला सक्त ताकीद देत आमचे पेपर्स परत केले व पुन्हा जीप ने बाहेरच्या गेटबाहेर आणून सोडले..तेव्हा कुठे आम्ही एक सुटकेचा श्वास सोडला, मला तर तुरुंगातून बाहेर आल्यासारखे वाटत होते. दोघांना मिठी मारली, भावाने त्याच्या बायकोला आमची सहीसलामात सुटका झाल्याचे कळवले व तिची काळजी दूर केली. परत येताना थोड्या अंतरावर त्या निर्मनुष्य वाळवंटात एका झोपडीवजा दुकानात थंड कोकाकोला मिळाले, दोघांनी दोन दोन कोक ढोसले व घसा ओला केला आणी थोड्याशा आनंदात, पुन्हा आयुष्यात कोणाचीही स्वाक्षरी घ्यायची नाही आणि अशा माथेफिरू अरब देशात तर कधीच नाही अशी शपथ घेवून घरी सुखरूप परत आलो. भावाच्या बायकोने तर आम्ही खूप मोठ्ठी लढाई जिंकून परत आलो असे (फक्त आरती ओवाळायाचे बाकी ठेवून) आमचे स्वागत केले. नंतर खूप हायसे वाटले तरी पण आदल्या दिवशीची काळरात्र मी जन्मात विसरणार नाही !

जीवावरचे शेपटीवर बेतले.. तेही माझ्याबाबतीत दुस-यांदा, एकदा श्रीलंकेत आणि आज येथे दुबईच्या वाळवंटात ! त्यामुळे क्षणभर हा उद्योग सोडून द्यावा असे वाटले पण क्षणभरच!

दोनच दिवसांनी भारतात परतलो. मी मंडेलांना व्यक्तीश: भेटू शकलो नाही याचे वाईट वाटत होते पण माझी त्यांची स्वाक्षरी मिळवण्याची जिद्द तसूभरही कमी न होता उलट आणखी जोमाने उफाळून आली. आणि पुढे त्याना पत्र पाठवून त्यांची स्वाक्षरी पोस्टाने का होईना पण मिळवलीच..दुबईमधील वाळवंट आठवले नि नंतर मी मिळवलेल्या स्वाक्षरीकडे पाहून वाटते, प्रयत्ने वाळूचे कण रगडीता..........

*

बिल आणि हिलरी क्लिंटन

अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिमी कार्टर

जॉन मेजर



बर्माचे माऊंटबॅटन यांची स्वाक्षरी



मार्गरिट थॅचर

मिसेस अकिनो



जॅक शिराक

लेक वालेचा



पी. सी. बर्नाड



के. आर. नारायणन



राजेंद्र प्रसाद



नेल्सन मंडेला



व्ही. के. कृष्णमेनन



पंडित जवाहरलाल नेहरू



▲ एडवर्ड हिथ

▲ ॲडॉल्फ हिटलर

▲ मुजीबूर रेहमान



▲ दिनदयाळ उपाध्याय



▲ एम. सी. छागला



▲ विजयालक्ष्मी पंडित

▲ हॅरॉल्ड मॅकमिलन

▲ लिंडन बी. जॉन्सन

▲ लेखक विजयालक्ष्मी पंडित आणि माजी मुख्य न्यायाधीश एम.सी. छागला यांच्यासमेवत

रॉबर्ट मुगाबे



यशवंतराव चव्हाण

लता मंगेशकर



पीटर उस्तीनोव्ह यांची स्वाक्षरी घेताना लेखक



बिमल रॉय



पीटर उस्तीनोव्ह

अन्वर सदात



लालचंद हिराचंद



नासेर (इजिप्तचे माजी अध्यक्ष)



चाऊ एन लाय



गोपीनाथ मुंडे

गोपीनाथ मुंडे यांच्यासमेवत लेखक

प्रमोद महाजन यांच्यासमेवत लेखक



प्रमोद महाजन

एक सुंदर पुस्तक वाचून झालं ना? कसं वाटलं? मन प्रसन्न झालं?

माणसाला जगण्याच वेड असलं पाहिजे. काहितरी छंद पाहिजे. अगदी पागलपणाच्या हद्दीला भिडणारा छंद पाहिजे. जगण्याची नशा देणारा छंद पाहिजे असा छंद असला की जगण्याची जिजीविषा वाढते. मनाला उभारी येते. तशीच उभारी लेखकाच्या मनाला येते जेव्हा वाचक आपली पसंती कळवतात. अगदी नापसंती कळवली तरी चालेल. पण वाचलं न वाचलं असं करू नका. प्रतिसाद द्या. लेखक किंवा लेखिका जेव्हा आपलं लाखमोलाचं लिखाण वाचकांना विनामूल्य उपलब्ध करून देतात तेव्हा त्यांची किमान अपेक्षा असते की वाचकांनी त्याची दखल घ्यावी. चर्चा करावी.

या पुस्तकाचे लेखक विजय देशपांडे हे एअर इंडियाचे कर्मचारी. प्रपंच करत असतानाच त्यांनी आपला स्वाक्षरीसंग्रहाचा छंद जोपासला. थोरामोठ्यांची स्वाक्षरी मिळविणे सोपे नसते. अनेकदा कटू अनुभव येतात तर काही अनपेक्षीत स्वाक्षऱ्या मनाला उभारी देऊन जातात. आपल्या आठवणींचा लेखाजोखा विजयजींनी या पुस्तकात मांडला आहे. सोबत त्यांनी मिळवलेल्या स्वाक्षंरींचे ऑनलाईन प्रदर्शनही या पुस्तकाचा उद्देश आहे. आपल्याला हे पुस्तक नक्की आवडेल अशी आम्हाला खात्री आहे. पुस्तक वाचून आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा.

टीम इ साहित्य
www.esahity.com